म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १०६७



# कै. राम गणेश गडकरी यांच्या आठवणी

– ह. सौ. वाडकरी

REFBK-0006513

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 33638 वि: [illegible]
क्रमांक 1381 नों: दि: [illegible]



ह्यांच्या ह्या
आठवणी



प्रिय भगिनी
कै. सौ. ताराबाई
ऊर्फ सरस्वतीबाई
वामन मोहिले हिच्या
प्रेमळ आत्म्यास—



प्र. सी. गडकरी

# डोकें खाजवतांना

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 33636 वि: ....
क्रमांक 7609 नों: दि: 5-70-...

थोड्या दिवसांपूर्वी प्रस्तुत आठवणींच्या संग्रहाचे लेखक श्री० प्रभाकरपंत गडकरी हे जेव्हां आपल्या ह्या संग्रहाला मीं प्रस्तावना लिहावी म्हणून विनंती करण्याकरितां मजकडे आले, त्या वेळीं त्यांच्या विनंतीला मान देणें आपलें अवश्य कर्तव्य होय असें वाटत असतांही, त्यांना मला ताबडतोब होकार देववेना !

माझी अशी संदिग्ध मन:स्थिति व्हावयाला कारणेंही तशींच महत्त्वाचीं होतीं. महाराष्ट्रीय रसिकांच्या — विशेषतः तरुणांच्या — आत्यंतिक आदर-प्रेमाला ज्या कांहीं थोड्या व्यक्ति गेल्या पंचवीस तीस वर्षांत पात्र झाल्या आहेत, त्यांमध्यें प. वा. राम गणेश गडकरी ह्यांची अगदीं अग्रभागीं गणना केली पाहिजे. ह्या सिद्धान्ताविषयीं कोणाचा मतभेद होईल, असें मला वाटत नाहीं. आपल्या सर्वसुंदर नाट्यकृतींनीं, अमृतमधुर कवितांनीं, उत्कृष्ट विनोदी लेखांनीं त्यांनीं तरुण महाराष्ट्राला नुसतें वेड लावून ठेवलें आहे, असें म्हणण्यांत अतिशयोक्तीची मुळींच भीति नाहीं. प. वा. गडकरी ह्यांना दिवंगत होऊन आज जवळ जवळ वीस वर्षें झालीं. इतक्या अवधींत व्यक्ति ह्या नात्यानें त्यांच्या स्वत:विषयीं आणि त्यांच्या कृतींविषयीं निरनिराळ्या अधिकारी अनधिकारी, लहान थोर लेखकांनीं इतक्या विविध प्रकारचें वाङ्मय निर्माण करून ठेवलें आहे, कीं आतां त्यांच्या-विषयीं अधिक कांहीं लिहिलें जाणें–तेंही ज्यांची ओळख माझ्यासारख्या गडकऱ्यांच्या मित्रांनीं रसिकांना विशेष रीतीनें पटवून देण्यासारखें लिहिलें जाणें–फारसें संभवनीय आहे असें मला वाटेना ! ह्यामुळें श्री. प्रभाकरपंत गडकरी ह्यांचें प्रस्तुतचें लिखाण पूर्वींच्या लिखाणाच्या चर्वितचर्वणाच्या स्वरूपाचें असावें, अशीच प्रथमदर्शनीं माझी कल्पना झाली, तर त्यांत कांहीं नवल नाहीं !

ह्याहूनही दुसरें अधिक महत्त्वाचें कारण होतें. प. वा. गडकरी ह्यांचा माझा दीड तपाचा अगदीं निकटचा स्नेहसंबंध. माझें वास्तव्य मुंबईला असलें, तरी वारंवार मी गडकरी ह्यांजकडे पुण्याला यावयाचा अथवा ते मजकडे मुंबईला यावयाचे. परंतु एवढ्या दीर्घ कालावधींत, प्रस्तुत संग्रहाचे लेखक श्री. प्रभाकरपंत गडकरी हे प. वा. मास्तरांच्या सहवासांत आढळल्याचें मला स्मरेना आणि त्यांच्या चेहेऱ्याचीही ओळख पटेना ! त्यामुळें त्यांनीं लिहिलेल्या आठवणी

त्यांच्या स्वतःच्या अनुभवाच्या असण्यापेक्षां ऐकीव स्वरूपाच्याच असाव्या, असा माझा ग्रह होणें स्वाभाविक होतें.

प्रस्तुत आठवणी ' लोकमान्य ' पत्रांत प्रकाशित होत असतां, त्यांपैकीं चारदोन माझ्या वाचनांत आल्या होत्या. त्यांतील अस्पष्टता, कृत्रिमता वगैरे दोषांमुळें माझ्या ह्या ग्रहाला जोरच मिळत होता !

ह्या सर्व कारणांमुळें श्री. प्रभाकरपंत गडकरी ह्यांची क्षमा मागून त्यांना नकार द्यावा, असा माझा बहुतेक निश्चयही झाला होता. परंतु तो अमलांत आणण्यापूर्वीं एकवार त्यांच्या सर्व आठवणी वाचून तरी पाहाव्या, असें मला वाटलें आणि त्या लक्षपूर्वक वाचूं लागतांच, सूर्यप्रकाशानें धुकें वितळावें तसें माझ्या शंकांचें धुकेंही वितळूं लागलें, हें कबूल करायला मला आनंद वाटतो.

प्रस्तुत संग्रहाचे लेखक श्री. प्रभाकरपंत हे मास्तरांच्या व माझ्या मैत्रीच्या कालीं बहुतेक विद्यार्थीदशेंत असून त्यांचें वयही फार नव्हतें. आपल्या घरच्या छोट्या विद्यार्थीमंडळीला मास्तर आपल्या परिचयाच्या मित्रमंडळींत फारसे कधींही फिरकूं देत नसत, इतकेंच नव्हे, तर ह्या बाबतींत त्यांची शिस्त अतिशय कडकही होती. ह्यामुळें गडकऱ्यांच्या माझ्यासारख्या ' दूर 'स्थ मित्राच्या दृष्टीला प्रभाकरपंत फारसे कधीं पडूं नयेत, हें सहजच होतें. ते आमच्या दृष्टीला न पडले, तरी मास्तरांचें सान्निध्य त्यांना आमच्यापेक्षांही अधिक निकटचें व रात्रंदिवस मिळत असे. ह्या विशिष्ट परिस्थितीमुळें, अशी संधि मिळालेल्या हुषार अंतेवासीयानें अचूक धोरणानें ' टिपून ' ठेवलेल्या आठवणी विशेष हृद्य व वाचनीय होऊं शकतील असें वाटून, त्या दृष्टीनें ह्या आठवणी मी वाचूं लागतांच त्या मला अधिकाधिक पटत गेल्या हें खरें असलें, तरी पण त्यांपैकीं कित्येकांत कृत्रिमता, दूरान्वय, स्वानुभवापेक्षां ऐकीवपणा ( hearsay ) वर अधिक जोर वगैरे दोषही मला बऱ्याच मोठ्या प्रमाणांत आढळून आले, हेंही येथें नमूद करणें इष्ट वाटतें. कांहीं आठवणी तर त्या वेळच्या प्रभाकरच्या वयाच्या मानानें त्याच्या आकलनाच्या आवाक्याबाहेरच्या आहेत, असेंही स्पष्ट दिसतें ! परंतु अशाही आठवणी संग्रहित करण्यांत प्रभाकरपंतांचा विशेष दोष नाहीं, असें मला वाटतें. कारण, मास्तरांची व्यक्तिमत्ता एवढी प्रचंड आणि आकर्षक होती, कीं त्यांच्याबद्दलच्या खऱ्याखोट्या, ऐकीव अनुभविक आठवणींची गल्लत होऊन

त्या त्यांच्या भक्तांच्या मनांत अगदीं खोल अंतर्भागीं एकत्रित होऊन त्यांना विलक्षण ‘ आत्म ’ रूप प्राप्त व्हावें, हें अगदीं सहज आहे !

प्रस्तुत संग्रहांतील कांहीं आठवणी मात्र इतक्या स्पष्ट, रेखीव आणि मास्तरांच्या स्वभावधर्माचीं हुबेहुब छायाचित्रें वठविणाऱ्या झाल्या आहेत, कीं त्या वाचतांच त्यांच्या सत्यतेबद्दल मला अणुरेणुही संदेह वाटला नाहीं ! उदाहरणार्थ पहिल्याच हप्त्यांतील ‘ मध्यरात्रीं आलेल्या समंधा ’ ची आठवण ! हुबेहुब अगदीं ह्याच स्वरूपाच्या एका घटनेची आठवण मलाही नमूद करतां येईल.

१९१५ सालीं कांहीं दिवसांकरतां मी पुण्याला राहावयाला आलों असून माझ्या श्वशुरगृहीं उतरलों होतों. माझ्या श्वशुरांचें बिऱ्हाड त्या वेळीं ओंकारेश्वर स्मशानभूमीच्या समोर रायरीकरांच्या वाड्यांत होतें. नेहमींप्रमाणें ह्या खेपेलाही माझा सर्व दिवस मास्तरांच्या सहवासांत त्यांच्या घरींच जाई व नंतर भोजनासाठीं मी बिऱ्हाडीं जात असें. मास्तरांना मित्रमंडळीशीं गप्पाष्टकें झोडण्याचा विलक्षण शौक असे. पहिल्याच दिवशीं, ‘ रात्रींच्या भोजनानंतर तुम्ही परत गप्पांसाठीं माझ्याकडे या व नंतर अकरा बारा वाजतां मी स्वतः बरोबर येऊन रायरीकरांच्या वाड्यांत तुम्हांला पोचतें करीन ’ असें मास्तरांनीं मला आश्वासन दिलें. त्याप्रमाणें सुमारें साडेआठ वाजतां भोजन आटोपून मी त्यांच्या घरीं कसबापेठेंत आलोंही. पुढें, गप्पाष्टकें पुरीं झाल्यावर बारा साडेबारा वाजतां मी जेव्हां बिऱ्हाडीं जावयाला निघालों, तेव्हां मास्तरांची स्वारी मला बरीच चिंताग्रस्त दिसली. चिंतेचें कारण, प्रश्नोपप्रश्नांनीं शोधून काढतांना मला आढळून आलें, कीं संध्याकाळीं मला रात्रीं परत पोचविण्याचें वचन देतांना, आपणाला ऐन मध्यरात्रीं ओंकारेश्वराच्या ‘ भयंकर ’ स्मशानभूमीवरून जावें यावें लागेल, हें त्यांच्या ध्यानीं नव्हतें ! त्यांतून, जातांना आम्हीं दोघे असलों, तरी परत घरीं येतांना मास्तरांना एकट्यालाच त्या ‘ भयंकर ’ जागेवरून यावयाचें होतें ! ही परिस्थिति ध्यानीं येतांच मीं हसून त्यांना म्हटलें,

“ कांहीं हरकत नाहीं, मास्तर ! तुम्ही मला रायरीकरांच्या वाड्यांत, पोचवायला चला नि परत येतांना मी तुमच्या सोबतीला येतों. अशा रीतीनें ओंकारेश्वर नि तुमचं घर ह्या ‘ गडसासवडा ’ मध्यें आपण दोघे सकाळपर्यंत होतील तेवढ्या फेऱ्या करूं या. ”

मास्तरांनीं भेदरलेलें हास्य केलें. परंतु त्यांचें भय मात्र दूर झालें नव्हतें. शेवटीं जवळ राहाणाऱ्या एका मित्राला तेवढ्या रात्रीं उठवून आम्हीं बरोबर घेतलें आणि ओंकारेश्वराच्या भूतपिशाच्चांच्या भयभीतीला पार गाडून टाकलें !

आणखीही अशा कांहीं आठवणी मला सांगतां येतील. परंतु हा संग्रह माझ्या आठवणींचा नसून प्रभाकरपंतांच्या आठवणींचा आहे, ह्याची मला आठवण ठेवली पाहिजे.

प्रस्तुत संग्रहाचा एक प्रमुख विशेष हा आहे, कीं ह्या आठवणी मास्तरांच्या अगदीं निकट सहवासांत रात्रंदिवस राहिलेल्या एका आवडत्या आप्तानें सांगितल्या आहेत. दूरस्थ ‘ इतरेजनां ’च्या प्रासंगिक आठवणींपेक्षां त्यांचें मूल्य, एका दृष्टीनें केव्हांही अधिकच ! प. वा. गडकऱ्यांची स्मृति रसिक महाराष्ट्राच्या हृदयांत वज्ररसानें संबद्ध झाली आहे आणि तिला बाह्य उपकरणांची तादृश आवश्यकता नाहीं, हें केव्हांही खरेंच ! परंतु काल हा कसल्याही कणखर गोष्टी कणाकणांनीं पार नष्ट करून टाकण्याला पूर्ण समर्थ असतो. त्याच्या ह्या ‘ पराक्रमा ’ला पूर्ण पायबंद घालणें जगांतील कोणत्याही शक्तीला अशक्य असलें, तरी त्याची मारकता शक्य तितकी कमी तीव्र करण्याला अशा साधनांचा चांगला उपयोग होतो. अशा दृष्टीनें श्री. प्रभाकरपंत गडकरी ह्यांच्या ह्या संग्रहाचा उत्कृष्ट उपयोग होईल, अशी माझी खात्री आहे. रसिक महाराष्ट्र त्याचें उचित स्वागत करून प. वा. राम गणेश गडकरी ह्यांच्यावरील आपल्या प्रेमाला उजाळा देईल, अशी मला पूर्ण आशा आहे.

विठ्ठल सीताराम गुर्जर

पुणें, ३.१.१९३८

# कृतज्ञतेचे दोन शब्द

कै. राम गणेश गडकरी ह्यांच्या आठवणी आणि त्याही त्यांच्या निधनानंतर अठरा वर्षांनीं – तसेंच ह्यापूर्वीं त्यांच्या अनेक विद्वान् वाङ्मयभक्तांनीं त्यांच्याविषयींचें विविध प्रकारचें वाङ्मय निर्माण करून ठेवल्यानंतर – मला लिहिण्याचा सुयोग येईल हें माझ्या कधीं स्वप्नींही आलें नाहीं. परंतु १९३६ सालीं अशीच कांहीं अकल्पित घटना घडून आली आणि म्हणून मला महाराष्ट्रीय वाङ्मयरसिकांच्या आदर–प्रेमाला पात्र झालेल्या ह्या परमपूज्य पुरुषोत्तमाची अल्प सेवा करावयाचें भाग्य लाभलें.

प्रतिवर्षी मुंबई येथें यंग दैवज्ञ युनियनतर्फें 'मातृदिन' साजरा करण्यांत येतो. १९३६ सालीं ह्या दिनोत्सवाला उचित अशी कविता देण्याविषयीं माझ्या एका स्नेह्यांनीं मला विनंती केली व त्याप्रमाणें मी त्यांना पुढील कविता लिहून दिली—

राग–हमीर, ताल–झंपा

**मधुर वचन 'आई' । सदा दे शिवही ॥**
**स्वयें तेंचि संसारतापांसि दाही ॥ ध्रु० ॥**
**प्रभूची सदयता । म्लान परि तत्त्वतां ॥**
**आई–हृदय थोर द्रवतांची ॥ १ ॥**
**चिरंजीव सृष्टी । मातृपदकमलीं ती ॥**
**नांदे म्हणूनि वंद्य । त्रयलोकीं ॥ २ ॥**
**प्रभूनाम न मुखीं । आधिं परि सहज तें ।**
**'आई' विमल नाम । जन घेई ॥ ३ ॥**

ही कविता येथें देण्याचें कारण हेंच, कीं ह्याच माझ्या कवितेमुळें माझी आणि 'लोकमान्य' वर्तमानपत्राचे माजी सहसंपादक श्री. वि. द. चिंदरकर ह्यांची ओळख त्या समारंभाच्या वेळीं झाली. माझा आणि कै. गडकऱ्यांचा निकट संबंध – आप्तसंबंध – आहे अथवा बराच दाट परिचय होता वगैरे पृच्छा श्री. चिंदरकरांनीं मजजवळ त्याच वेळीं केली. त्यांच्या अपेक्षेप्रमाणें त्यांना मजकडून अनुकूल उत्तर मिळतांच, दर सोमवारच्या 'लोकमान्या'च्या साहित्य अंकासाठीं कै. श्री. गडकऱ्यांच्या आठवणी लिहून द्याव्या म्हणून मला त्यांनीं

विनंती केली. ह्यानंतर लौकरच 'लोकमान्यां'तून दर सोमवारीं आठवणी प्रसिद्ध होऊं लागल्या. 'लोकमान्या'चे संपादक श्री. दत्तात्रेय गणेश सावरकर ह्यांनीं ह्या आठवणींचा संग्रह मोठ्या प्रेमानें स्वीकारून कै. राम गणेश गडकरी ह्यांच्यावरील आपलें निर्व्याज मनोहर आदर-प्रेम व्यक्त केलें आहे. माझ्या लेखनव्यवसायांत उत्साहानें पुढें पाऊल टाकावयाला मला सदय अंतःकरणानें उत्तेजन देणाऱ्या ह्या माझ्या लेखक-बंधुद्वयाचा मी अत्यंत आभारी आहें.

प्रस्तुत आठवणी लिहून झाल्यानंतर माझे जिव्हाळ्याचे बालपणींचे स्नेही श्री. दत्तात्रेय महिपत गुप्ते, ह्यांनीं त्या पुस्तकरूपानें मीं लौकरच प्रसिद्ध कराव्या म्हणून मला आग्रह केला. परंतु कांहीं अपरिहार्य अडचणींमुळें त्या वेळीं तसें करणें मला शक्य नव्हतें. आज गेलीं दोन तपें ह्या माझ्या प्रेमळ बंधूंनीं वेळोवेळीं मला जें परोपरीनें निरपेक्ष साहाय्य केलें आहे, माझ्या लेखनव्यवसायांत आरंभापासून जें उत्तेजन दिलें आहे, त्याबद्दल त्यांचे मी कोणत्या शब्दांनीं आभार मानूं ?

प्रस्तुत आठवणींच्या संग्रहाला सुप्रसिद्ध लेखक श्री. विठ्ठल सीताराम गुर्जर ह्यांनीं माझ्या विनंतीला मान देऊन प्रस्तावना लिहिली आहे, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. प्रकृति नादुरुस्त असतांही वेळांत वेळ काढून त्यांनीं केवळ पितृतुल्य-प्रेमानें मीं लिहिलेले चार दोन वेडेवाकडे शब्द वाचून माझ्या अल्प कृतीचें क्षमापूर्ण उदारतेनें कौतुक केलें आहे, त्याबद्दल सतत स्मरण होऊन अंतःकरण कृतज्ञतेनें सारखें उचंबळतच राहील. ह्याहून अधिक तें काय लिहूं ?

ह्या आठवणींच्या संग्रहांतील उण्याअधिक्याकडे 'एथें जें पडलें उणें अधिक तें विद्वज्जनीं साहिजे । प्रेमें पूर्ण कृपा करोनि बरवें केलें तिहीं पाहिजे' ह्याच दृष्टीनें सदय, उदारबुद्धीचे महाराष्ट्र रसिक पाहातील अशी मला आशा आहे.

प्रभाकर सीताराम गडकरी

२१३ राधामंदिर, माटुंगा,
मुंबई, १२.१.३८

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | "काव्योदयमाला मीं रचण्यातें घेतली असे हातीं | १ |
| २ | गडकऱ्यांनीं दिलेला गुरुमंत्र .... .... | २ |
| ३ | भागवतांचें भूत .... .... | २ |
| ४ | भुताटकीचें घर .... .... | ३ |
| ५ | पोलिसाला कसें बनविलें .... .... | ४ |
| ६ | गडकऱ्यांच्या घरांत मध्यरात्रीं येणारा समंध .... | ५ |
| ७ | पुण्यप्रभावांतील कंकण .... .... | ६ |
| ८ | खंडाळ्याच्या घाटांत .... .... | ७ |
| ९ | एक भयंकर नाटक .... .... | ८ |
| १० | शास्त्रीबुवांचा त्रास कसा चुकविला .... | १० |
| ११ | गडकऱ्यांचे विद्यार्थी .... .... | ११ |
| १२ | प्रेमसंन्यासाचें मूळ नांव .... .... | १२ |
| १३ | प्रेमसंन्यासावरील टीका .... .... | १२ |
| १४ | गोकुळचा इतिहास .... .... | १४ |
| १५ | राम गणेश गडकऱ्यांना मी ओळखतों .... | १६ |
| १६ | जगांतील एक मोठा बातमीदार .... | १९ |
| १७ | बालकवि ठोमरे... .... .... | २० |
| १८ | मी कामांत आहें .... .... | २१ |
| १९ | वेडा कवि गोविंदाग्रज .... .... | २२ |
| २० | एक मौजेचा प्रसंग .... .... | २३ |
| २१ | गडकरी आणि शाकुंतल .... .... | २४ |
| २२ | गडकरी आपलीं नाटकें कशीं लिहीत असत | २६ |

२३ वृंदावनाचा संचार .... .... २७
२४ गडकऱ्यांचें मन गहिंवरलें आणि देहूबाळ जन्मास आलें २८
२५ गडकऱ्यांचा लो. टिळकांना नवलाखांचा नजराणा ३०
२६ तोड ही माळ .... .... .... ३२
२७ सरस्वतीचंद्र वाचण्यासाठीं तरी गुजराथी शिका ३३
२८ पुण्यप्रभाव नाटक लिहून पुरें झालें त्या दिवशीं ३४
२९ कायमचाच वर गेला असतास ना ! .... ३५
३० पुण्यांतील परिटाचें एक बुद्धिमान् पोर .... ३७
३१ गोव्यांतील एक नाजूक वासाचें रानफूल .... ३८
३२ पडद्यावर वाघाच्या मुखवट्यांचा चमत्कार .... ४०
३३ गडकऱ्यांना हसूं आवरेना .... .... ४१
३४ श्री. मामा वरेरकरांविषयीं गडकऱ्यांची आमरण आदरबुद्धि ४२
३५ गडकरी आणि मूकनायक .... .... ४३
३६ पुण्याची एक भाग्यशाली भिकारीण .... ४४
३७ गडकऱ्यांचा तळिराम .... .... ४५
३८ गडकऱ्यांची कृतज्ञता .... .... ४६
३९ "मला तर इतिहासांत पास व्हायचं आहे." ४७
४० "श्री. वि. स. खांडेकर हे उत्तम लेखक होतील" ४९
४१ गडकऱ्यांना पुनर्जन्म देणारा नामदार गोखल्यांचा सदुपदेश ५०
४२ गडकऱ्यांचा काकासाहेब खाडिलकरांनीं केलेला गौरव ५२
४३ एकच प्याल्यांतील सूत्रचालक भोळा तळिराम कीं दुष्ट दारू? ५३
४४ मलाच ह्या गृहस्थाच्या लेव्हलला गेलें पाहिजे ५३
४५ भित्र्या माणसाला देव असें शासन करतो .... ५४
४६ एका पद्यावलीवरील गडकऱ्यांचा अभिप्राय .... ५५

४७ आतां माझाच मुडदा सापडणार .... ५६

४८ वीर वामनरावांना घाबरणारे गडकरी .... ५७

४९ "जगाच्या रंगानें रंगल्याखेरीज जगांत वावर.... ५८

५० एका नाटककाराच्या पायांशीं गडकऱ्यांनीं लोळण घेतली ५९

५१ गडकऱ्यांचें स्वगत गायन .... .... ६१

५२ माझ्या प्रेमसंन्यासानें तूं कवि झालास .... ६२

५३ एक भयंकर रात्र .... .... ६३

५४ आनंदी आनंद गडे। इकडे तिकडे चहूंकडे.... ६४

५५ उष्णतेसाठीं बर्फ .... .... ६५

५६ एक पत्र .... .... ६८

५७ मी सवाई हॅम्लेट आहें .... .... ६९

५८ छत्रपति आणि गडकरी .... .... ७०

५९ लिहिलेला लेख हरवला म्हणून स्मरणशक्तीचा ठाव लागला ७२



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 33636 वि: चरित्र
क्रमांक 7069 नों. दि: 5-7-62

अनुक्रम: 33638 ............ दि: ..........
क्रमांक ... 1067 ........... नों: दि. 5-10-62

## कै. राम गणेश गडकरी यांच्या

# आठवणी

★

### १ “ काव्योदयमाला मीं रचण्यातें घेतली असे होती ॥ ”

वरील कवितेची ओळ लिहून झाली, परंतु काव्योदयमाला ह्या शब्दाची न्यस्ताक्षरी कविता करावयाचें मीं ठरविलें असल्यामुळें मला व्यो शब्दानें प्रारंभ करून, कांहीं केल्या दुसरी ओळ रचणें जमेना. बराच वेळ झाला, मी कसल्या तरी विचारांत गढून गेलों आहें, हें थोड्याच अंतरावर आरामखुर्चीवर पुस्तक वाचीत पडलेल्या कै. राम गणेश गडकरी यांच्या लक्षांत आलें व खुर्चीवरून उठून सरळ ते माझ्याजवळ येऊन उभे राहिले आणि उद्गारले, “ काय रे प्रभाकर, मघांपासून तूं हें काय लिहितो आहेस, दाखव पाहूं मला ! ”

मी जरासा ओशाळलों. मी कांहीं तरी उडवाउडवीचीं उत्तरें देणार, इतक्यांत गडकऱ्यांनीं मी लिहीत असलेल्या कवितेचा कागद हातीं घेतला आणि चटकन् पुढील ओळ लिहून टाकली—

“ **व्योमीं उंच न उडवे परि आक्रमि काव्यनभ यथाशक्ति.** ”

ज्या क्षणाला ही गोष्ट घडली, त्या क्षणींच गडकऱ्यांबद्दल व त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल माझ्या मनावर कायमचा पूज्यभाव उमटला.

या सुमारास म्हणजे सन १९०८ सालीं मी अमरावती हायस्कूल-मध्यें इंग्रजी पांचव्या इयत्तेंत होतों आणि पुण्याचें शिक्षण चांगलें म्हणून मला पुण्यास न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिकण्यास पाठविण्याबद्दल माझ्या वडिलांना गडकऱ्यांनीं सांगितलें व त्याप्रमाणें मी पुण्यास गेलों. पूर्वपुण्याईच्या सबळतेनें माझ्यासारख्या यःकश्चित् मनुष्याला सुमारें दहा वर्षें ज्या थोर व्यक्तीच्या सहवासाचा लाभ घडला, त्या परमपूज्य

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या स्मृतीचीं फुलें मी मोठ्या प्रेमानें जनताजनार्दनचरणीं अर्पण करीत आहें.

## २ गडकऱ्यांनीं दिलेला गुरुमंत्र

पुण्यास शिकत असतां मी कांहीं काळ गडकऱ्यांच्या घरींच राहात असें. आम्ही दोघेही शनवारवाड्यासमोरील एका खाणावळींत जेवावयास जात होतों. एके दिवशीं गडकरी मला म्हणाले, "हें पाहा प्रभाकर, खाणावळींत आपल्या घरच्यासारखी सोय कशी करून घ्यावी हें तुला समजत नाहीं. मी तुला एक मंत्र सांगून ठेवतों. ऐक. खाणावळींतल्या वाढप्यांना आपण नेहमीं बहुवचनानें संबोधावें. उदाहरणार्थ, आपण जातों त्या खाणावळींतल्या वाढप्याला, "कसें काय नारायणराव? तब्येत बरी आहे ना?" असें हसत हसत विचारलें, कीं तुला खाणावळीच्या मालकाचें दिवाळें निघेपर्यंत तो चांगलें जेवण देईल. हा मंत्र खाणावळींत जेवावयास जाणाऱ्याला फार उपयोगी पडतो.

## ३ भागवतांचें भूत

एकदां महाराष्ट्र नाटक मंडळींतील प्रसिद्ध नट भागवत आणि गडकरी हे शनवारवाड्याच्या दिल्ली दरवाजाजवळील चबुतऱ्यावर बसून बराच काळोख पडेपर्यंत गप्पागोष्टी बोलत होते; परंतु गोष्टी अर्धवट राहून दोघांनाही घरीं जावें लागलें. तेथून उठतां उठतां भागवत म्हणाले, "आजच्या गोष्टीबद्दल आपण पुन: याच ठिकाणीं बोलत बसूं!"

पुढें कांहीं महिन्यांनीं भागवत एकाएकीं मरण पावले. भागवत फार सच्च्या वृत्तीचा माणूस होता, ही गडकऱ्यांची समजूत असल्यामुळें गडकऱ्यांना नेहमीं वाटे, कीं भागवत अपुरी राहिलेली गोष्ट सांगण्याकरितां हॅम्लेटच्या बापासारखा पिशाच्च होऊन मला शनवारवाड्याजवळ केव्हां तरी संध्याकाळीं भेटणार. ह्या कल्पनेच्या भीतीमुळें गडकरी काळोख पडल्यानंतर पुन: केव्हांही शनवारवाड्यावरून गेले

नाहींत. रात्रींच्या वेळीं मी व गडकरी घरांतून कोठें तरी जावयास बाहेर पडलों. शनवारवाड्यावरून जवळचा रस्ता असल्यामुळें मी त्या दिशेनें वळलों, तों मला हातानें अडवून गडकरी म्हणाले, "प्रभाकर, शनवारवाड्यावरून जाणें भयंकर धोक्याचें आहे. माझा सच्चा मित्र भागवत या वेळीं मला वचन दिल्याप्रमाणें तेथें माझी वाट पाहात खडा पहारा करीत असेल. त्याला आतां तुझ्या आणि माझ्या जिवाची काय किंमत वाटणार ? चल, फीर मागें. असा बेहिशेबी जीव धोक्यांत घालणें मूर्खपणाचें आहे !"

## ४ भुताटकीचें घर

गडकरी स्वभावत: भित्रे होते म्हणून म्हणा, किंवा अन्य कारणानें म्हणा, गडकऱ्यांचा पिशाच्चयोनीवर भरंवसा होता असें मानावयास हरकत नाहीं. सन १९०८ सालीं अमरावतीस प्लेग झाल्यामुळें, मी वऱ्हाडांतल्या बाळापूर गांवीं माझ्या एका आप्ताकडे राहावयास गेलों होतों. कर्मधर्मसंयोगानें तेथें एके दिवशीं रविवारीं सकाळीं गडकरी पाहुणे म्हणून आले. बाळापूरच्या ॲंग्लो व्हर्न्याक्युलर स्कूलमध्यें त्यांना मास्तरची जागा मिळाली होती व दुसऱ्याच दिवशीं ते नोकरीवर रुजू व्हावयाचे होते. जेवण झाल्यावर माझे आप्त व गडकरी धूम्रपान करीत करीत गोष्टी सांगत होते. बोलण्याच्या नादांत दोघांच्या आगकाड्यांच्या पेट्यांची अदलाबदल झाली. कांहीं वेळानें गडकऱ्यांचें लक्ष त्यांच्या हातांतल्या काड्यांच्या पेटीकडे गेलें आणि एकदम मोठ्यानें ओरडून ते म्हणाले, "हा काय चमत्कार ! पेटीवरील हत्तीचें चित्र नाहींसें होऊन या ठिकाणीं हीं तीन पावलें कशीं उमटलीं ? नि:संशय हें घर भुताटकीचें आहे ! मी एक क्षणभरसुद्धां या ठिकाणीं राहाणार नाहीं. आतांच्या आतां जी गाडी मिळेल तिनें खामगांवास तात्यासाहेब कोल्हटकरांकडे निघून जातों !"

माझ्या आप्तानें त्यांची पुष्कळ समजूत करून पाहिली, पण व्यर्थ ! रात्रीच्या रात्रीं गडकरी तेथून खामगांवास निघून गेले. त्यानंतर

गडकऱ्यांची व माझी गांठ १९१० सालीं पुण्यासच झाली. गडकरी निघून गेल्यावर माझ्या आप्तानें विडी पेटविण्याकरितां काड्यांची पेटी खिशांतून काढली तों तिच्यावर हत्तीचें चित्र असल्याचें मला आढळून आलें. घडलेल्या प्रकाराबद्दल आम्हांला इतकें हसूं कोसळलें, कीं आसपासचीं माणसें झोंपेंतून खडबडून उठलीं.

## ५ पोलिसाला कसें बनविलें ?

पुण्यास शुक्रवार पेठेंत, शहराच्या अगदीं एका टोकाला गडकऱ्यांचे एक जिव्हाळ्याचे स्नेही राहात असत; त्यांच्याकडे एके दिवशीं गडकरी गेले. बऱ्याच दिवसांनीं दोघांच्या भेटी झाल्या होत्या. बोलण्याचालण्यांत रात्रीचे साडेबारा वाजून गेले. रस्त्यांतून चिटपाखरूं-सुद्धां फिरकत नसेल ही कल्पना तेथून निघतांना गडकऱ्यांना आली नाहीं. शुक्रवारपेठेंतून कसबापेठेपर्यंत एकटें जावयास गडकऱ्यांना धाडस होईना. इतक्यांत गडकऱ्यांचें लक्ष पोलीसचौकीकडे गेलें. चौकीवरील पोलीस झोंपेनें पेंगून डुलक्या देत असतांना गडकऱ्यांनीं पाहिलें. सुरक्षित सोबत पाहिजे असल्यास अशा अपरात्रीं या पोलिसाइतका लायक मनुष्य दुसरा कोणताही नाहीं. पण चौकी सोडून तो आपल्याबरोबर कसा येणार ? क्षणार्ध गडकरी रस्त्यांत स्वस्थ उभे राहिले व पोलिसाला कांहीं क्रोध येणाऱ्या अपशब्दांनीं संबोधून, रस्त्यांतून बेदरकार धावत सुटले. त्यांचा पाठलाग करीत चौकीवरील पोलीसही संतापाच्या भरांत धावत सुटला. दोघांच्या गांठी शनवार-वाड्याच्या कोंपऱ्यावर झाल्या. गडकऱ्यांनीं पोलिसाला सांगितलें, “ मी भित्रा मनुष्य आहें ! मला सोबत पाहिजे होती म्हणून तुला अपशब्द बोललों. माफ कर. मी चांगला माणूस आहें. न्यू इंग्लिश स्कूलमध्यें मास्तर आहें. माझ्याबरोबर ये म्हणजे माझें घरही तुला दाखवून ठेवतों. मी मुळींच वाईट मनुष्य नाहीं हें मी तुला खात्रीपूर्वक सांगतों. माझ्या बोलण्यावर विश्वास ठेव आणि तूं आपल्या चौकीवर खुशाल जा ! ”

या प्रकारामुळें पोलीस फारच विस्मित झाला. न्यू इंग्लिश स्कूल-मध्यें जाऊन ह्या माणसाची चौकशी केलीच पाहिजे असें म्हणून पोलीस तेथून चालता झाला.

## ६ गडकऱ्यांच्या घरांत मध्यरात्रीं येणारा समंध

पुण्याच्या कसबा पेठेंतील बहुतेक घरें पेशवाईच्या अमदानींतलीं आहेत आणि अशी आख्यायिका आहे, कीं पेशवाईच्या वेळचे समंध या घरांतून अद्याप वावरतात. गडकऱ्यांचें राहातें घरही कसबा पेठेंतच आहे. याही आख्यायिकेवर गडकऱ्यांचा भरवंसा होता असें मला वाटतें. मी गडकऱ्यांच्या घरीं राहावयास जाण्यापूर्वीं मला गडकऱ्यांनीं सांगितलें, कीं या घरांत रात्रीं १।२ चे सुमारास कोणी समंध फेरफटका करून जातो. तो कोणालाही त्रास देत नाहीं हें खरें, पण आपण होऊन त्याला त्याच्या मार्गांत व्यत्यय आणूं नये एवढ्यासाठींच मी तोंडावरून पांघरूण घेऊन निजतों. तूंही पण तोंडावरून पांघरूण घेऊन निजत जा. Best safety lies in fear. खरोखरीच एके दिवशीं पहाटेच्या सुमारास माणसाच्या पावलांचा आवाज माझ्या कानीं पडला. मी चटकन् डोक्यावर पांघरूण घेऊन निजलों. इतक्यांत गडकरी जागे झाले.

"कोण ?" म्हणून गडकरी उद्गारले. मी हळू आवाजांत बोललों, "तुमच्या म्हणण्याप्रमाणें इतक्यांत इथून समंध गेला."

गडकरी म्हणाले, "गेला ना तो ? मग ऊठ आतां आणि तो तेवढा दिवा लावून इकडे आण; मी रघुवंश वाचतों !"

इतक्यांत आमच्या समोरून एक भलें मोठें ऊदमांजर खिडकींतून घरासमोरील पिंपळाच्या झाडावर धावत गेलें.

मी म्हणालों, "मास्तर, हाच तो पेशवाईंतला समंध."

गडकरी म्हणाले, "शब्दपडसाद उठला, म्हणे कोण रे बोलला, खरें आहे हें. ध्यानांत ठेव !"

## ७ पुण्यप्रभावांतील कंकण

शिक्षकाची नोकरी पत्करून गडकरी किर्लोस्कर नाटक मंडळीबरोबर सन १९०८ सालीं अमरावतीस आले होते. नाटकाच्या दिवशीं नाटकगृहांत केवळ हौसेनें गडकरी प्रेक्षकांची दरवाजावर स्वागतपर सेवा करीत असत. या ठिकाणींसुद्धां गडकऱ्यांची सूक्ष्म अवलोकनशक्ति दृष्टोत्पत्तीस येई. त्यांच्या नाटकांतून ज्या विविध रसपूर्ण चमत्कृति दिसून येतात, त्यांची उभारणी या त्यांच्या अलौकिक सूक्ष्म अवलोकनावरच झालेली होती. 'प्रेमसंन्यासां'तला गोकुळ, 'राजसंन्यासां'तला देहू, 'एकच प्याल्यां'तला तळिराम हीं सर्व गडकऱ्यांच्या अद्वितीय प्रतिभेचीं साक्ष पटविणारीं स्वभावचित्रें त्यांच्या निकट परिचयांतल्या माणसांचींच आहेत. थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे गडकऱ्यांनीं आपलीं सर्व नाटकें आपल्या प्रतिभाशक्तीनें निर्माण केलेलीं आहेत. 'पुण्यप्रभावां'-तल्या कंकणाचा जन्म कोठें व कसा झाला तें पाहा.

एके दिवशीं सौभद्र नाटक पाहावयास अमरावती येथील एक धनाढ्य मनुष्य पहिल्या दराचें तिकिट घेऊन ज्या दरवाज्यावर गडकरी उभे होते तेथें आला. गडकऱ्यांनीं तिकिट पाहून त्या मनुष्याला पहिल्या रांगेंतल्या मधल्या खुर्चीवर बसावयास सांगितलें. नाटकाला सुरुवात व्हावयास बराच अवकाश असल्यामुळें पहिल्या रांगेंतल्या बहुतेक खुर्च्या रिकाम्या होत्या आणि म्हणूनच या मनुष्याच्या लांब मिशांच्याविरुद्ध शेजारच्या खुर्च्यांवर बसणाऱ्या प्रेक्षकांकडून गमतीची तक्रार आपल्याकडे अद्याप आली नाहीं असें गडकरी एका मित्राला म्हणाले. गडकऱ्यांचें सारें लक्ष त्या भीमदेही मनुष्याकडे होतें. नाटकाची वेळ होईपर्यंत त्या मनुष्यानें आपल्या दोरखंडवजा भव्य मिशांना पीळ देण्याचें काम जोरानें सुरू केलें. गडकऱ्यांच्या मित्रानें त्यांना विचारलें, "गडकरी, हें काय? तुम्ही मघांपासून त्या मनुष्याकडे सारखी टक लावून कां पाहातां?"

गडकरी उत्तरले, "कां पाहातों? भल्या माणसा, या मूर्तिमंत

राक्षसाला पाहातांच सुभद्रेला उचलून घेऊन येणारा आमचा नटलेला राक्षस भीतीनें भेदरून जाईल. सुरुवातीपासूनच आजचें नाटक पडणार अशी काळजी वाटते. अरे बाप रे! काय हे ह्याचे वाटोळे टप्पोरे डोळे! केवढें हें शरीराचें धूड! हे भीमरूपी महारुद्रा, तूं केवळ मिशांच्या भव्यपणामुळें किती रुबाबदार दिसतो आहेस? शपथेवर सांगतों, कीं मी तुला लौकरच चिरंजीव करीन. पण वरचेवर मागें वळून मात्र माझ्याकडे पाहूं नकोस!"

पुण्यप्रभाव नाटकांतील कंकण तो हाच!

## ८ खंडाळ्याच्या घाटांत

आजपर्यंत हजारों–लाखों लोकांनीं मुंबईपासून पुण्याचा प्रवास रेल्वेनें केला असेल; परंतु त्या प्रवासांतल्या अनंत नयनमनोहर, चेतोहर देखाव्यांकडे गडकऱ्यांच्या दिव्य दृष्टीनें फारच थोड्यांनीं पाहिलें असेल. या प्रवासांतील निर्जीव वस्तूंनासुद्धां आपल्या बौद्धिक सौंदर्याचा साज चढवून गडकऱ्यांनीं चिरकालीन शोभा आणली आहे. प्रेमसंन्यासांत घाटांतील पुलावर गाडी उभी राहिली आहे, कमलाकर मनोरमेवर बलात्कार करूं पाहात आहे, असा एक देखावा आहे. त्या वेळीं गडकऱ्यांनीं कमलाकराच्या तोंडीं "मनोरमे, दोन पर्वतांच्या विशाल ओठांवरून आणि पुलाच्या दंतपंक्तींतून काळाच्या या खोल दरीच्या जबड्यांत गडप झालीस," हीं वाक्यें घातलीं आहेत. खंडाळ्याच्या डयूक पॉइंटचें हें हृदयंगम वर्णन कोणाला आवडणार नाहीं?

### गडकऱ्यांचें नोटबुक

गडकऱ्यांच्याजवळ नेहमीं एक मोठें नोटबुक असे. गडकऱ्यांच्या डोक्यांत एखादी सुंदर कल्पना, एखादी गोष्ट आली, कीं ते या नोटबुकांत त्याक्षणींच लिहून टाकीत असत. सारांश, गडकऱ्यांचें सर्व लेखन सत्य, सौंदर्य आणि बुद्धिमत्ता यांच्या पक्क्या पायावर उभारलेलें आहे.

## ९ एक भयंकर नाटक !

अमरावतीस गडकऱ्यांचा मुक्काम असतां वऱ्हाडांतील कांहीं होतकरू नाटककारांचीं नाटकें वाचून पाहून अभिप्राय देण्यासाठीं गडकऱ्यांकडे आलीं होतीं. नापसंत म्हणून तीन नाटकें गडकऱ्यांनीं परत केलीं. परंतु चौथ्या नाटकाच्या बाबतींत नाटककारांनीं आग्रह धरला, कीं त्यांनीं गडकऱ्यांना नाटक वाचून दाखविल्याशिवाय त्यांच्या नाटकाची योग्यता गडकऱ्यांना ठरवितां येणार नाहीं. गडकऱ्यांच्या एका स्नेहसंबंधामुळें ह्या नाटककारांची ही विनंती त्यांना मान्य करावी लागली. नाटककारांच्या दृष्टीनें नाटकांतल्या कौशल्यपूर्ण प्रवेशरचनेबाबत, तर कोठें त्यांतल्या बुद्धिप्रधान वाक्याबाबत गडकऱ्यांची नीट समजूत होईल अशा रीतीनें समजावून सांगण्याची ह्या नाटककारांनीं आपली पराकाष्ठा केली. ह्या नाटकाच्या पहिल्या अंकांतल्या प्रवेशाची ओळख वाचकांना करून दिली म्हणजे मग ह्या नाटककारांनीं गडकऱ्यांना कसल्या संकटांत टाकलें होतें ह्याची अंधुक कल्पना तरी करतां येईल.

### तें नाटक कसें होतें ?

कांहीं मुलींनीं ईशस्तवन केल्यावर मुख्य पडदा उघडतांच आंत डाव्या बाजूला एक कल्लेदार मिशांचा तरुण उभा आहे. पांच दहा पावलांच्या अंतरावर शेणमातीनें सारवलेला दोन पुरुष उंचीचा एक कणगा दृष्टीस पडतो. त्यांत जानोजी पाटलाची बहकलेली तरुण मुलगी विवस्त्र अशा स्थितींत आहे असा अद्भुत देखावा नजरेस पडतो व पहिल्या प्रवेशाला सुरुवात होते. जानोजी पाटलावर सूड उगविण्याची प्रतिज्ञा करून निघालेला हा तरुण थेट कणग्याजवळ येऊन थडकतो. पाटलाची मुलगी कणग्यांत आहे हें त्याला नाटकाच्या चार अंकांपर्यंत कळत नाहीं. पांचव्या अंकांत मुख्य नायिका पाटलाची मुलगी हिला आपल्या मनोवृत्ति आवरून धरणें अशक्य झाल्यामुळें ती कणग्यांतून मोठ्यानें ओरडून बोलूं लागते. तें ऐकून

नाटकांतला तरुण नायक तिची सुटका करून तिच्यासह फरारी होतो. जानोजी कपाळावर हात मारून बसतो व येथेंच नाटक संपतें.

## बशीचे तुकडे तुकडे

एके दिवशीं सकाळीं गडकरी कांहीं मित्रांसह चहा पीत बसले होते. इतक्यांत हे नाटककार तेथें आले. नाटककारांना पाहातांच गडकऱ्यांना इतकें हसूं आलें, कीं बशींत ओतून घेतलेला चहा गडकऱ्यांच्या आंगावर सांडून बशीचे तुकडे तुकडे झाले, " हें पाहा, अण्णासाहेब ! " गडकरी एकदम उद्गारले, " काल रात्रीं तुमचें नाटक पुनः एकवार वाचलें. रंगभूमीच्या दृष्टीनें नाटक कसें बसवितां येईल हाच काय तो बिकट प्रश्न माझ्यापुढें आहे. एरवीं तुमचें नाटक फारच सुंदर आहे. दोन पुरुष उंचीच्या कणग्यांत नाटकांतल्या मुख्य नायिकेला नाटकाच्या सुरुवातीपासून चार अंकांपर्यंत अडकवून ठेवण्यांत जें नाट्यनैपुण्य तुम्हीं दाखविलें आहे, तें खरोखरीच अपूर्व आहे. तीनशें वर्षें पाठीमागें आणि तीनशें वर्षें पुढें तुमच्या तोडीचा नाटककार हिंदुस्थानांत तरी जन्माला येईल असें वाटत नाहीं. आम्हांला सदोष नाटकें सुधारून बसवितां येतात; परंतु निर्दोष नाटकें बसविण्यास आम्ही असमर्थ आहोंत. तुमचें नाटक आमच्या दृष्टीनें सोन्याची सुरी आहे. पण ती उरांत खुपसून घेतां येत नाहीं. आज नाहीं उद्यां तुमच्या नाटकाला फार मोठी किंमत येईल, नाटक मंडळ्यांतून तें घेण्याची स्पर्धा लागेल आणि तुम्हांला त्याचा मोबदला म्हणून विपुल पैसा मिळेल. माझें ऐका. हें नाटक घेऊन चला आणि जिवापलीकडे त्याचें जतन करा. कोहिनूर हिरा चमकल्यावांचून कसा राहील ? "

बिचारे नाटककार हिरमुसलें तोंड करून नाटकाच्या चोपड्या घेऊन निघून गेले. नंतर गडकरी पुटपुटले, " मूर्ख मनुष्या, चांगुलपणा म्हणून तरी या जन्मीं मला पुनः भेटूं नकोस. "

## १० शास्त्रीबुवांचा त्रास कसा चुकविला ?

अमरावती येथें "कर्तव्य" या नांवाचें एक साप्ताहिक श्री. नीलकंठ सखाराम भांगले छापून प्रसिद्ध करीत असत. यांच्याकडे गडकरी वारंवार येत असत. रा. भांगले हे उत्तम लेखक व कवि होते आणि म्हणूनच गडकऱ्यांचा आणि त्यांचा जिवाभावाचा स्नेह होता. "कर्तव्य" पत्रांतून गडकऱ्यांचे ५०।६० लेख सन १९०८ ते १९०९ या दरम्यान प्रसिद्ध झाले आहेत. भांगल्यांच्या शेजारीं एक इंदूरचे संस्कृतविशारद शास्त्री राहात असत. त्यांच्याकडे संस्कृत शिकण्याकरितां बरेच विद्यार्थी येत असत. यामुळें सर्व दिवसभर भांगल्यांना शांतता मिळत नसे. विद्यार्थी मोठमोठ्यांनीं संस्कृत ऋचा, श्लोक म्हणत असत. हे विद्यार्थी घरीं गेल्यावर शास्त्रीबोवा आपल्या पांच-सहा वर्षांच्या गोविंद नांवाच्या मुलाला चापट्या मारमारून कालिदासाच्या शाकुंतल नाटकांतील पुढील श्लोक शिकवीत बसत—

**स्रस्तांसावतिमात्रलोकहितलौ बाहू घटोत्क्षेपणा**
**दद्यापि स्तनवेपथुं जनयति श्वासः प्रमाणाधिकः**
**बद्धं कर्णशिरीषरोधि वदने घर्माम्भसां जालकं**
**बन्धे स्रंसिनि चैकहस्तयमिताः पर्याकुला मूर्धजाः**

हा श्लोक शिकवीत असतांना शास्त्रीबोवांची आणि त्यांच्या अल्पवयी मुलाची झटापट चाललेली होती. इतक्यांत गडकरी भांगल्यांकडे आले. गडकरी म्हणाले, "भांगले, असे खिन्न कां बसलां आहांत ?" भांगले उत्तरले, "गडकरी, ह्या शेजारच्या ताशेवाजंत्र्यांच्या कडकडाटानें मी अगदीं सुन्न झालों आहें. हा मूर्ख, पांच वर्षांच्या पोराला कालीदासाचा श्लोक शिकवतो आहे. या थेरड्याइतका मूर्ख मनुष्य कोठेंही आढळायचा नाहीं. गडकरी, याला कांहीं उपाय असेल तर सुचवा !" यावर गडकरी म्हणाले, "भांगले, तुम्ही हिंदुस्थानी दोहऱ्यांची गाथा विकत आणा. दोन-तीन दिवस मोठमोठ्यानें दोहरे म्हणायला सुरुवात करा, कीं हा म्हातारा इथून जागा सोडून गेलाच

क्रमांक १०६७ नों. दि. ९-१०-

समजा. दोहरे मात्र परदेशी पद्धतीनें म्हणा !" भांगल्यांना गडकऱ्यांची सूचना पसंत पडली आणि तिचा इष्ट परिणामही लौकरच घडून आला.

## ११ गडकऱ्यांचे विद्यार्थी

लहान मुलें आणि विद्यार्थी ह्यांच्यांत मिसळून राहाणें गडकऱ्यांना फार आवडत असे. गडकऱ्यांच्या बौद्धिक सौंदर्याचा लाभ मिळावा म्हणून नेहमीं त्यांच्या घरीं वयस्क माणसें आणि विद्यार्थी जमत असत. गडकरी एकटेच घरीं बसले आहेत असें क्वचितच घडलें असेल. कोणी संस्कृत शाकुंतल, तर कोणी रघुवंश, तर कोणी कांहीं, गडकऱ्यांकडून समजावून घेण्याकरितां त्यांच्या घरीं रात्रीं वस्तीला येऊन राहात. गडकऱ्यांचीं व माझीं अंगावर घ्यावयाचीं सहा पांघरुणें होतीं; परंतु हे रात्रीं वस्तीला येऊन राहाणारे विद्यार्थी बेदरकारपणें तीं सर्व पांघरुणें आपल्या उपयोगी आणीत. भिडेखातर मी त्या विद्यार्थ्यांची ही सुलतानी अरेरावी कांहीं दिवस गडकऱ्यांच्या कानीं घातली नाहीं.

### ढेंकणांसाठीं पाहुणे

एके दिवशीं थंडी बऱ्याच कडाक्याची पडली होती आणि ती सहन करणें मला शक्य दिसेना; तेव्हां मी रागानेंच गडकऱ्यांना बोललों, "मास्तर, हें काय ? मी स्वत:करतां तीन पांघरुणें आणलीं; पण हे तुमचे पाहुणे त्यापैकीं एकसुद्धां माझ्यासाठीं शिल्लक ठेवीत नाहींत, ह्याला काय माणुसकी म्हणतात ? तसेंच तुम्ही त्यांना रोज कांहीं शिकवीत नाहीं, कांहीं नाहीं. मग त्यांना आपल्या घरीं यावयाचें आमंत्रण तुम्ही कशासाठीं देतां ?" गडकरी हसत हसत म्हणाले, "प्रभाकर, तूं अगदीं अजाण आहेस. आपल्याला कल्पनाही करतां येणार नाहीं इतके ढेंकूण या घरांत झाले आहेत. तुला आणि मला ते सुखानें स्वस्थ निजूं देतील का ? वेड्या, आतां तरी तुला समजलें का, त्या विद्यार्थ्यांना मी रोजीं आमंत्रण कां करतों तें ?"

## १२ प्रेमसंन्यासचें मूळ नांव

गडकऱ्यांना लेखनाचा नाद फार लहानपणीं म्हणजे त्यांच्या वयाच्या नवव्या वर्षापासून होता असें त्यांच्या परमपूज्य मातुःश्री यांच्या तोंडून मीं ऐकिलें. गडकरी गणदेवीस गुजराती तिसऱ्या-चौथ्या इयत्तेंत असतांना त्यांनीं, "गर्वनिर्वाण" या नांवाचें एक नाटक लिहिलें होतें. त्याचीं तीन-चार हस्तलिखित पानें मी पुण्यास असतां माझ्या अवलोकनांत आलीं. त्यांतीलही गडकऱ्यांच्या बुद्धीची कल्पना पुढील वाक्यावरून करतां येते. तीं वाक्यें अशीं—"राणीसाहेब, एका तोंडानें तुम्हीं इतक्या बेजार झालांत, मग एका तोंडाचीं दोन तोंडें झाल्यावर तुम्ही काय कराल ?"

गडकरी बाळापुरास आले होते, त्या वेळीं एक चोपडी "दग्ध प्रेम" हें नांव लिहिलेली तेथेंच राहिली होती. गडकऱ्यांनीं त्या चोपडींत चार-दोन चार-दोन पानेंच लिहिलीं होतीं. ती चोपडी त्यांनीं पुण्यास घेतली. हें "दग्धप्रेम" नाटक पुढें तीन वर्षांनीं प्रेमसंन्यास या नांवानें प्रसिद्ध झालें. प्रथमतः प्रेमसंन्यास नाटक संगीत रचावयाचें होतें असें वाटतें. कारण मंगलाचरणाचीं दोन पदें "दग्धप्रेम" या चोपडीवर लिहिलेलीं होतीं.

वर्तमानपत्रांतून रोजीं येणाऱ्या प्रेमसंन्यास नाटकावरील सर्व टीका गडकऱ्यांनीं माझ्याकडून वाचून घेतल्या. त्या वेळीं गडकरी उद्गारले, "माझ्या लिहिण्याला जगांत एवढी किंमत येईल अशी तरळती कल्पनासुद्धां मला कधीं स्वप्नांतही आली नाहीं."

## १३ प्रेमसंन्यासवरील टीका

कै. राम गणेश गडकरी यांचें प्रेमसंन्यास नाटक प्रयोगरूपानें रंगभूमीवर येतांच महाराष्ट्रांतील शेंकडों टीकाकारांनीं या सामाजिक पुनर्विवाह-विषयक नाटकावर साधकबाधक टीकांचा वर्तमानपत्रांतून कल्पनातीत वर्षाव केला. त्या वेळीं गडकरी दररोज पहाटेस उठत आणि पुण्याच्या बुधवार चौकांत जाऊन सर्व वर्तमानपत्रांची खरेदी करून तीं घरीं आणून ठेवीत. संध्याकाळीं खाणावळींतून जेवून

आम्ही दोघेही घरीं आल्यावर गडकरी मला त्या पत्रांतील टीका वाचावयास सांगत. वाक्यार्थानुसार गडकऱ्यांच्या चेहऱ्यावर केव्हां आनंदाची, तर केव्हां किंचित् क्रोधाची, तर केव्हां विरल हास्याची छटा पसरलेली दिसत असे. मधून मधून गडकरी टीकेंतल्या सवालाला सडेतोड जबाब देण्याचा प्रयत्नही करीत असत. मध्येंच एकदम ओरडून मला विचारीत, " कोण हा अनुदार मनाचा टीकाकार ? काय म्हणतो ? "

" जी द्रुत गतीनें चालते ती द्रुमन असा अर्थ या शब्दाचा घ्याव-याचा कीं काय ? द्रुमन शब्दाची व्युत्पत्ति गडकरी सांगूं शकतील का ?"

गडकरी उद्गारले, " विशाल बुद्धिमत्तेच्या माणसा, दादोबांचें मोठें व्याकरण मन लावून आधीं वाच आणि मग गडकऱ्यांना द्रुमन या शब्दाचा अर्थ विचार. बरें, हा पुढें काय म्हणतो ? "

"पुनर्विवाहाला पाठिंबा देऊन आर्य–संस्कृतीला कायमची पुरून टाकण्याचा गडकऱ्यांनीं कसून प्रयत्न केला आहे. जन्माला येऊन गडकऱ्यांचें केवढें सार्थक झालें इ. इ." हें ऐकून गडकरी हसत म्हणाले, " हें पाहा, गडकऱ्यांचें सार्थक होणें गडकऱ्यांच्या स्वाधीन नाहीं; पण पुराणप्रिय माणसा, तुझें सार्थक तुझ्या असंबद्ध कल्पनेंत आहे हें खास." नंतर गडकरी मला म्हणाले, " तूं वाचावयाचें बंद कां केलेंस ? तो काय म्हणतो तें मला पुरतेपणीं कळूं तरी दे ! " मी म्हणालों, " यापुढील मजकूर इतका उद्वेगजनक आहे, कीं तो ऐकून तुमचें मन दुभंगून जाईल. इतक्या द्वेषबुद्धीनें टीका करण्यांत या टीकाकाराचा काय हेतु असावा बरें ? " गडकरी म्हणाले, " नामरूपें जगावें हाच; या टीकांच्या निव्वळ भडिमारानेंच माझ्या प्रेमसंन्यासाला जगाच्या बाजारांत माणिकमोत्यांचें मोल येणार आहे, समजलास ? बरें, आतां दुसऱ्या वर्तमानपत्रांतली टीका वाच पाहूं."

मीं टीका वाचावयाला प्रारंभ केला आणि म्हणालों, " मास्तर, हा टीकाकार विशेषतः तुमच्या वीणेच्या पाठीला लागलेला दिसतो."

गडकरी म्हणाले, “ माझी वीणा मोठी चतुर आणि धीट पोर आहे. ती कधींकाळींसुद्धां याच्या हातीं सांपडावयाची नाहीं, लक्षांत ठेव. तुझ्या या अविचारी टीकेच्या अपघातांचे अडथळे ओलांडून अल्पावधींतच माझ्या वीणेच्या आचाराविचाराच्या लाखों कुमारिका तुझ्या दृष्टीला पडतील ! ”

मीं पुन: वाचावयास सुरुवात केली. “ अहाहा ! साऱ्या कुमारिकांचीं लग्नें अशीं चोरून, आणि विधवांचीं लग्नें राजरोस होताहेत असा सोन्याचा दिवस आमच्या अज्ञानी समाजांत कधीं तरी उगवेल काय ? ” यावर बॅरिस्टर वसंतराव तिला सांगताहेत, “ लाडके, खात्रीनें उगवेल ! तुझ्यासारख्या देवी घरोघर पळूं लागून मनोधैर्य दाखवूं लागल्या तर काय नाहीं होणार ? ” टीकाकार, गडकऱ्यांना उद्देशून म्हणतो, “ काय या नाटककाराच्या या उदात्त कल्पना आहेत ! हिंदु समाजांतील कुमारिकांच्या शीलाला वाकडें वळण लावण्याचा केवढ्या नेटाचा प्रयत्न केला आहे हा ! धन्य आहे गडकरी तुमची ! तुमच्या विशाल बुद्धिमत्तेची तारीफ करावी तितकी थोडीच आहे. ” गडकरी मधेंच बोलले, “ माझ्या प्रेमळ पण वेडगळ मित्रा ! माझ्या बुद्धिमत्तेबद्दल तूं आपल्या कमकुवत बुद्धीला मुळींच शिणवूं नकोस ; माझ्या बुद्धिमत्तेची किंमत तुला दुर्दैवानें या जन्मीं तरी निदान न कळण्याइतकी आहे. दर दहा वर्षांनीं जगाच्या आचाराविचारांत केवढी क्रांति घडून येते इकडे लक्ष दे. म्हणजे अजाण माणसा, तुला कळून येईल, कीं गडकऱ्यांचीं आजचीं कल्पनाचित्रें-इच्छाचित्रें-उद्यांच्या जगांत असंभाव्य कोटींतलीं नाहींत. पुनर्विवाहाबद्दल आजचा तुझा दुराग्रह कालांतरानें आपोआप नष्ट होईल आणि या सुधारणेवरील माझे विचार तुला पथ्यकर वाटूं लागतील ! ”

## १४ गोकुळचा इतिहास

एका टीकाकारानें प्रेमसंन्यासांतील विनोदी पात्र गोकुळ याच्यावर

अस्वाभाविकतेचा दोषारोप केला आहे, तो अगदीं निराधार आहे हें पुढील गोष्टीवरून सहज कळून येईल.

गडकऱ्यांच्या गोकुळचा जन्म एके दिवशीं त्यांच्या पुण्याच्या राहात्या घरांतच झाला.

गडकऱ्यांना पत्रें लिहिण्याचा मनस्वी कंटाळा होता हें वाचून पुष्कळांना मोठें नवल वाटेल; त्याला माझा उपाय नाहीं. परंतु प्रत्यक्ष अनुभवानें मी सांगतों, कीं गडकऱ्यांचा जीवनक्रमच असा होता, कीं त्यांना 'मी कुशल आहें, तुमचें कळवावें,' हें लिहावयास सवडच नसे. अहोरात्र लेखनवाचन, प्रत्येक क्षणाला त्यांच्या बुद्धिकोशांत जन्मणाऱ्या अद्भुतरम्य कल्पनांचें टिपण करून ठेवणें, ह्या उद्योगांत त्यांचा बहुतेक वेळ जात असे. तथापि वर्षांतून एखादे वेळीं पत्रें लिहिण्याचा अनिवार्य प्रसंग त्यांच्यावर येई.

## बारा पत्रें

अशाच एका प्रसंगीं गडकऱ्यांनीं एकाच वेळीं दहा-बारा पत्रें लिहिलीं आणि तीं पुण्याच्या बुधवार पेठेंतील पोस्ट ऑफीसच्या पत्रांच्या पेटींत टाकण्यासाठीं त्यांनीं त्यांच्या गांवच्या एका मित्राला सांगितलें. पत्रें फारच महत्त्वाचीं आहेत. तीं न विसरतां पेटींत टाका म्हणून गडकऱ्यांनीं त्याला बजावून सांगितलें. काळजी करूं नका, मी दुसरीकडे कोठेंही जाण्यापूर्वीं पत्रें पोस्टांत टाकतों असें म्हणून तो इसम घराबाहेर पडला. या गोष्टीस आठ-दहा दिवस झाले तरी गडकऱ्यांना कोणाकडूनही उत्तर आलें नाहीं. या गोष्टीचें गडकऱ्यांना नवल वाटलें. पुढें दहा-बारा दिवसांनीं तो इसम पुनः गडकऱ्यांकडे आला. त्याला पाहातांच गडकऱ्यांना त्या पत्रांची आठवण झाली आणि लागलीच त्यांनीं त्याला विचारलें, "मीं त्या दिवशीं दिलेलीं पत्रें तुम्हीं नीट पोस्टांत टाकलीं ना ?" तोंड वेडेंवाकडें करून आपल्या कोटाच्या खिशांतून बाहेर काढून त्यानें तीं पत्रें गडकऱ्यांपुढें टाकलीं आणि म्हणाला, "रामभाऊ, क्षमा करा. मोठा अपराध घडला.

बुधवारपेठेंतून पोस्टऑफिसकडे जातांना मला माझ्या गांवचे कांहीं स्नेही भेटले. बोलत बोलत त्यांच्याबरोबर मी शिंद्याची छत्री पाहावयास गेलों आणि तेथून तसाच गांवीं गेलों. तुमच्या पत्रांची तुम्ही मला आतां त्याबद्दल प्रश्न करीपर्यंत आठवणच राहिली नाहीं. रामभाऊ, मी कांहीं इतका विसराळू नाहीं; पण हें कसें काय झालें तें कळत नाहीं. बरें, पण रामभाऊ, हीं पत्रें न गेल्यामुळें तुमचें कांहीं नुकसान तर झालें नाहीं ना ?"

गडकरी म्हणाले, "माझ्या ठिकाणीं दुसरा कोणीही असता तर त्याचें कधींही न भरून येणारें नुकसान झालें असतें. परंतु ह्या तुमच्या अलौकिक विसराळूपणामुळें माझ्या बाबतींत त्याच्या अगदीं उलट झालें आहे."

त्या इसमानें विचारिलें, "तें कसें काय ?"

गडकरी उद्गारले, "भल्या माणसा, तूं माझ्यावर केवढा उपकार केला आहेस ! फूल नाहीं फुलाची पाकळी या न्यायानें तुझ्या अद्वितीय विसराळूपणाचें मनोहर चित्र मी रेखाटीन."

आपल्या विसराळूपणाबद्दल गडकऱ्यांना अभिमान वाटतो, हें समजून येतांच त्या इसमाच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. झालें. अशा रीतीनें प्रेमसंन्यासांतलें हें अद्वितीय रत्न, गोकुळ नामें जन्माला आलें.

## १५ राम गणेश गडकऱ्यांना मी ओळखतों

एकदां गडकरी रेल्वे मार्गानें जळगांवाहून मुंबईला येत होते, त्या वेळीं त्यांच्या डब्यांत एक तीस–बत्तीस वर्षें वयाचा मनुष्य एक इंग्रजी कादंबरी वाचीत पडला होता. त्याच्या पायांजवळ एक मासिक मनोरंजनचा अंक व दोन तीन मराठी वर्तमानपत्रांचे अंक पडले होते. रात्रीं १०।११ च्या सुमाराला डब्यांतील बहुतेक उतारू निद्रावश झाले होते. गडकरी प्रवासांत कधींही निजत नसत आणि म्हणून गडकऱ्यांनीं त्या कादंबरी वाचणाऱ्या गृहस्थाला ओळख नसतांनाही

मोठ्या कळकळीनें विचारलें, "तुम्हांला कुठें जायचं आहे ?"

हातांतील कादंबरी बाजूला ठेवून त्या गृहस्थानें कांहीं वेळ गडकऱ्यांकडे जरा साशंक मुद्रेनें पाहिलें आणि नंतर तो म्हणाला, "मला ठाण्यास जायचं आहे." गडकरी म्हणाले, "ठीक; मला मुंबईला जायचं आहे. ठाणें आणि मुंबई यांत फारसं अंतर नाहीं. कांहीं तरी वाचायला पाहिजे. तेवढा तो मनोरंजनचा अंक इकडे करा पाहूं."

त्या गृहस्थानें तो अंक गडकऱ्यांच्या पुढें केला. कांहीं वेळानें तो गडकऱ्यांना म्हणाला, "त्या अंकांत वाचण्यासारखं कांहींच नाहीं; अलीकडे मनोरंजनांत फारच भिकारडे लेख येऊं लागले आहेत. कवितासुद्धा घाणेरड्या. गोष्टीसुद्धा वेड्यावाकड्या. एक ना धड आणि भाराभर चिंध्या." ही या गृहस्थाची बडबड ऐकून, त्याच्या मूर्खपणाचा पारा कोणत्या डिग्रीवर आहे हें शोधून काढावयाचें गडकऱ्यांनीं ठरविलें. रागाचा आविर्भाव आणून गडकरी बोलले, "हें पाहा, तुम्ही आतां जें बोलतां तें अगदीं चुकीचं आहे. आहाहा! यांतला हा पहिलाच लेख किती सुंदर आहे! तशीच गोविंदाग्रजांची 'गुलाबी कोडें' ही कविता किती चटकदार आणि हृदयंगम आहे!"

यावर तो गृहस्थ क्रोधानें लाल होऊन म्हणाला, "अहो, 'गुलाबी कोडें' ही का कविता आहे ? नीट वाचून बघा. काय ही ओळ 'ही जादूची नजरबंदी कुणी कधीं कशी केली ?' वा रे कवि, वा रे प्रसिद्ध करणारा मासिकाचा संपादक! गोविंदाग्रजानें शेवटल्या ओळींत तर आपल्या मूर्खपणाची कमालच केली आहे. म्हणे, 'गुलाब टाकुनि गुलाबास कां मग नच उडवावें' त्या मूर्खालाच प्रथमतः फेकून वर उडवावं ?"

वाह्यात्कारी रागाच्या आवेशानें गडकरी म्हणाले, "गोविंदाग्रजांच्या कवितांना तुम्ही नांवं ठेवूं लागलांत तर सारी दुनिया तुम्हांला नांवं ठेवील. गोविंदाग्रज हा कोण आहे ? कवींचा कवि—निदान महाराष्ट्राचा

महाकवि—आहे." तो गृहस्थ अधिक उसळून म्हणाला, "हें पाहा, त्या गोविंदाग्रजाला मी चांगला ओळखतों. तो आणि मी बाळपणींचे सोबती आहोंत; बोला आतां; लोकांच्या सांगण्यावरून त्याच्याबद्दल कांहीं अव्वाच्या सव्वा थापा झोकूं नका. अहो, हा गोविंदाग्रज एकसारखा दहा वेळां प्रवेशपरीक्षेला बसला. शेवटीं परीक्षकांनीं त्याची चिकाटी पाहून त्याला तसाच अकराव्या वेळीं उचलून पास केला. अहो, त्यानें आतां वेड्यावाकड्या चार ओळी खरडल्या म्हणजे का तो कवि झाला? 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये!' आहे काय आणि नाहीं काय. बोला आतां. तुम्ही काय त्या गोविंदाग्रजाची प्रौढी मजजवळ मिरवावी?"

गडकऱ्यांचा आपल्या मनावर किती विलक्षण दाब होता, हें या सत्यकथेवरून सहज कळून येईलच. ह्या प्रसंगीं गडकऱ्यांना आपलें हसूं कसें आवरतां आलें याची कल्पनाच करतां येत नाहीं. बऱ्याच वेळानें तो गृहस्थ गडकऱ्यांना म्हणाला, "मी गोविंदाग्रजाचा म्हणजे माझ्या बाळपणींच्या दोस्ताचा खराखुरा इतिहास तुम्हांला सांगितला यांत तुम्हांला विषाद वाटण्याचं कारण नाहीं. गोविंदाग्रज माझा दोस्त तरी आहे, पण तुमचा तो तर कोणीच नाहीं."

गडकरी उसासा टाकून म्हणाले, "अहो, तुम्हीं सांगितलेला इतिहास हा खरोखरीच गोविंदाग्रजाचा आहे का विस्मरणामुळें एखाद्या नामांकित मूर्ख मनुष्याचा इतिहास गरीब गोविंदाग्रजाच्या माथीं मारला आहे?"

गडकरी व तो गृहस्थ कांहीं वेळ एकमेकांकडे अगदीं निश्चल दृष्टीनें पाहात होते. अगदीं एकेरीवर येऊन तो गृहस्थ गडकऱ्यांना बोलला, "मी गोविंदाग्रजाला ओळखतों, असं बोललों, म्हणून त्यांत तुमच्याकडे काय कमीपणा येतो? तुमच्याइतका हेकेखोर आणि हटवादी मनुष्य मीं दुसरा कोणताही पाहिला नाहीं. चार घटका मौजेच्या भाषणांत एवढा दुराग्रही स्वभाव काय कामाचा? येतां का

माझ्याबरोबर पुण्याला गोविंदाग्रजाकडे ? कल्याणला आपण दोघेही उतरूं आणि सकाळची पुण्याची गाडी गांठूं. प्रत्यक्ष पुराव्यानं तुमची खात्री करून देतों. आतां तर याला तुमची हरकत नाहीं ना ?"

गडकरी उद्गारले, "तुम्हांला माझ्या सामर्थ्याची कल्पना नाहीं. मनांत आणीन तर आणखी दोन तासांनीं पुण्याच्या त्या गोविंदाग्रजाची आणि तुमची भेट मी ठाण्याच्या स्टेशनवरसुद्धा करवीन."

तो गृहस्थ हसून म्हणाला, "तुम्ही काय बोलतां तें तुमचं तुम्हांला सुद्धा पटण्यासारखं नाहीं. तुम्हीं काय मंत्रसामर्थ्यानं गोविंदाग्रजाला पुण्याहून ठाण्याला आणणार ?"

गडकरी म्हणाले, "आतां त्याचा वाद कशाला ? सामानसुमान नीट आवरा. ठाणें स्टेशन जवळ येत चाललं आहे."

तो गृहस्थ म्हणाला, "ठीक आहे. पण तो गोविंदाग्रज कुठें आहे ?"

गडकरी म्हणाले, "हा पाहा, ज्याला मी तुमच्यापेक्षां अधिक ओळखतों तो हा गोविंदाग्रज !"

## १६ जगांतील एक मोठा बातमीदार

पुण्याला किर्लोस्कर थिएटरजवळ एक मोठें नांवाजलेलें हेअर कटिंग सलून होतें. त्या ठिकाणीं बहुतेक कॉलेजांतील विद्यार्थी, पांढरपेशे लोक केस कापावयास येत असत. या सलूनमध्यें गडकरीही जात असत. सलूनचा मुख्य मालक फारच चाणाक्ष असल्यामुळें तो तेथें येणारांची माहिती वाटेल त्या साधनांनीं मिळवीत असे. प्रत्येकाच्या पश्चात् तेथें येणाऱ्या दुसऱ्या माणसाला त्याची माहिती विचारीत असे. मिळालेल्या माहितींतल्या खऱ्याखोट्याची वजाबाकी करून खरी नोंद तो आपल्याजवळ ठेवी. ही गोष्ट गडकऱ्यांच्या ध्यानीं येतांच गडकऱ्यांनीं ठरविलें, कीं याच सलूनमध्यें नेहमीं केस कापावयास जावयाचें. या ठिकाणीं गडकऱ्यांना आपल्या नाटकां-

विषयीं लोकांचीं बरींवाईट मतें कळत असत. गडकरी एकदा म्हणाले, "आतां मला वर्तमानपत्र विकत आणून वाचावयाची जरूरी नाहीं. जगांतील मोठा बातमीदार – पुण्याचा प्रख्यात नापित – माझ्या हातीं सापडला आहे !"

# बालकवि ठोमरे आणि गडकरी

## १७ बालकवि ठोमरे

गडकऱ्यांचा आणि बालकवि त्र्यंबक बापूजी ठोमरे यांचा स्नेह किती जिव्हाळ्याचा होता, हें निदान महाराष्ट्रीय वाचकांना नव्यानें सांगावयास नकोच. ब्रह्मानंदांत बुडालेल्या प्रेमसंन्यासांतल्या जयंताच्या मुखांतून निघालेले 'आनंदी आनंद गडे ! इकडे तिकडे चोंहिकडे !!' हे बालकवींच्या आनंदीआनंदाचे बोल, वरील विधानाची प्रत्यक्ष साक्ष आहेत. गडकरी नेहमीं म्हणत असत, कीं "कवितेकडे माझ्या मनाचा कल इतक्या जोमानें जो वळला, तो केवळ बालकवींच्या प्रेमळ आग्रहामुळेंच.'

### एके दिवशीं सकाळीं

एके दिवशीं सकाळीं ठोमरे गडकऱ्यांच्या घरीं आले, त्या वेळीं गडकरी नुक्तेच उठून विडी ओढीत वसले होते. बालकवींना पाहातांच गडकरी उद्गारले, 'आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोंहिकडे !'

चहापान झाल्यावर थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्या. त्यानंतर बालकवि गडकऱ्यांना म्हणाले, "मास्तर, तुम्ही 'राजहंस माझा निजला' या कवितेंत गरीब आईचं हृदयचित्र यथार्थ रेखाटलं आहे. ही कविता वाचतांना एकदम अंत:करणांतून उसळून येऊन डोळ्यांवाटे वाहाणारा अश्रूंचा पूर मला थोपवतां येत नाहीं. पाषाणहृदयी माणसालासुद्धा दयेचा पाझर फुटलाच पाहिजे अशी दैवी प्रतिभा 'राजहंस माझा निजला' या कवितेंत आहे."

गडकरी हसून म्हणाले, "आज माझ्या कवितेची प्रशंसा करावयाची हें ठरवून तुम्ही इथें आलां आहांत असं वाटतं. कांहीं का असेना, बालकवि, मला तुमच्याच कविता फार आवडतात. तुमच्या कवितेंतलं नादमाधुर्य कुठें आणि माझी साधी कविता कुठें ? मातेचं प्रेम कसं असतं एवढंच शब्दचित्र मी त्यांत रेखाटलं आहे. 'साक्षात् विषारी नागिणीसुद्धा आपल्या पिलांना दूधच पाजितात' हें माझ्या गर्वनिर्वाण नाटकांतलं वाक्य मातृहृदयाची यथार्थ कल्पना आणून देणारं आहे; मी हुबेहूब चित्रं रेखाटतों, पण त्यांत तुमचं नादमाधुर्य कुठं आहे ? बालकवि मला जे आवडतात ते याच गुणामुळें !"

बालकवि उद्गारले, "मास्तर, माझ्या तोंडावर माझी स्तुति चालल्यामुळें मी मात्र ओशाळलों आहें. आपण आतां जरा बाहेर हिंडून येऊं चला !"

गडकऱ्यांच्या प्रेमळ स्वभावाची, विनयशील वृत्तीची कल्पना या गोष्टीवरून कोणालाही करतां येण्यासारखी आहे.

## १८ मी कामांत आहें

गडकऱ्यांच्या स्वभावाबद्दल पुष्कळांचा गैरसमज झालेला आहे. खरोखरी पाहातां गडकरी हे किती उदार, मनमिळाऊ, प्रेमळ, विनयशील आणि मनानें थोर होते, हें शब्दांनीं सांगण्यापेक्षां त्यांच्या आठवणींच्या ओघानेंच कळून येणें अधिक चांगलें. प्रेमसंन्यास नाटकानंतर गडकऱ्यांचा मित्रपरिवार कल्पनातीत वाढला आणि त्यामुळें त्यांच्या लेखनव्यवसायांत फार व्यत्यय येऊं लागले. लेखनव्यवसाय हें आपलें जीवित असा मनोनिग्रह करून, पोटापाण्याचा प्रश्न बाजूला सारून गडकऱ्यांनीं मनोभावानें महाराष्ट्र-शारदेची पूजा बांधावयास सुरुवात केली. अष्टौप्रहर विचारांची समाधि लावून बसलेले गडकरी, व्यवहारी आयुष्याला जवळ जवळ मुकलेच होते, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. अशा वेळीं जर कोणी एखाद्यानें त्यांचा समाधिभंग

केला, तर ते त्याला तोंड टाकून बोलत असत हें मी अनुभवानें सांगतों. अशा घडलेल्या प्रकाराबद्दल त्यांना कांहीं वेळानें वाईट वाटे; परंतु 'माझ्या या कठोरपणांतूनच, माझे सुंदर ताजमहाल बाहेर पडावयाचे आहेत,' असें म्हणून गडकरी आपलें समाधान करून घेत. असले वाईट प्रसंग टाळण्याकरितां गडकऱ्यांनीं

**"मी कामांत आहें"**

अशी एक पाटी आपल्या घराच्या मुख्य दरवाजावर लाविली होती; परंतु या पाटीचा विशेष उपयोग झाला असें मला कधींच आढळून आलें नाहीं.

## १९ वेडा कवि गोविंदाग्रज

मी पुण्याला असतां एके दिवशीं रविवारीं गडकरी माझ्याकडे भोजनास यावयाचे होते. माध्यान्ह काल झाला, तरी गडकऱ्यांचा पत्ता नाहीं म्हणून मी त्यांच्याकडे जावयास निघालों, तों अर्ध्या वाटेंत त्यांची व माझी गांठ पडली. गडकरी म्हणाले, "वेळ फार झाला बोवा. वाचनाच्या नादांत भुकेची दादही लागली नाहीं. चल लौकर, घरच्या मंडळीचा खोळंबा नको !"

लगबगीनें वाड्याच्या फाटकांतून आम्ही दोघेही आंत शिरतों तोंच सुमारें आठ वर्षें वयाची माझी धाकटी वहीण वत्सला ही मोठ्यानें ओरडून म्हणाली, "आई ग, लौकर पाटपाणी मांडण्याची व्यवस्था कर ! हा पाहा दादा आणि वेडा कवि गोविंदाग्रज आले !"

तिचे हे शेवटचे शब्द माझ्या कानीं पडतांच मी एकदम स्तंभितच झालों ! गडकऱ्यांनीं हे शब्द ऐकले. आतां गडकऱ्यांजवळ कशी बतावणी करावी तें कळेना.

'आलीया भोगासी असावें सादर' असें म्हणून मी गडकऱ्यांना माडीवर दिवाणखान्यांत बसवून खालीं आलों आणि वत्सलेला रागें भरलों.

वाटून होतांच गडकऱ्यांना खालीं बोलावण्यासाठीं मी पुन्हा माडीवर जातांच ते मला म्हणाले, "काय रे, ही तुझी बहीण वत्सला काय शिकते ?"

"ती मराठी तिसऱ्या इयत्तेंत आहे." मी उत्तरलों.

**गडकरी**: हुषार दिसते आहे मुलगी. शाळेंत नेमलेल्या एकच भिकारी पुस्तकाशिवाय ती इतर मराठी पुस्तकं वाचते असं मला वाटतं.

**मी**: छे छे ! तिला कसलं एवढं वाचतां येतं ?

**गडकरी**: तुझा समज चुकीचा आहे; ती मासिक मनोरंजन वाचते हें निर्विवाद.

**मी**: कशावरून ?

**गडकरी**: मला पाहातांच, 'वेडा कवि गोविंदाग्रज' असं आतांच ती बोलली त्यावरून.

**मी**: ती मूर्ख मुलगी एकदम असं कां बोलली तें मला कळत नाहीं. मास्तर, तुम्हांला राग नाहीं ना आला ?

**गडकरी**: वत्सलेवर रागवायचं म्हणजे माझीच मूर्खांत जमा झाली पाहिजे. रागवायचं ठरलं, तर मी काशीनाथपंत मित्रांच्यावर रागवेन. वेडा ह्या शब्दाच्या अगदीं खालीं त्यांनीं कवि गोविंदाग्रज हीं अक्षरं कां छापलीं ? या चुकीमुळें माझं नांव वेडा कवि गोविंदाग्रज आहे अशी सरळ समजूत वत्सलेची झाली. मी कोणत्याही पुस्तकांतलं अक्षरन् अक्षर किती सूक्ष्म दृष्टीनं वाचतों आणि पाहातों हें लक्षांत ठेव !

## २० एक मौजेचा प्रसंग

एकदा उन्हाळ्याच्या रजेंत कै. तात्यासाहेब कोल्हटकर खामगांवहून पुण्यास आले होते. त्या वेळीं त्यांना आणि इतर साहित्यसेवकांना एका धनाढ्य गृहस्थानें आपल्या घरीं भोजनाचें आमंत्रण दिलें होतें. साहित्यसेवकांत प्रामुख्यानें कै. तात्यासाहेब

कोल्हटकर, अ. व. कोल्हटकर, गडकरी, नाथमाधव हे होते. यजमानानें या सर्व सुशिक्षित पाहुण्यांची व्यवस्था उत्तम प्रकारें ठेविली होती. या प्रसंगीं इतरही गांवची निवडक मंडळी भोजनास बोलाविली होती. पंक्तीला नामांकित लेखकांचा समूह पाहून आपल्या कर्णकठोर आवाजांत एका वयोवृद्धानें भला मोठा लांबलचक श्लोक म्हणावयास सुरुवात केली. श्लोकाचा प्रत्येक चरण चार चार वेळ घोळून तो म्हणूं लागला. म्हाताऱ्याचा श्लोक लवकर आटोपेना आणि पंक्तींतल्या मंडळींना पानांवरून उठतां येईना. सरते शेवटीं कै. तात्यासाहेब कोल्हटकरांनीं वाढप्याला हाका मारून सांगितलें, "या म्हाताऱ्याच्या श्लोकाला चरण तरी किती आहेत तें त्याला विचारून मला सांग. पानावर किती वेळ आम्हीं हात जोडून बसायचं ?"

गडकरी एकदम ओरडून म्हणाले, "ए वाढपी, थांब. माझं ऐक. त्या म्हाताऱ्याच्या श्लोकाला किती चरण आहेत हें विचारण्यापूर्वी तूं त्यालाच किती चरण आहेत तें पाहून आम्हांला सांग !"

## २१ गडकरी आणि शाकुंतल

महाकवि कालिदास याच्या संस्कृत शाकुंतलाविषयीं कोणी नुसता उल्लेख केला तरी गडकऱ्यांना स्वर्गीय सुखाचा लाभ झाला असें वाटे. भारतांतील मूळ कथाभाग मनोवेधक तर खराच, परंतु आपल्या अलौकिक कल्पनाचातुर्यानें कालिदासानें त्यांत जी फिरवाफिरव केली आहे, ती त्याहूनही अपूर्व आहे आणि म्हणून नेहमीं गडकऱ्यांच्या तोंडीं "काव्येषु नाटकं रम्यं तत्रापिच शकुंतला" ही उक्ति असावयाचीच. गडकरी म्हणत असत, "जन्माला येऊन ज्यानें कालिदासाचं शाकुन्तल नाटक अभ्यासिलं नाहीं, तो जगांतल्या रमणीयतेला जिवंत असूनही मेल्यासारखा म्हणून निर्विवाद मानावं."

एकदा बालकवि ठोमरे आणि गडकरी शाकुंतलांतील पुढील वाक्यांविषयीं बोलत बसले होते—

**सख्यौ** : आर्य असंभावित सत्कारं भूयोऽपि प्रेक्षणनिमित्तं लज्जावहे आर्य विज्ञापयितुम् ।

**राजा** : मामैवम् । दर्शनेनैव भवतीनां पुरस्कृतोऽस्मि ।

**शकुंतला** : ( राजानमवलोकयन्ती सव्याजं विलंब्य सहसखाभ्यां निष्क्रान्ता । )

**गडकरी** : बालकवि ! ह्या कालिदासाच्या शब्दचित्रावरून अण्णा किर्लोस्करांनीं किती हृदयंगम चित्र रेखाटलं आहे तें पाहा. अण्णांनीं शकुंतलेच्या तोंडीं—

सखये अनसूये थांब किं ग बाई ॥
येतें मी अशी कां घाई ॥ ध्रु० ॥
रुतला दर्भांकुर माझे ग पायीं ॥
तो दुःसह मजला होई ॥
साडी कोरांटीस गुंतुनि जाई ॥
सोडवितें तोंवर राही

हें पद घातलं आहे. पायांत दर्भाचा कोंब रुतला आहे, कोऱ्हांटीच्या डाहाळीला साडीचा पदर अडकला आहे, हें ढोंग करून शकुंतला आपल्या जिवलग सख्यांना फसवते आहे आणि संधि साधून दुष्यंताकडे चोरट्या नजरेनं पाहाते आहे. हें स्वभावसरल स्त्रीमनोधर्माचं कौशल्य किती मनोहर आहे ! तें कांहीं नाहीं. हेंच खरं, कीं काव्येषु नाटकं रम्यं तत्रापिच शकुंतला !

**बालकवि** : अगदीं खरं. मास्तर, कालिदासाचं शाकुंतल नाटक म्हणजे त्याच्या काव्याचा उत्कर्षच.

**गडकरी** : तसं नाहीं. शाकुंतल हें जगांतलं काव्यसौंदर्य आहे. मानवी स्वभावाची स्वाभाविकता कुठें पाहावयाची असेल तर ती एका शाकुंतलांतच सापडेल. त्या काळच्या काश्यपाची विमल विचार-सरणी आजच्या काळींही लागू पडते आहे. एक ना दोन, असे हजारों गुण शाकुंतलांत सामावलेले आहेत. कविश्रेष्ठ कालिदासा, तूं धन्य

आहेस ! सृष्टीचा लय होईपर्यंत तुझं काव्य जिवंत राहील यांत मुळींच संदेह नाहीं.

**बालकवि** : मास्तर, वेळ बराच झाला. जातों मी आतां. पुन: केव्हां तरी आपण या विषयावर बोलत बसूं.

**गडकरी** : बरं आहे. खरं पाहिलं असतां, शाकुंतल नाटकावर रात्रंदिवस बोलत बसलं पाहिजे.

## २२ गडकरी आपलीं नाटकें कशीं लिहीत असत ?

प्रत्यहीं घडणाऱ्या गोष्टींकडे गडकरी सूक्ष्म दृष्टीनें पाहात असत. तसेंच जी प्रकृति रेखाटावयाची तिच्या अंत:करणांत शिरून सर्व गूढ विचार हुडकून काढूनच ते आपलें लेखन करीत असत. या विलक्षण अंत:करणग्राहित्वामुळें त्यांच्या नाटकांत अनेकविध प्रकृतिज्ञान आढळून येतें. कमलाकर, वृंदावन, घनश्याम आणि तळिराम हीं स्वभावचित्रें एकाच लेखकानें निर्माण केलीं असावींत किंवा लीला, कालिंदी, वसुंधरा आणि सिंधु या नायिका एकाच कल्पनेंतून बाहेर पडल्या असाव्यात, हें परम आश्चर्य नव्हे का ? स्वभाववैचित्र्यवर्णन हा गुण गडकऱ्यांच्या लेखनांत पूर्णत्वानें भरलेला आहे, हें कोणालाही दिसून येईल. प्रकृतीशीं तदाकार होऊन गडकरी कसें लिहीत असत हें पुढील प्रसंगांवरून वाचकांना सहज कळून येईल.

### अजब प्राणी

एके दिवशीं रात्रीं मी व माझे एक स्नेही कृष्णाजी श्रीधर गानू प्रवेशपरीक्षेच्या तयारीसाठीं आठवल्यांच्या ऑलजिबऱ्यामधील कांहीं निवडक उदाहरणें सोडवीत बसलों होतों. इतक्यांत तेथें गडकरी आले. पण नेहमींप्रमाणें ते त्या वेळीं हसतमुख नव्हते हें चटकन आमच्या दोघांच्याही लक्षांत आलें. कोणाशीं भाषण नाहीं, कांहीं नाहीं. मुकाट्यानें खिडकीशीं बराच वेळ गडकरी विचार करीत उभे होते. मीं मनांत म्हटलें, 'कोणत्या तरी कल्पनापिशाच्च्यानं आज या

अपरात्रीच्या वेळीं गडकऱ्यांना पुरं पछाडलेलं दिसतं.' मी हळू स्वरांत म्हणालों, "कृष्णा, मास्तर एक अजब मनुष्य आहे. नुसत्या कल्पनेच्या काहुरामुळें या मनुष्याची काय दशा झाली आहे ही! मुद्रेवर क्रूरतेची लाली चढली, दृष्टि भयाण दिसूं लागली, पाऊल जड झालं, आनंदवृत्ति पार मावळली. किती विचित्र वृत्तीचा मनुष्य आहे हा!"

**कृष्णा**: मास्तर एक अजब प्राणी आहे हें तुला फार उशिरां समजलं; प्रथम भेटीलाच गडकऱ्यांचा हा स्वभाव माझ्या लक्षांत आला. नेहमींच्या त्यांच्या वागणुकीवरूनच पाहा. नियमितपणा ही काय चीज आहे हें गडकऱ्यांनां मुळींच माहीत नाहीं. रात्र असो, अपरात्र असो, लहरीप्रमाणें वाचन करीत बसायचं, बाहेर फिरायला जायचं किंवा लिहीत बसायचं हा गडकऱ्यांचा अनिश्चित कार्यक्रम आपल्याला माहीत आहेच. आजचा कार्यक्रम जरा निराळा दिसतो खरा. ते पाहा, गडकरी आपल्या मनाशीं कांहीं तरी पुटपुटताहेत. आजची रात्र आपल्याला जागूनच काढली पाहिजे. गडकऱ्यांच्या मनाला कसला तरी जबरदस्त धक्का बसला असावा असं त्यांच्या या वेळच्या मुद्रेवरून वाटतं."

## २३ वृंदावनाचा संचार

याप्रमाणें आमचें बोलणें चाललें असतां खिडकीकडे तोंड करून गडकरी चांचरत चांचरत बोलूं लागले. "दीनाराचे प्राण आतां कंठाशीं आले आहेत. एकदा ही कट्यार त्याच्या पोटांत शिरली, म्हणजे तिला सुखानं बाहेर काढणं काळाच्याही हातीं राहाणार नाहीं. नाहीं ऐकत तूं? डोळे फाडून नीट पाहा ही कट्यार. कोण तूं? कालिंदी, काय म्हणतेस? हा आपला केतन आहे. केतनाची काय किंमत! लाथेनं त्याला असा उडवून टाकीन." हीं वाक्यें ऐकून आश्चर्यानें आणि भीतीनें मी अगदीं गांगरून गेलों. दिव्याची ज्योत जरा मोठी करून गडकरी लिहीत बसले. सुमारें तीन तासांनीं म्हणजे पहाटेला सहाच्या सुमाराला लिहिणें पुरें करून गडकरी चहा पिण्याकरितां

घराबाहेर पडले. एका सेकंदाचाही विलंब न करतां, गडकऱ्यांनीं वहींत जें काय लिहिलें होतें, तें मी वाचावयास लागलों. लौकरच माझ्या लक्षांत आलें, कीं हें पुण्यप्रभावांतल्या घोर विचाराचा निश्चय केलेल्या वृंदावनाचें स्वभावचित्र गडकऱ्यांनीं रेखाटलें आहे.

## २४ गडकऱ्यांचें मन गहिंवरलें आणि देहूबाळ जन्मास आलें.

गडकरी स्वभावतः फारच प्रेमळ असल्यामुळें, त्यांच्याकडे गरीब, श्रीमंत, साक्षर-निरक्षर, लहान-मोठे सर्व प्रकारचे लोक येत असत. गडकरी नेहमीं म्हणत असत, "माझी पूर्वपुण्याई थोर म्हणूनच माझ्यासारख्या विषम स्थितींतल्या मनुष्याला हा बहुजनसहवासलाभ प्राप्त होतो आहे. भक्तिभावानं माझ्या घरीं येणाऱ्या या माझ्या प्रेमळ बंधूंची माझ्या कोमल हृदयांत सुंदर सांठवण मला केलीच पाहिजे."

गडकऱ्यांच्या या वचनाची सत्यता त्यांच्या राजसंन्यासांतील देहू दप्तरीच्या पुढील जन्मकथेवरून वाचकांच्या प्रत्ययाला येईल.

### देहूची सत्यकथा

पुणें येथें नारायणपेठेंत एक सुखवस्तु गृहस्थ राहात असत. त्यांना तीन मुलगे आणि दोन मुली होत्या. वडील मुलानें वकिलीच्या धंद्याला नुकतीच सुरुवात केली होती. दुसरा मुलगा कॉलेजांत सीनियर बी. ए. च्या वर्गांत शिकत होता आणि तिसरा मुलगा बंडू हा मराठी चौथ्या इयत्तेंत चार वेळ नापास झाल्यामुळें शाळा सोडून घरीं बसला होता. बंडूपेक्षां वयानें बऱ्याच लहान असलेल्या दोन्ही मुली मुलींच्या हायस्कुलांत शिकत होत्या. बंडूच्या आईबापांनीं, भावांनीं, वहिणींनीं आणि इतर परिचित माणसांनीं त्याचें लक्ष विद्येकडे लागावें म्हणून आपली पराकाष्ठा केली. परंतु बंडूचें मन विद्येकडे पुनरपि वळलें नाहीं. अभ्यासाच्या काळजीनें आपली बहुमोल काया करपवून टाकण्यापेक्षां आखाड्यांत उड्या मारून शरीर कमावणें हेंच अधिक शाहाणपणाचें आहे असें बंडूचें अगदीं ठाम मत होतें. अल्पावधींतच बंडू प्रसिद्ध पहिलवानांत मोडूं लागला. विद्याहीन म्हणून घरची मंडळी बंडूचा

हळूहळू तिरस्कार करूं लागली. सर्व दिवसभर शहरांतून उनाड पोराप्रमाणें भटकावें, दंगलींत तांबड्या मातींत लोळावें, मनसोक्त खावें, प्यावें, हाच काय तो बंडूचा आयुष्यक्रम होऊन बसला. बंडूच्या ह्या उनाड वर्तनामुळें त्याच्या वडिलांना त्याचा मनस्वी राग आला. संतापाच्या भरांत त्यांनीं बंडूचा हात धरून त्याला बाहेर हाकलून दिलें. ह्या घराची पायरी पुन्हा चढणार नाहीं अशी बंडूनेंही त्याच वेळीं शपथ घेतली. या प्रसंगीं एखाद्या शहाण्या मनुष्याचा सल्ला घ्यावा म्हणून बंडूनें गडकऱ्यांच्या घराचा रस्ता धरला. कर्मधर्मसंयोगानें गडकरी या वेळीं स्वस्थचित्तानें विडी ओढीत बसले होते.

**गडकरी** : बंडू, तूं असा कावराबावरा कां दिसतो आहेस ?

**बंडू** : मास्तर, तसंच कांहीं कारण झालं आहे आणि म्हणून तर मी तुमच्याकडे आलों आहें.

**गडकरी** : वेड्या, मीं पंचाक्षरी आहें म्हणून तुला कुणीं सांगितलं ?

**बंडू** : तसं नाहीं हो. मी आज मोठ्या संकटांत आहें. मला एका महत्त्वाच्या बाबतींत तुमचा योग्य सल्ला पाहिजे. तुमच्यावर माझा पूर्ण भरंवसा आहे.

**गडकरी** : ( घाबरून ) बंडू, तूं कुणाचा घातपात करून इथें आला आहेस ? बोल. कोणत्या संकटांत आहेस ? तुझ्या नजरेंत ही एवढी चलबिचल कां दिसते आहे ?

**बंडू** : मास्तर, माझ्या येण्यामुळें तुम्हांला भीति वाटते ? तुम्हांला माझं संकट काय आहे तें आधीं सांगायला पाहिजे होतं, म्हणजे तुम्ही इतके साशंक झालां नसतां. हें पाहा मास्तर, माझ्या वडलांनीं आज मला घराबाहेर हाकलून दिलं आहे. आतां पुढें काय करावं तें कळत नाहीं आणि म्हणून तुमचा सल्ला घ्यावयास मी आलों आहें.

**गडकरी** : ( हसून ) बंडू, तूं माझ्यापेक्षांही अधिक भित्रा माणूस आहेस. बरं, कोणत्या कारणावरून तुला घरांतून हाकलून दिलं ?

**बंडू** : मास्तर, याला काय कारण झालं असावं असं तुम्हांला वाटतं?

**गडकरी** : कारण? एकच आणि तेंसुद्धा तुझं अज्ञान.

**बंडू** : मास्तर, अगदीं बरोबर बोललांत. मास्तर, तुमच्या बुद्धीची किती तारीफ करूं आणि किती नाहीं असं मला झालं आहे.

**गडकरी** : वेड्या, यांत कसली तारीफ करायची? ज्या पुरुपाला विद्या नाहीं त्याला कुठेंही मान नाहीं हें ब्रह्मवाक्य आहे.

**बंडू** : मास्तर, हें जर खरं आहें, तर मग त्या छत्रपति शिवाजीला एवढा मोठा मान कसा मिळाला? शिवाजीला तर आपली सहीसुद्धा करतां येत नव्हती. बोला आतां, माझ्या या पेंचप्रश्नाचं उत्तर द्या.

**गडकरी** : बंडू, तूं निव्वळ वेडा आहेस. शिवाजीला लिहितांवाचतां आल्याशिवाय का त्यानें राज्यस्थापना केली? त्या काळची व्यवहारी आयुष्याला लागणारी सर्व विद्या त्याला अवगत होती. अजाण मुला, भलत्या कल्पनांनीं तूं आपल्या आयुष्याचा नाश केला आहेस. चांगल्या मार्मिकाच्याही कसोटीला उतरेल इतकं चांगलं तुझं रूप, पांढरपेशाच्या उच्च कुलांतला तुझा जन्म, हीं विद्यासौंदर्याच्या अभावीं काळीं ठिक्कर झालीं आहेत. विद्येवांचून तुझा जन्म अगदीं वायां गेला आहे. बंडू, तुझ्यासाठीं माझा अंतरात्मा तळमळून मी हें बोलतों आहें.

**बंडू** : मास्तर, हें काय? बोलतां बोलतां तुमच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. माझ्यासाठीं तुम्हांला इतका गहिंवर दाटून आला. मास्तर, केवढं हें तुमचं हळुवार अंतःकरण!

**गडकरी** : बंडू, तूं आतां घरीं जाऊन आधीं वडलांचे पाय धर आणि पुनः शिकावयास सुरुवात कर. माझ्या डोळ्यांतून बाहेर येणाऱ्या अश्रूंतून तुझीच अपूर्व आकृति उमटली आहे, ती कांहीं काळ हृदयांत लपवून ठेवतों म्हणजे झालं.

## २५ गडकऱ्यांचा लो. टिळकांना नवलाखांचा नजराणा

एके दिवशीं गडकरी लो. टिळकांचें गीतारहस्य पुस्तक वाचीत बसले होते. इतक्यांत पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांतील कांहीं विद्यार्थी

तेथें आले. त्यांपैकीं एका विद्यार्थ्यानें जरा चमत्कारिक तऱ्हेनें गडकऱ्यांना विचारलें, "मास्तर, तुम्हांला हा लोकमान्य टिळकांचा रुक्ष ग्रंथ वाचून काय करायचं आहे? 'सीदंति मम गात्राणि मुखंच परिशुष्यति' ह्या श्लोकाचा अर्थ टिळक मोठे विद्वान आहेत, तरी ते विशेष असा काय सांगणार? मास्तर, मोठ्या नवलाची गोष्ट आहे. कीं तुमच्यासारख्या लेखकाला गीतारहस्यासारखीं पुस्तकं वाचायची आवड असावी."

**गडकरी** : (रागातिशयानें) शाबास! शाबास!! तुझ्यासारखे शाहाणे लोक अजून जन्मले नाहींत, म्हणूनच त्या पुण्यश्लोकाला पुरुषोत्तमाच्या पदवीला पोचतां आलं.

**विद्यार्थी** : मास्तर, माझ्या बोलण्याचा तुम्हांला इतका राग येईल ही मला कल्पनाही नव्हती. लो. टिळकांच्या ग्रंथाविषयीं माझं मत कलुषित झालं आहे, असा तुमचा ग्रह झाला असेल तर तो निव्वळ चुकीचा आहे.

**गडकरी** : हें अगदीं अक्षरशः खरं आहे. कुठें लोकमान्य टिळक आणि कुठें तुम्ही! त्या महात्म्याच्या पवित्र पावलांनीं पावन झालेल्या धुळीचंसुद्धा सोनं झालं आहे. वस्तुमात्राच्या कसोटीनं विचार करणाऱ्या त्या धीमंताच्या लेखणींतून गीतारहस्याची ज्ञानगंगा उतरली. जगाच्या कल्याणासाठीं उसळून बाहेर आली. गीतारहस्य ग्रंथाचं मोल ठरविण्याची लायकी तुमच्या-आमच्यासारख्यांच्या आंगीं नाहीं.

**विद्यार्थी** : मास्तर, तुम्ही म्हणतां तें मला पटलं. परंतु तुमचं लेखनही मला लोकमान्यांइतकं उच्च दर्जाचं वाटतं. केवळ विनयामुळें तुम्ही आपल्या लेखनाला कमी समजतां, हें खरं ना?

**गडकरी** : (किंचित हसून) हें पाहा, तुम्हांला असं कां वाटतं याचं खरं कारण सांगूं का? माझ्या बोलण्याचा विपर्यास मात्र करूं नका. लो. टिळकांसारख्यांचं लेखन आणि माझें लेखन यांत जमीन-

अस्मानाचं अंतर आहे. मी लिहितों तें तुमच्यासारख्यांसाठीं आणि ते लिहितात तें आमच्यासारख्यांसाठीं.

**विद्यार्थी** : मास्तर, खरोखरीच तुम्ही थोर पुरुप आहांत. केवढी ही तुमची विनयशीलता! केवढी ही लोकमान्यांबद्दल तुमची आदरबुद्धि! आज मला लोकमान्यांच्या लोकोत्तर गुणांची ओळख पटली. मला ही दिव्यदृष्टि दिल्याबद्दल तुमच्या ऋणांतून मी कसा उतराई होऊं ?

**गडकरी** : हें पाहा, तुम्ही असे उदास होऊं नका. लो. टिळकांना मला नवलाखाचा नजराणा पाठवायचा आहे. तो तुम्हीच बरोबर घेऊन त्यांच्याकडे जा, म्हणजे माझं ऋण तुमच्यावर राहाणार नाहीं.

**विद्यार्थी** : नवलाखांचा नजराणा ? मास्तर, ही काय माझी चेष्टा चालविली आहे ? बरं तर, द्या तो नजराणा मजजवळ.

**गडकरी** : 'बौद्धिक सौंदर्य पाहावयाचें असेल तर जन्माला येऊन एकदा तरी लो. टिळकांची भेट घे, असें मी एखाद्या फिरंग्यालासुद्धा सांगेन.' हा माझा नवलाखांचा नजराणा मी तुमच्या हवालीं करतों आहें, तो नीट पोचवा.

## २६ तोड ही माळ

पुण्यप्रभाव नाटक लिहिण्यापूर्वीं गडकऱ्यांनीं 'तोड ही माळ' या नाटकाचें संपूर्ण कथानक लिहून तयार केलें होतें. परंतु, कांहीं कारणामुळें आणि विशेषतः 'तोड ही माळ' हें नाटक लिहावें अथवा कादंबरी लिहावी या अनिश्चित विचारामुळें गडकऱ्यांकडून तें लौकर लिहिलें गेलें नाहीं. पुण्यप्रभाव नाटकाला महाराष्ट्ररसिकांकडून गडकऱ्यांना त्यांच्या अपेक्षेपेक्षांही अधिक प्रोत्साहन मिळालें आणि ह्याचमुळें या रसिकांच्या सदय उदार बुद्धीसाठीं निर्घृण काळाचा पाश गळ्याभोंवतीं पडेतों त्यांनीं आपल्या हातांतील लेखणी खालीं ठेविली नाहीं. हें येथें सांगावयाचें कारण इतकेंच, कीं "महाराष्ट्ररसिकांच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं मला माझी सर्वांग-सुंदर कृति 'तोड ही माळ' त्यांच्या कंठीं घातलीच पाहिजे" असें

अनुक्रम ...................... ३३
क्रमांक ....१०७१.... नों. दि. ....९-१०-६२

गडकरी म्हणत असत. असें असतां गडकऱ्यांनीं हें नाटक कां लिहिलें नाहीं, हा प्रश्न साहाजिकच उद्भवतो. ह्यासंबंधीं समाधानकारक माहिती मला आणि माझे व गडकऱ्यांचे परम स्नेही रा. भाकूमामा धडफळे यांना आहे आणि म्हणूनच त्यासंबंधीं हकिगत येथें मी देत आहें.

पुण्याला असतां गडकऱ्यांच्या घरीं एक होतकरू नाटककार आले. गडकऱ्यांची व या नाटककारांची फार जुनी ओळख होती. दोघेही बोलण्याच्या रंगांत आले. नाटकाचीं कथानकें कशीं असावींत याविषयीं त्यांचें बोलणें चाललें होतें. बोलतां बोलतां गडकऱ्यांनीं आपल्या 'तोड ही माळ' या नाटकाचें संपूर्ण कथानक त्या नाटककारांना सांगितलें. महिन्या—दीड महिन्याच्या अवधींत ह्या नाटककारांनीं गडकऱ्यांच्या या कथानकावरून एक नाटक लिहिलें व तें रंगभूमीवरही आणिलें. त्या वेळीं गडकरी खेदयुक्त वाणीनें बोलले, "माझ्या 'तोड ही माळ' या नाटकाच्या कथानकाची चोरी केल्याबद्दल मला या नाटककाराचा संताप आला नाहीं; परंतु त्यानें माझ्या सुंदर कल्पनाचित्रांना करवतीनें कापून काढून त्यांना छिन्नविछिन्न हिडीस रूप दिलं, त्याबद्दल मी जिवंत आहें तों त्याचा तीव्र तिरस्कारच करीन. यापुढें कोणत्याही वाङ्मयभक्ताशीं बोलतांना मला फारच काळजीपूर्वक वागलं पाहिजे. माझ्याकडून नकळत झालेल्या अपराधामुळें माझं निशिगंध पुष्प 'तोड ही माळ' एका ××× च्या पायदळीं पडून तुडविलं गेलं. नाश पावलेल्या रमणीय वस्तूकडे पुन: वळून पाहाण्यांत मनाला तीव्र वेदना होणार, यापेक्षां तिचा विसर पडेल असं करणं अधिक शहाणपणाचं आहे."

यानंतर गडकऱ्यांनीं या नाटकाविषयीं पुन: केव्हांही विचार केला नाहीं.

## २७ सरस्वतीचंद्र वाचण्यासाठीं तरी गुजराथी शिका.

गडकऱ्यांचें प्रवेशपरीक्षेपर्यंतचें शिक्षण गुजराथी भाषेंतून झालें होतें. मराठी भाषेइतकेंच गुजराथी भाषेवरही गडकऱ्यांचें प्रभुत्व

होतें, असें त्या वेळीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें शिकत असलेले माझे कांहीं गुजराथी स्नेहीही सांगत असत. गडकऱ्यांच्या घरीं येणाऱ्या प्रत्येक गृहस्थानें अनेकदा पाहिलें असेल, कीं प्रसिद्ध गुजराथी ग्रंथकार त्रिपाठी ह्यांचें 'सरस्वतीचंद्र' हें पुस्तक तदाकार होऊन गडकरी वाचीत पडलेले असत. 'सरस्वतीचंद्राची स्वर्गीय माधुरी गुजराथी भाषेच्या अज्ञानामुळें ज्यांना चाखतां येत नाहीं ते दुर्दैवांतले दुर्दैवी होत. वाङ्मयाची गोडी असलेल्या प्रत्येक महाराष्ट्रीयानें गुजराथी शिकण्यासाठीं म्हणून नव्हे, तर 'सरस्वतीचंद्र' वाचण्यासाठीं म्हणून गुजराथी शिकावं' असें नेहमीं गडकरी म्हणत असत.

## २८ पुण्यप्रभाव नाटक लिहून पुरें झालें त्या दिवशीं

प्रेमसंन्यास नाटकाचा सर्वत्र बोलबाला झालेला ऐकून, गडकऱ्यांच्या परमपूज्य मातुःश्री ती. गं. भा. सरस्वतीबाई ह्यांनीं तें नाटक पाहावयास जाण्याची इच्छा गडकऱ्यांना दर्शविली. त्या वेळीं गडकरी म्हणाले, "मा, [ गडकरी मातुःश्रीस या नांवानें संबोधीत ] माझं प्रेमसंन्यास नाटक 'तुम्हांला पाहाण्याजोगं नाहीं. तुमच्यासारख्या सनातनी वृत्तीच्या माणसांना तें नाटक पाहून किळस येईल. तुमच्या आवडीला रुचेल असं सुंदर नाटक मी तुमच्यासाठीं लौकर लिहीन आणि मग तें तुम्ही जन्मभर पाहात राहिलांत तरी माझी त्याला हरकत नाहीं !"

याच दिवशीं गडकऱ्यांनीं पुण्यप्रभाव नाटक लिहावयास सुरुवात केली. कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें हें नाटक लवकर लिहून पुरें झालें नाहीं. नाटक लिहिण्याकरितां गडकरी किर्लोस्कर संगीत मंडळीबरोबर गोव्यास गेले होते. परंतु कांहीं कारणामुळें त्यांना पुण्यास परत यावें लागलें. पुण्यास आल्यावर अहोरात्र लिहीत बसून हें नाटक गडकऱ्यांनीं पुरें केलें.

एके दिवशीं पहाटेस चार वाजतां तें लिहून पुरें झालें. या वेळीं गडकऱ्यांना स्वर्गतुल्य आनंद झाला. स्नान करून गडकऱ्यांनीं देवपूजा केली. त्यानंतर शिवलीलामृताची पोथी वाचिली, लगबगीनें नीटनेटके कपडे आंगांत घातले. डोक्याला जरीचा पटका बांधला, हातांत पुण्यप्रभाव नाटकाच्या चोपड्या घेतल्या. शेजारींच राहात असलेल्या श्री. भाकूमामा धडफळ्यांना बरोबर घेऊन कसब्याच्या गणपतीच्या देवळांत गेले. गणपतीसमोर नाटकाच्या चोपड्या ठेवून गडकरी दोन्ही हात जोडून पांच मिनिटें निश्चल उभे राहिले. त्यानंतर गणपतीला साष्टांग नमस्कार करून घरीं येतांच मातुःश्रींच्या चरणांवर गडकऱ्यांनीं मस्तक ठेविलें. मातुःश्रींचा शुभाशीर्वाद ऐकून गडकरी म्हणाले, "मा, तुमच्या मंगल आशीर्वादाचा हा पुण्यप्रभाव!"

## २९ कायमचाच वर गेला असतास ना!

गडकऱ्यांच्या पुण्याच्या राहात्या घराचा मागील जिना त्या वेळीं अगदीं मोडक्या स्थितींत होता. मधल्या पांच सहा पायऱ्या आणि दोहों बाजूंचे कठडे वाऱ्याच्या झुळकीनेंसुद्धा गदगद हालून हेलकावत असत. यामुळें गडकऱ्यांनीं त्या जिन्याच्या प्रवेशद्वाराला भलीं मोठीं दोन कुलुपें लावून तो दरवाजा बंद केला होता आणि त्याच्या किल्ल्या एका किल्ल्यांच्या जुडग्यांत ठेविल्या होत्या.

एके दिवशीं एक फळेंविक्या डोक्यावर फळांची मोठी टोपली घेऊन त्या मोडक्या जिन्यावरून हेलकावे खात वरच्या बंद केलेल्या दरवाजापाशीं येऊन उभा राहिला. तेथें आल्यावर त्याला आपल्या जिवावर बेतणाऱ्या साहसाची चांगलीच कल्पना आली. दरवाजा बंद आहे असें पाहून त्याची पांचावर धारण बसली. भिंतीपासून सुटलेल्या जिन्याची कल्पना नसल्यामुळें तो त्यावरून वर गेला; पण आतां येथून खालीं उतरून कसें जावयाचें याचा त्याला मोठा विचार पडला. इतक्यांत शेजारच्या घरांतून एक मनुष्य बाहेर आला. त्याला पाहातांच या फळेंविक्यानें मोठ्यानें हाक मारली. त्याच्या

हाकेसरसा तो मनुष्य तेथें आला आणि त्याला म्हणाला, "ए, तूं फळेंविक्या आहेस का कोणी चोर आहेस? या मोडक्या जिन्यावरून तुला वर जायचं कारण काय?"

फळेंविक्या म्हणाला, "रावसाहेब, मी का चोर आहें? या घराच्या पुढल्या रस्त्यावर कांहीं वात्रट मुलं खेळत होतीं. त्यांनीं मला हा जिना दाखवून वर फळं विकावयास जा म्हणून सांगितलं. तीं मुलं तिथून निघून गेलीं आणि मी ह्या संकटांत सापडलों आहें. खालीं आल्यावर तुमचे मी पाय धरीन; पण मला ह्या संकटांतून सोडवा."

यावर तो गृहस्थ म्हणाला, "तूं घाबरूं नकोस. तुला पुढील जिन्यावरून जातां येईल अशी मी तजवीज करतों. जरा वेळ असाच तूं उभा राहा."

त्या गृहस्थानें पुढील बाजूला जाऊन, गडकऱ्यांना मोठमोठ्यानें हाका मारून घडलेली सर्व हकीकत त्यांना सांगितली. या वेळीं गडकरी त्यांच्या अत्यंत आवडीचा कविकुलगुरु कालिदास याच्या रघुवंशांतील आठवा सर्ग वाचीत होते. त्यांतल्या इंदुमतीच्या मनोहर रमणाचें रमणीय वर्णन वाचण्यांत ते इतके गढून गेले होते, कीं बराच वेळ त्या गृहस्थाच्या हाकांचा शंखनाद त्यांच्या कानीं आला नाहीं. त्या गृहस्थानें मागील दरवाजा उघडावयाची विनंती करतांच गडकरी दांतओठ चावून रागारागानें दरवाजा उघडावयास गेले आणि ओरडून बोलूं लागले, "तूं कोण आहेस? चोर, पिशाच्च, समंध ह्यांपैकीं कोण आहेस? लौकर बोल!"

**फळेंविक्या :** रावसाहेब, आधीं दरवाजा उघडा आणि मग पाहा मी कोण आहें तो.

**गडकरी :** दरवाजा उघडल्यावर तुलाच माझं प्रेत पाहाण्याचा प्रसंग येईल!

दाराच्या फटींतून पाहून पुनः गडकरी उद्गारले, "भाकूमामा, हा कोणी समंधही नव्हे आणि संतही नव्हे. या दोघांनाही लाजविणारा हा कोणी तरी राक्षसी वृत्तीचा रामोशी दिसतो आहे. ए रामोशा, खरं सांग, तूं कोण आहेस!"

**फळेंविक्या :** [ करुण स्वरानें ] रावसाहेब, आधीं दरवाजा उघडून मला आंत घ्या आणि माझे प्राण वांचवा. जिन्यासकट माझं सर्व शरीर हादरून माझा तोल सुटूं पाहातो आहे!

**भाकूमामा :** मास्तर, कुठें आहे तो किल्ल्यांचा जुडगा? मी दरवाजा उघडून त्याला आंत घेतोंच, तो चोर असो वा समंध असो. तुम्ही त्याची भीति बाळगूं नका. त्याला पुरून उरण्याइतकी शक्ति माझ्या आंगांत आहे.

या हिंमतीच्या बोलण्यामुळें गडकऱ्यांची भीति कमी झाली.

गडकरी रागानें लाल होऊन दणदण पाय आपटीत खोलींत सर्व ठिकाणीं किल्ल्या शोधूं लागले. कांहीं वेळ कांहीं केल्या गडकऱ्यांना किल्ल्या सापडेनात. फळेंविक्या मोडक्या जिन्याच्या प्रत्येक हेलकाव्या-बरोबर 'मी मरतों, मी मरतों' म्हणून सारखा आक्रोश करीतच होता. किल्ल्यांचें संशोधन चालू असतां, गडकरीही सारखे पुटपुटत होते, "बेवकूफ मनुष्या, तुला मौजेचं मरण येणार अथवा नुसती मरणाची मौज तुला दिसणार!"

इतक्यांत किल्ल्या सापडल्या. दरवाजा उघडतांच फळेंविक्याला हातानें घरांत ओढून घेऊन त्याच्या टोपलीसह गडकऱ्यांनीं त्याला जमिनीवर लोळविलें. गडकरी म्हणाले, "मूर्खा, तूं इकडे कुठें आलास?"

**फळेंविक्या :** ( कातर स्वरानें ) इकडे कुठें म्हणजे? वर आलों.

**गडकरी :** वर आलों? मूर्खा, तूं कायमचाच वर गेला असतास ना?

## ३० पुण्यांतील परिटाचें एक बुद्धिमान् पोर

आजचें काम उद्यांवर ढकलणें हा गडकऱ्यांचा स्वभावधर्मच होता. अमूक एक गोष्ट उद्यां करूं असें म्हणून ते ती कित्येक महिन्यांनीं

करीत असत. याचें मुख्यत: कारण म्हटलें, म्हणजे त्यांची अहर्निश वाङ्मयसेवा हेंच होय. मळलेल्या कपड्यांचा प्रचंड हिमालय होईपर्यंत गडकऱ्यांना कधींही परिटाची आठवण होत नसे. एके दिवशीं अगदीं निरुपाय होऊन परिटाच्या शोधासाठीं गडकरी पुण्याच्या परीट आळींत गेले. चार दिवसांत कपडे धुऊन मिळणार नाहींत म्हणून बऱ्याच परिटांनीं गडकऱ्यांना सांगितलें. गडकऱ्यांनीं विचार केला, कीं फार मोठ्या वयाच्या परिटाच्या नादीं लागण्यांत हशील नाहीं. एखादा लहान वयाचा परीट हुडकून काढून त्याला कपडे धुवावयास दिले म्हणजे तो वेळेवर आणील आणि त्याप्रमाणें त्यांनीं एका परिटाच्या मुलाला घरीं आणलें. गडकरी म्हणाले, “ गोविंदा, कपडे केव्हां धुऊन आणशील ? मला ते फार लवकर पाहिजेत; आणि हें पाहा, तुझ्या आधींच्या परिटानें कबूल केल्याप्रमाणें वेळेवर कपडे आणले नाहींत म्हणून त्याला मीं काय शिक्षा केली होती, ती तुला माहीत आहे का ? ”

**परीट** : आँ ! काय म्हणतां ? तुम्ही त्याला शिक्षा केलीत ?

**गडकरी** : हो. त्याला त्या खिडकींतून खालीं फेकून दिला. समजलास का ?

**परीट** : हो, आलं ध्यानांत रावसाहेब ! तो परीट खिडकींतून खालीं आस्ते आस्ते पडत होता, त्या वेळीं मी त्या खिडकीखालून जात होतों. काय मजेदार तुम्हीं त्याला खिडकींतून फेकून दिलंत !

**गडकरी** : ( हर्षातिशयानें ) बुद्धिमान मुला, शाबास ! या तुझ्या उत्तरानं तूं मला अगदीं चकित करून लाजवेलं आहेस ! पुण्याची बुद्धिमत्ता अद्यापिही जिवंत आहे, याची तूं साक्ष आहेस !

## ३१ गोव्यांतील एक नाजूक वासाचें रानफूल

गोव्याला असतां एका अल्लड रूपसंपन्न तरुणीची दिव्य कहाणी गडकऱ्यांच्या कानीं आली. या तरुणीचें तिच्या शेजारीं राहात

असलेल्या एका प्रेमवेड्या तरुणावर प्रेम बसलें होतें. त्याच्या निर्हेतुक प्रेमावांचून तिला कांहीं सुचत नसे, रुचत नसे व पटतही नसे. या तरुणाच्या वडील माणसांची, आप्तेष्टांची, अनुमति मिळून हा विवाह होणें अशक्य होतें. शिवरामासारख्या धनवान् तरुणाचा विवाह कंगाल गंगूबरोबर होणें गोव्यांतील कोणाही व्यक्तीला मान्य नव्हतें. गरिबी–श्रीमंतींतील अंतर न समजण्याइतकी गंगू अल्लड व रानटी होती. श्रीमंतांशीं कसें वागावें ह्याचेंही ज्ञान तिला नव्हतें. जगाच्या भयानक रूपाची तिला मुळींच कल्पना नव्हती. गंगूच्या प्रेमाच्या पायीं शिवराम वेडा बनून कर्तव्यपराङ्मुख झाला. घरीं, दारीं अष्टौप्रहर त्याच्या मनांत गंगूच्या नांवाचा जप चालू असे. प्रत्यक्ष आईच्या मरणकाळींसुद्धा हा शिवराम गंगूच्या नांवाचा जयघोष करीत होता. माझी गंगू एक रानवट पण मधुर फूल आहे. या फुलाचा रंग किंचित भडक आहे, पण वास नाजूक आहे. असें शिवराम वेडाच्या भरांत बोलत असे. तथापि घराण्याचा लौकिक कायम राखण्यासाठीं शिवरामला गंगूचा त्याग करणें प्राप्त झालें. या त्यागाच्या वेळीं गंगूनेंही आजन्म अविवाहित राहावयाचा निश्चय केला.

या कहाणींतील गंगूच्या प्रेमसंन्यासामुळें गडकऱ्यांच्या मनांत तिच्याविषयीं इतका आदर उत्पन्न झाला, कीं थोड्याच अवधींत त्यांनीं आपल्या राजसंन्यासांत तिचें चित्र रेखाटलें. प्रेमवेड्या रायाजी मालुसऱ्याची शिवगंगा–शिवांगी, ही गडकऱ्यांना गोव्याच्या सफरींत अशा रीतीनें लाधली. घाटमाथ्यावरील आंबराईत प्रवेश करणाऱ्या रायाजीच्या तोंडीं "प्रेमाच्या पेचांतून जीव कांहीं सुटत नाहीं. शिवगंगा, शुभांगी, शिवांगी ! प्यारी, आंतल्या आंत तळमळ होऊन कांहीं सुचेनासं झालं आहे." हीं वाक्यें घालून गडकऱ्यांनीं त्याच्या निर्व्याज मनोहर प्रेमाची साक्ष पटविली आहे. तसेंच, "दिवसा-दिवसाच्या श्वासानं प्राणांमागून प्राण पळून, कठोरा, तुझ्या शिवांगीची आशा आज मरणार रे ! वेड्या जिवाला नादीं लावलंस; तुझ्या

नांवासाठीं चारचौघांत बदनाम झालें. प्रेमानं पाहूं नकास. रागानं पाहा पण पुढें उभा राहा ! राया, जिवलगा, निष्ठुरा, इतके दिवस कुठें रे होतास ? मला सावरून धर ? नाहींतर वेड्या, आनंदानें ऊर फोडून, मी मरून जाईन ! मला टाकून जाऊं नकोस रे ! " हीं गडकऱ्यांच्या गरीब शिवांगीच्या तोंडचीं वाक्यें ऐकून कोणाला तिच्या निष्कपट प्रेमाचा, निर्मल भावाचा, स्वप्नांतल्या स्वप्नांत तरी संशय येईल ? राजसंन्यासांत रायाजीची शिवांगी एक नाजूक वासाचें रानफूल आहे असेंच कोणीही म्हणेल.

## ३२ पडद्यावर वाघाच्या मुखवट्यांचा चमत्कार

किर्लोस्कर नाटक मंडळी कोल्हापुरास असतां, एके वेळीं एका जहागिरदारांनीं कांहीं निवडक नटमित्रांना आणि गडकऱ्यांना त्यांच्या गांवीं येण्याचें निमंत्रण केलें. या जहागिरदारांचें गांव कोल्हापूरपासून दहाबारा कोसांच्या अंतरावर होतें. निमंत्रित मंडळी त्या जागीं जाण्यासाठीं पहाटेला बैलगाडीनें निघाली. या मंडळीला तेथें पोचावयास जवळ जवळ मध्यरात्र झाली. जेवण लवकर आटोपून मंडळी झोपीं गेली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं गडकऱ्यांखेरीज सर्व पाहुणे मंडळी सूर्योदयाबरोबर उठून मुखमार्जनादि विधि करीत होती. गडकरी मात्र बिछान्यावर लोळत पडून इकडे तिकडे पाहात होते. इतक्यांत तेथें समोरच्या दालनांत लावलेल्या कापडाच्या पडद्याकडे त्यांचें लक्ष गेलें. त्या पडद्यावर सर्वत्र वाघाच्या तोंडाच्या मुद्रा काढलेल्या होत्या. पडल्या पडल्या गडकऱ्यांना तेथें जवळच तोंड धूत उभ्या असलेल्या त्यांच्या नटमित्राचा तोंडवळा पडद्यावरील वाघाच्या मुद्रेबरहुकूम आहे ही कल्पना आली. गडकरी एकदम उद्गारले, "अरे × ×, तुला रात्रीं तोंड पुसायला रुमाल मिळाला नाहीं कीं काय ? हें तूं काय केलंस तें पाहा. या पडद्याला तोंड पुसून त्याच्यावर जिकडे तिकडे वाघछापाचे मुखवटे तूं उमटविले आहेस. जहागिरदारसाहेबांना तुझ्या ह्या गैरशिस्त. वर्तनाबद्दल काय वाटेल

याचा नीट विचार कर. तूं नाटकांत तोंडाला रंग फासतोस म्हणून तुला नाटकाबाहेर जपून वागलं पाहिजे."

## ३३ गडकऱ्यांना हसूं आवरेना

गडकऱ्यांच्या सर्व हालचालींकडे मी ( लेखक ) फारच बारकाईनें पाहात असें. त्यांतल्या त्यांत त्यांच्या बोलण्याकडे, हावभावांकडे व चालण्याच्या भिन्न पद्धतींकडे मी कित्येकदा कौतुकानें, तर कित्येकदा केवळ चेष्टेनें विशेष लक्ष देत असें. गडकऱ्यांच्या बोलण्याचालण्याचें अनुकरण मला इतकें साध्य झालें होतें, कीं गडकऱ्यांच्या बऱ्याच मित्रांची हसून हसून मुरकुंडी वळत असे. त्यांच्या चालण्याचें अनुकरण साधावयास मला मुळींच त्रास पडला नाहीं. परंतु कांहींही बोलण्यापूर्वी आणि बोलतांना गडकऱ्यांच्या चेहऱ्यांतील फेरबदल बरोबर वठविण्यास मला बरेच श्रम करावे लागले. प्रथमतः डाव्या गालांत एकदम खळी पाडून उजवा गाल किंचित् फुगीर करावयाचा व थोडा वेळ चोहींकडे अगदीं रोखलेल्या नजरेनें पाहावयाचें, कीं गडकऱ्यांचें मुखानुकरण साधलें म्हणून समजावें. बोलण्याचें अनुकरण साधावयास नुसता सतत सहवास पुरेसा होता. मानेला आणि छातीला कृत्रिम ताठरपणा आणून मिशांचे बुडखे ओठाखालीं आवळून कांहीं तरी विचार करीत बसावें, कीं गडकऱ्यांचें हुबेहूब चित्र डोळ्यांपुढें उभें राहिलें म्हणून समजावें. रस्त्यांतून चालतांना आपण वर्तुलाकार आहों अशी दृढ भावना धरून पावलें टाकावींत म्हणजे पाहाणाराला आपण वर्तुलाकार चालतों आहों असें दिसून येईल. अस्तु. एके दिवशीं गडकऱ्यांना कळलें, कीं मी त्यांचें हुबेहूब अनुकरण करतों. ही बातमी माझ्या कानीं येतांच मला चमत्कारिक वाटलें. मी ह्या विचारांत आहे तोंच तेथें गडकरी आले आणि हसत हसत मला म्हणाले, "करून दाखीव पाहूं माझी नक्कल, तुला ती कितपत साधते तें पाहूं."

प्रत्यक्ष गडकऱ्यांच्यासमोर त्यांचीच नक्कल करावयास मला बराच वेळ धीर होईना. शेवटीं गडकऱ्यांच्या चेहऱ्यांतील फेरबदलाचें

अनुकरण मीं भीतभीतच केलें. त्या क्षणीं गडकऱ्यांना इतकें हसूं लोटलें, कीं त्यांना तें आवरून धरतां येईना. कांहीं वेळानें गडकऱ्यांनीं ही हकिगत आपल्या परमपूज्य मातुःश्रींना सांगितली. त्या वेळींही गडकऱ्यांना आपलें हसूं आवरेना. या गोष्टीवरूनही गडकऱ्यांच्या मनाचा थोरपणा व प्रेमळ स्वभाव दिसून येईल.

## ३४ श्री. मामा वरेरकरांविषयीं गडकऱ्यांची आमरण आदरबुद्धि

महाराष्ट्रीय लेखनव्यवसायबंधूंत, श्री. मामा वरेरकरांविषयीं गडकऱ्यांना फारच आदर होता. त्यांच्या कुंजविहारी नाटकांतील गाणीं गडकऱ्यांना मुखोद्गत येत होतीं. गडकरी नेहमीं म्हणत असत, "मामांच्या या नाटकांतलि सर्व गाणीं गोड आणि रसाळ आहेत." या नाटकावरून गडकऱ्यांनीं मामा वरेरकरांच्या स्वभावाचीही पारख केली होती. ते म्हणत असत, "वरेरकर हे हळुवार अंतःकरणाचे, सत्य धर्माचे कैवारी आहेत हें त्यांच्या लेखनावरून लक्षांत येण्याजोगं आहे!" थोडक्यांत बोलावयाचें, म्हणजे गडकऱ्यांचें मामा वरेरकरांवर निस्सीम मित्रप्रेम होतें. त्याचप्रमाणें मामा वरेरकरांना गडकऱ्यांबद्दल तितकाच आदर त्यांच्या पश्चातही आहे, हें एकदा दादर येथें गडकरी स्मृतिदिनाच्या प्रसंगीं त्यांनीं केलेल्या भाषणावरून कोणालाही कळून येईल.

गोव्याला असतां गडकऱ्यांवर चोहींकडून आपत्तींचा वर्षाव झाला होता. पुण्यप्रभाव नाटक लिहून पुरें झाल्याशिवाय गडकऱ्यांना किर्लोस्कर नाटक मंडळीकडूनही पैसे मिळणें शक्य नव्हतें. या वेळीं गडकरी किती चमत्कारिक परिस्थितींत होते याची कल्पना एकट्या मामा वरेरकरांनाच झाली होती. गडकऱ्यांना असल्या वाईट स्थितींत पाहून मामा वरेरकरांचें हळुवार अंतःकरण द्रवलें. गडकऱ्यांची त्या वेळीं झालेली कृश तनु आणि खोल गेलेले डोळे पाहून मामांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या.

**मामा वरेरकर :** गडकरी, तुमची प्रकृति इतकी क्षीण कशानें झाली? तुम्ही आजारी होतां का ?

**गडकरी :** मामा ! माझी प्रकृति आहे तशीच आहे. मी तूर्त पैशांच्या बिकट परिस्थितींत आहें. माझी येथून सुटका झाली म्हणजे माझी प्रकृति एकदम सुधारेल.

**मामा वरेरकर:** तुम्हांला लागणाऱ्या पैशांची व्यवस्था मी आत्तांच्या आत्तां करतों; पण आधीं तुम्ही माझ्या गांवीं येण्याचें कबूल करा. पूर्ववत् तुमची शरीरप्रकृति झाल्यावांचून मी तुम्हांला पुण्याला जाऊं देणार नाहीं.

पैशांच्या पेचांतून मामांनीं गडकऱ्यांची सुटका त्या क्षणींच केली व पुढें त्यांच्या गांवीं गडकरी थोडे दिवस राहून पुण्यास आले.

यानंतर पुढें केव्हांही रस्त्यानें चालतां चालतां मामा वरेरकरांचें नांव लक्षांत आलें, म्हणजे गडकऱ्यांच्या डोळ्यांतून सानंद कृतज्ञतेचे अश्रु ओघळल्यावांचून राहात नसत.

## ३५ गडकरी आणि मूकनायक

कै. तात्यासाहेब कोल्हटकरांचें मूकनायक नाटक हें गडकऱ्यांच्या अत्यंत आवडीचें होतें. ज्या दिवशीं मूकनायक नाटक असे, त्या दिवशीं गडकऱ्यांच्या आनंदाला सीमा उरत नसे. सकाळपासून रात्रीं नाटक सुरू होईतों गडकऱ्यांची कोण धावपळ ! एरवीं इतर नाटकांच्या दिवशीं गडकरी पुढें खुर्चीवर बसून कधींही नाटक पाहात नसत; परंतु मूकनायकाच्या दिवशीं अगदीं पहिल्या रांगेतील खुर्चीवर सुरुवातीपासून नाटक संपेपर्यंत बसून राहात. त्यांतल्या त्यांत पहिल्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशांत श्री. बोडस प्रतोदाच्या भूमिकेंत येतांच गडकऱ्यांच्या आनंदाला उकळ्या फुटूं लागत. गडकरी मार्मिक दृष्टीनें आपलें काम पाहावयास बसले आहेत हें जाणून श्री. बोडस आपली भूमिका अधिक सफाईनें उठवीत असत.

श्री. बोडसांनीं “ मी जेव्हां हें नगर सोडलं तेव्हांची आणि सध्याची स्थिति यामध्यें कांहीं अंतर पडूं नये ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. दगडांच्या बरगड्या आणि लाकडांच्या नाड्या असलेल्या वस्तूंनीं सुधारणा करावी तरी कशी ? ही सर्व नगरी इतके दिवस झोपेंत होती का ? तेव्हांचीं अंत:करणेंसुद्धा तशींच प्रेमळ राहिलीं असतील का ? ” हीं वाक्यें उच्चारतांच गडकऱ्यांचें सर्वांग हर्षातिरेकानें गदगद हलूं लागे. दुसऱ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशाच्या अंतीं सरोजिनीच्या तोंडीं, “ जिकडे जावं तिकडे वीणारव ! वीणारव ! महाराज, आतां मी सर्वस्वीं आपलीच आहें असं समजून मला विनाकारण त्रास देऊं नका. माझ्याभोंवतीं आपण जो हा खडा पहारा ठेविला आहे, तो दूर करा ” हीं घातलेलीं वाक्यें ऐकून गडकऱ्यांचें देहभान हरपून जात असे. दोन दोन दिवस या नाटकाची मोहक गुंगी गडकऱ्यांच्या डोक्यांतून नाहींशी होत नसे. गडकरी म्हणत असत, “ नाट्यसाहित्याचा स्वर्गीय आनंद पाहिजे असेल तर अहर्निश अभिनव रमणीय मूकनायक नाटक वाचा. ”

## ३६ पुण्याची एक भाग्यशाली भिकारीण

पुण्याच्या अंबरखान्याजवळ एक भिकारीण बसत असे. गडकऱ्यांच्या घराकडे जाणारा रस्ता याच अंबरखान्यावरून आहे. येथून जातां येतां गडकऱ्यांच्या लक्षांत आलें, कीं भिक्षा मागणाऱ्या सर्व भिकाऱ्यांत ही एकच भिकारीण समंजस आहे. जाणाऱ्या येणाऱ्यांच्या मागील जन्मींच्या ऋणाची फेड या जन्मीं करून घेणाऱ्या भिकाऱ्यां-प्रमाणें ती त्याचा छळ करीत नाहीं. स्वसंतोषानें जे कोणी कांहीं तिला भिक्षा म्हणून देतात, त्यांतच आनंद मानून त्यांचें अभीष्ट चिंतिते.

एके दिवशीं संध्याकाळीं गडकरी व मी पर्वतीकडे फिरावयास जात होतों, तों ही भिकारीण गडकऱ्यांच्या समोर येऊन भिक्षेची याचना करूं लागली. या गरीब पण समंजस भिकारणीला चांगली भिक्षा

द्यावी असें गडकऱ्यांच्या मनांत आलें. चटकन् त्यांनीं आपल्या खिशांत हात घातला, परंतु एक खोटी चवलीच खिशांत हातीं लागली. या भिकारणीला एक पैसाही द्यावयास आपल्याजवळ नाहीं म्हणून गडकऱ्यांना त्या वेळीं फार वाईट वाटलें. गडकरी मोठ्या गंभीरपणानें त्या भिकारणीला म्हणाले, "ए बाई, तूं इथें कुठें राहातेस ? मला तुझा पत्ता नीट सांग पाहूं."

**भिकारीण** : मी कुठें तरी राहातें. माझा पत्ता तुमच्यासारख्या मोठ्या माणसाला घेऊन काय करायचं आहे ? भिक्षा द्यायची असेल तर द्या, नाहीं तर नाहीं म्हणून सांगा.

**गडकरी** : मी तुला एक रुपया भिक्षा देणार आहें. दोन तीन दिवसांत माझे मुंबईहून पैसे यावयाचे आहेत आणि म्हणून मला तुझा पत्ता पाहिजे.

**भिकारीण** : रावसाहेब ! देव तुमचं भलं करो ! मला भिकारणीला वरदार कुठलं ? इथेंच अंबरखान्याच्या आसपास मी असतें. सावकाश तुमचे पैसे येऊं द्या आणि मग भिक्षा द्या.

**गडकरी** : आतां तुझ्या पत्त्याची जरूरच नाहीं. तूं इथेंच असतेस, मग कांहीं हरकत नाहीं.

यानंतर गडकरी व मी पर्वतीपर्यंत जाऊन घरीं परत आलों. त्या भिकारणीच्या सुदैवानें दुसऱ्याच दिवशीं श्री. का. र. मित्र यांच्याकडून पैसे आले. पैसे हातीं येतांच गडकऱ्यांनीं तिला एक रुपया नेऊन दिला. गडकरी म्हणाले, "ती पुण्याची भिकारीण मोठी भाग्यशाली आहे. नाहीं तर मित्रांच्याकडून इतक्या लौकर पैसे आलेच नसते."

## ३७ गडकऱ्यांचा तळिराम

गडकऱ्यांनीं 'एकच प्याला' हें नाटक प्रत्यक्ष घडून आलेल्या गोष्टींवर व सूक्ष्म अवलोकन यांच्या जोरावर लिहिलें आहे. या नाटकांतला नायक सुधाकर याला दारूचें अतिनिंद्य व्यसन लावणारा

तळिराम व त्याचे दारूबाज दोस्त यांचीं स्वभावचित्रें परिणामकारक व आकर्षक करण्यासाठीं गडकऱ्यांनीं फार परिश्रम केले आहेत. कित्येक दिवस गडकरी संध्याकाळीं फिरून येतांना दोन दोन तास गुत्त्यांसमोर उभे राहून तेथील दारूबाजांच्या किळसवाण्या लीला मोठ्या उत्सुकतेनें अवलोकन करीत असत. एके दिवशीं एका दारूच्या गुत्त्यांत दोन सुशिक्षित गृहस्थ शिरतांना त्यांनीं पाहिले. त्यांपैकीं एक अगदीं नवशिक्या दारूबाज होता, हें गडकऱ्यांना त्यांच्या पुढील संवादावरून कळून आलें.

**गृहस्थ** : अहो, दारूला पाहून इतकं घाबरण्याचं कारण नाहीं. दारूचं व्यसन वाईट आहे. परंतु तुम्हांला कुठें ती रोज घ्यावयाची आहे ? तुम्हांला कधीं काळीं हा कपिलाषष्ठीचा योग यावयाचा. हं, करा सुरवात.

**दुसरा** : मला भीति वाटते आहे अशांतला कांहीं प्रकार नाहीं; परंतु मनाला जरा चमत्कारिक मात्र वाटत आहे.

**प. गृहस्थ** : तुम्ही अद्याप नवशिके आहांत. हं, करा सुरवात. एकदा पोटांत दारूनें प्रवेश केला, कीं भीति, लज्जा, अब्रू ह्या गोष्टींचं मनुष्याला कांहीं वाटेनासं होतं. दारू ही महाशक्ति आहे, हें लक्षांत ठेवा.

हा संवाद ऐकतांच गडकऱ्यांच्या डोक्यांत ह्या जातिवंत दारूबाजाविषयीं कल्पना घोळूं लागल्या. सुधाकराच्या सुंदर संसाराचा सत्यानाश करावयास या दारूबाज दोस्ताची जोड गडकऱ्यांनीं दिली आहे. ह्याच हृदयविदारक कल्पनांतून गडकऱ्यांचा तळिराम निर्माण झाला.

## ३८ गडकऱ्यांची कृतज्ञता

गडकरी पांचसहा वर्षांचे होते. त्या वेळीं त्यांच्या घरीं त्यांचे एक आठ वर्षें वयाचे आप्त राहात असत. गडकऱ्यांचें ह्या आप्तावर मरेपर्यंत प्रेम होतें. कारण इतकेंच, कीं ह्या गृहस्थानें त्यांना लहानपणांत

चोरून विड्या ओढण्याच्या कामीं बरीच मदत केली होती. गडकरी लहानपणीं फार खोडकर होते आणि ह्यामुळें त्यांच्या वडिलांना नेहमीं त्यांना शासन करावें लागत असे. अशा बऱ्याच प्रसंगीं ह्या प्रेमळ आप्ताकडून गडकऱ्यांचा बचाव होत असे. पुढें मोठेपणीं गडकऱ्यांनीं लिहिलेल्या कविता, नाटकें हीं सुवाच्य लिहून काढण्याच्या कामीं ह्या आप्तानें गडकऱ्यांना बरेंच साहाय्य केलें. "विडीचं व्यसन वाईट तर खरंच, परंतु तें लावण्याचा हेतु वाईट नव्हता, म्हणून मला त्या व्यक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे." असें गडकरी म्हणत असत.

## ३९ "मला तर इतिहासांत पास व्हायचं आहे."

सन १९०४ सालीं गडकरी मुंबई-विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेंत यशस्वी रीतीनें उत्तीर्ण झाले होते. पुढें कांहीं महिने गडकरी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांत शिकतही होते, परंतु याच सुमारास त्यांची सांपत्तिक स्थिति फारच खालावल्यामुळें त्यांना कॉलेज सोडून किर्लोस्कर नाटक मंडळींत मास्तरची नोकरी पत्करावी लागली. विश्वविद्यालयाचे पदवीधर व्हावयाचा संकल्प गडकऱ्यांनीं केला होता. हा संकल्प सिद्धीला नेण्यासाठीं रात्रंदिवस त्यांना तळमळ लागलेली असे. परंतु शेवटीं "मनींच्या मनीं कल्पना त्या निमाल्या" हाच कटु अनुभव गडकऱ्यांच्या वांट्याला आला. प्रतिवर्षीं प्रसिद्ध होणाऱ्या प्रीव्हियसच्या पुस्तकांची यादी गडकरी नेहमीं पाहात असत. १९११ सालीं त्या परीक्षेला नेमलेलीं पुस्तकें आपल्या आवडत्या ग्रंथकारांचीं आहेत हें पाहून गडकऱ्यांनीं पुन: फर्ग्युसन कॉलेजांत जावयाचा निश्चय केला. त्या वेळीं गडकऱ्यांचे एक जिवलग मित्र रा. भालचंद्र वामन धडफळे हे फर्ग्युसन कॉलेजांत प्रीव्हियसच्या वर्गांत शिकत होते. त्यांना गडकऱ्यांनीं आपला हा मनोदय कळविला. रा. धडफळे यांनींही त्यांचा उत्साह द्विगुणित केला. धडफळे म्हणाले, "इंग्रजीसाठीं 'टेल ऑफ टू सिटीज' संस्कृतसाठीं 'वेणीसंहार' नाटक आणि

'जानकीहरण' हीं तुमच्या आवडीचीं पुस्तकं आहेत. मास्तर, उद्यांपासून माझ्याबरोबर कॉलेजांत या! शुभस्य शीघ्रम्."

**गडकरी :** भाकूमामा, (गडकरी धडफळे यांना या नांवानें संबोधीत असत. रा. धडफळे हे हल्लीं मुंबईस जी. आय्. पी. रेल्वेंत इंजीनियर आहेत.) ठीक आहे. पण हें पाहा भाकूमामा, विद्यार्थ्यांसारखा अभ्यास करण्याची मला संवय लागण्यासाठीं तुला माझ्याकडे कांहीं दिवस अभ्यास करावयास यायला पाहिजे. आहे कबूल हें तुला?

**धडफळे :** हो. अगदीं कबूल.

गडकऱ्यांच्या विविध व्यवसायांमुळें परीक्षेचा अभ्यास त्यांना पुरा करतां आला नाहीं. अगदीं परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत गडकऱ्यांनीं ग्रीसच्या इतिहासाचें पान उघडून पाहिलें नव्हतें. गणित विषयापैकीं भूमितीच्या सिद्धान्तांशिवाय गडकऱ्यांना कांहीं माहीत नव्हतें. टेल ऑफ टू सिटीज आणि वेणीसंहार नाटक हीं पुस्तकें मात्र त्यांनीं मनापासून वाचून काढिलीं होतीं. पुण्याहून प्रीव्हियसच्या परीक्षेसाठीं गडकरी आणि धडफळे यांच्याबरोबर दहाबारा विद्यार्थी मुंबईला येऊन "सुखनिवास" मध्यें उतरले होते. इतिहासाच्या पेपरच्या आदल्या दिवशीं गडकरी म्हणाले, "अरे भाकूमामा, ग्रीसचा इतिहास मीं मुळींच वाचला नाहीं आणि आपल्याबरोबर आलेले हे सर्व विद्यार्थी खास नापास होणार आहेत. तेव्हां त्यांना इतिहासाबाबत प्रश्न विचारण्यांत कांहीं हशील नाहीं. आतां तूंच सांग, उद्यां इतिहासामधील कोणते प्रश्न येतील असं तुला वाटतं? मला तर इतिहासांत पास व्हायचं आहे.

**धडफळे :** उद्यां प्रश्न कोणते येणार हें मला कसं सांगतां येईल? मास्तर, आतां तुम्ही असं करा. डीकोनाचं स्केच रात्रीं वाचून काढा आणि गेल्या तीन वर्षांचे पेपर चाळा, म्हणजे यंदा कोणते प्रश्न येतील तें सहज कळून येईल.

**गडकरी :** भाकूमामा, तूं एक औरं मनुष्य आहेस. तुझ्या म्हणण्या-प्रमाणेंच मी करतों आणि तुला खात्रीनें सांगतों, कीं मी इतिहासांत पास होणार.

डीकोनाच्या स्केचमधून गडकऱ्यांनीं आठ प्रश्न निवडून वाचले होते. परीक्षेच्या पेपरांत त्यांपैकीं पांच प्रश्न आले होते.

गडकरी आणि धडफळे ह्या वर्षीं परीक्षेंत उत्तीर्ण झाले आणि गडकऱ्यांच्या तर्काप्रमाणें त्यांच्याबरोबर आलेले बाराही विद्यार्थी नापास झाले.

## ४० " श्री. वि. स. खांडेकर हे उत्तम लेखक होतील. "

गडकरी न्यू इंग्लिश स्कूलमध्यें मास्तर असतां त्यांच्याकडे श्री. वि. स. खांडेकर हे येत असत. प्रथमदर्शनीं एखाद्याची बरोबर पारख करण्यांत गडकऱ्यांची कधीं चूक झाली आहे असें निदान माझ्या अनुभवाला आलें नाहीं. एकदा बालकवि ठोमरे, धडफळे आणि गडकरी बऱ्याच रंगांत बोलत बसले होते. बोलतां बोलतां धडफळे म्हणाले, " मास्तर, तुमच्या प्रेमसंन्यास नाटकांत मला कुठेंही दोषस्थळं आढळून आलीं नाहींत."

**गडकरी :** तुला तीं दोषस्थळं आढळून यायला तुला स्वतःला एखादं नाटक लिहायला पाहिजे.

**भाकूमामा :** म्हणजे ? तुमच्या प्रेमसंन्यासांत दोष आहेत कीं काय ?

**गडकरी :** त्यांत दोष आहेत ह्याबद्दल एका तरुण विद्यार्थ्यानें माझी सप्रमाण खात्री केली आहे.

**ठोमरे :** मास्तर, हें अगदीं खरंच का ? नांव काय त्या विद्यार्थ्याचं ?

**गडकरी :** त्याचं नांव खांडेकर. इंग्रजी सहाव्या इयत्तेंत तो आहे; पण त्याचं वाचन फारच मार्मिक आहे. लक्षांत ठेवा, माझ्या पाठीमागें हा विद्यार्थी खांडेकर उत्तम लेखक होईल !

## ४१ गडकऱ्यांना पुनर्जन्म देणारा नामदार गोखल्यांचा सदुपदेश

एके दिवशीं प्रसिद्ध महाराष्ट्र नाटककार कै. रा. रा. गोविंद बल्लाळ देवल हे गडकऱ्यांच्या घरीं आले आणि म्हणाले, "गडकरी, लौकर कपडे आंगांत घाला. मला तुम्हांला माझ्या एका मोठ्या स्नेह्याकडे घेऊन जायचं आहे." गडकरी उद्गारले, "आपण इतकी घाई करतां, तेव्हां कांहीं तरी विशेष महत्त्वाचं काम असावं असं वाटतं. हं चला, हा मी तयार आहें." त्या वेळीं तेथें गडकऱ्यांचे स्नेही भाकूमामा धडफळे पुस्तक वाचीत बसले होते. जातां जातां गडकरी त्यांना म्हणाले, "भाकूमामा, मी घरीं परत येईपर्यंत इथून जाऊं नकोस." देवल आणि नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे परम स्नेही होते. एकदा ह्या उभयतांचें गडकऱ्यांच्या लेखनाविषयीं बोलणें चाललें असतां नामदार गोखले उद्गारले, "गोविंदराव, माझी आणि त्या तुमच्या गडकऱ्यांची एकदा प्रत्यक्ष भेट व्हायला पाहिजे, म्हणजे त्यांची चांगली कानउघाडणी करतों. गडकऱ्यांसारख्या तीव्र बुद्धीच्या तरुणाची आपल्या दुबळ्या हिंदुस्थानला सद्यःस्थितींत केवढी गरज आहे!" ह्या प्रसंगाची आठवण ठेवून देवल गडकऱ्यांना ना. गोखल्यांकडेच घेऊन गेले. गडकऱ्यांना पाहातांच ना. गोखले म्हणाले, "गडकरी, तुमच्या लेखनद्वारा दिसून येणाऱ्या विशाल बुद्धिमत्तेबद्दल मला सानंद अभिमान वाटतो. परंतु आपल्या देशाचं सुंदर भाग्य सुरस नाटकं, कादंबऱ्या लिहून कधीं तरी उदयाला येईल काय? माझं तुम्हांला कळकळीचं सांगणं आहे, कीं ह्यापुढें तुम्हीं आपली अलौकिक बुद्धिमत्ता आपल्या देशाच्या कारणीं लावावी. राजकारणाचा कसून अभ्यास केल्याशिवाय जन्मभूमीची सेवा तुम्हांला कधीं काळीं सुद्धा करतां येणार नाहीं. राजकारण हेंच आपलं उच्चतम ध्येय आहे हें सदैव ध्यानांत ठेवा." हें ऐकून गडकऱ्यांचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले. गडकरी कांहीं वेळानें बोलले, "गुरुवर्य, आपल्या उपदेशानें आज माझा पुर्नजन्म झाला आहे. यापुढें आपल्या वचनानुसार

वागण्याचा मीं निश्चय केला आहे." इतकं बोलून गडकरी घरीं निघून आले. आनंदाच्या भरांत गडकरी मोठ्यानें ओरडून म्हणाले, "काय भाकूमामा, मी कोण आहे असं तुला वाटतं? आज हिंदुस्थानांतल्या कोणत्या थोर बुद्धिमत्तेनें माझं कौतुक केलं? ती काय बोलली? कशी बोलली?"

**भाकूमामा** [रा. धडफळे मास्तर]: इतका आनंद तुम्हांला कशामुळें झाला आहे हा?

**गडकरी**: भाकूमामा, आज तूं बोलूंच नकोस. तूं अजाण आहेस. तुला आजच्या माझ्या आनंदाची कल्पनाच करतां येणार नाहीं. माझी लायकी मी समजत होतों त्यापेक्षां सहस्रपटीनें अधिक आहे, असं हिंदुस्थानचं बडं राजकारण म्हणालं. सांग, अशा कोणत्या थोर व्यक्तीची आणि माझी भेट झाली?

**भाकूमामा**: माझा कांहीं तर्क चालत नाहीं. थट्टा सोडून नीट काय तें सांगा म्हणजे मला कळेल.

**गडकरी**: (गंभीरपणानें) आतां नीट ऐक. देवलांनीं आज माझा आणि ना. गोखल्यांचा परिचय करून दिला. यापुढें मी राजकारणाचा अभ्यास करावा असं ना. गोखले म्हणाले. भाकूमामा, आतां मला वेडंवाकडं वागतां कामा नये. कपड्यालत्त्यांत नीटनेटकेपणा हा प्रथम पाहिजे. वाढल्या वैभवाबरोबर सुंदर संसारी आयुष्याची मांडणी करण्यासाठीं मला लग्नही करायला पाहिजे. संन्याशाच्या संसाराला शेंडीपासून सुरुवात करायची आहे. थोडक्यांत, माझ्या पूर्वजीवनक्रमाला पूर्ण समाधि देऊन पुनर्जन्मानंतरचा नवा संसार मला सजवायचा आहे.

ह्यानंतर लौकरच गडकऱ्यांनीं द्वितीय विवाह केला. नियमितपणा आणि व्यवस्थितपणा ह्या गोष्टींकडे गडकरी विशेष लक्ष देऊं लागले. चोहोंकडे धावणारें गडकऱ्यांचें उदासी मन ह्या वेळीं बरेंच स्थिरावलेलें होतें. अशा रीतीनें ना. गोखल्यांच्या सदुपदेशाचा सुपरिणाम

गडकऱ्यांच्या मनावर झाला. परंतु ह्यानंतर थोड्याच अवधींत गडकरी कालवश झाल्यामुळें त्यांच्या भविष्यकालाचें मनोहर चित्र निर्घृण कालाच्या उदरांत गडप झालें.

## ४२ गडकऱ्यांचा काकासाहेब खाडिलकरांनीं केलेला गौरव

सुप्रसिद्ध महाराष्ट्र नाटक मंडळीनें गडकऱ्यांच्या पुण्यप्रभावाचा गद्य प्रयोग मुंबई येथें केला होता. तो लोकप्रिय झाला नाहीं. नाटक मंडळीच्या चालकांना त्या वेळीं असें वाटलें, कीं ह्या खेळापासून मंडळीला फायदा होणें शक्य नाहीं. ह्या कारणामुळें त्यांना गडकऱ्यांचें महत्त्व कमी वाटूं लागलें. एकदा गडकरी म. ना. मंडळींत गेले होते. त्या वेळीं प्रसिद्ध नाटककार काकासाहेब खाडिलकर तेथें नाटकमंडळींतील कांहीं नटांबरोबर बोलत बसले होते. ह्या प्रसंगीं त्या मंडळींनीं गडकऱ्यांचें योग्य तें स्वागत केलें नाहीं हें पाहातांच काकासाहेब खाडिलकरांनीं गडकऱ्यांचा हात धरून त्यांना आपल्याजवळ बसविलें. शिष्टाचाराचें उल्लंघन केल्याबद्दल नाटक मंडळीच्या चालकांना उद्देशून रा. काकासाहेब खाडिलकर म्हणाले, "गडकरी, तुमचं पुण्यप्रभाव नाटक तुमच्या निरतिशय सुंदर प्रतिभेची साक्ष पटवीत आहे. महाराष्ट्र नाट्यवाङ्मयांत ह्या नाटकानें तुम्हीं भर घातली आहे. मी नाटक लिहितों, तें एकच बत्तासा पाण्यानें भरलेल्या मोठ्या घंगाळांत टाकून त्याचें तीर्थ रसिकांना वाटतों आणि तुम्हीं तर त्यांना सगळे बत्तासेच वाटतां. ह्यापुढें मराठी भाषा तुम्हींच लिहावी. तुमच्या नाटकाच्या एका पानांतील मजकुरांत मी पन्नास नाटकं लिहून काढीन." खाडिलकरांच्या ह्या प्रेमळ गौरवपर वचनामुळें गडकऱ्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागले. मरणकालपर्यंत काकासाहेब खाडिलकरांविषयीं अलोट आदरबुद्धि गडकऱ्यांच्या हृदयांत वास करीत होती, तिचें रहस्य ह्याच गोष्टींत होतें.

## ४३ एकच प्याल्यांतील सूत्रचालक भोळा तळिराम कीं दुष्ट दारू ?

गडकऱ्यांच्या प्रेमसंन्यासांत कमलाकर, पुण्यप्रभावांत वृंदावन, भावबंधनांत घनःशाम हे सारे उठावदार सूत्रचालक एकाच शाळेंतील आहेत; परंतु त्यांच्या एकच प्याल्यांतील सूत्रचालक तळिराम हा तितक्या योग्यतेचा नाहीं. केवळ सुधाकरला पहिल्या एकच प्याल्याची दीक्षा देण्यापुरताच तो कारणीभूत होतो. वास्तविक पाहातां, आपल्या व्यसनानें सुधाकर आपला नाश करतो व येथेंच एकच प्याला नाटकाची परिसीमा होते. तळिरामचें दारूचें व्यसन लक्षांत न घेतां त्याच्याविषयीं बोलावयाचें झाल्यास आपणाला असेंच म्हणावें लागेल, कीं तो फारच गरीब स्वभावाचा, उदार अंतःकरणाचा, विश्वासू मनुष्य होता.

तळिरामला नाटकांतील दुरात्मा म्हणणें हें जितक्या धाडसाचें आहे तितकेंच नाहीं म्हणणेंही असमंजसपणाचें आहे. गडकऱ्यांना ह्याविषयीं एका साहित्यसेवकानें विचारलें असतां गडकरी म्हणाले, " दिवाळीचा दिवा भडकून होळीचा हलकल्लोळ जिच्यामुळें होतो ती अचाट शक्तीची दारूच एकच प्याल्याची सूत्रचालक आहे. तळिराम हा त्या शक्तीचा केवळ एकनिष्ठ सेवक आहे. तो निःसंशय दुरात्मा नाहीं. त्याच्याकडे सदय अंतःकरणानें पाहाण्यांतच खरी माणुसकी दिसून येते. "

## ४४ मलाच ह्या गृहस्थाच्या लेव्हलला गेलें पाहिजे

पुण्याच्या राहात्या घरांत गडकऱ्यांची फारच आवडीची बसावयाची जागा माडीवरील खिडकीपाशीं असे. जेव्हां जेव्हां गडकरी गूढ विचारांत गढून गेलेले असत, तेव्हां तेव्हां गालावर एक हात ठेवून खिडकीबाहेर तोंड काढून निश्चल नजरेनें येणाऱ्या जाणाऱ्याकडे पाहातांना त्यांना पुष्कळांनीं पाहिलें असेल. अशाच एके वेळीं, खिडकींतून गडकऱ्यांचें लक्ष आपल्याकडे टांग्यांतून बसून येणाऱ्या एका ओळखीच्या व्यक्तीकडे गेलें. ही व्यक्ति एका पायानें लंगडी होती.

महाराष्ट्रीय उत्तम कादंबरीकार व निस्सीम वाङ्मयसेवक म्हणून ह्या व्यक्तीचा व गडकऱ्यांचा दृढ परिचय होता. लंगड्या मनुष्याला गडकऱ्यांच्या घरचा अवघड जिना चढून जाणें शक्य नव्हतें. ह्या गोष्टीची जाणीव गडकऱ्यांना होती म्हणूनच, गडकरी लगबगीनें जागेवरून उठून त्या गृहस्थाचें स्वागत करण्यासाठीं खालीं गेले. जातां जातां गडकरी उद्गारले, "ह्या माझ्या मित्राला कधीं काळीं सुद्धा माझ्या लेव्हलला येतां येणार नाहीं. दुर्दैवी ! नेहमीं मलाच ह्याच्या लेव्हलला गेलं पाहिजे."

## ४५ भित्र्या मनुष्याला देव असें शासन करतो

पुण्याच्या कोर्टांत गडकऱ्यांचे एक स्नेही एका बड्या हुद्द्याच्या जागीं काम करीत होते. त्यांच्यामार्फत एका दुसऱ्या स्नेह्याचें कोर्टांतील काम सायास न पडतां करून द्यावयाचें गडकऱ्यांनीं त्याला कबूल केलें होतें. ह्या गोष्टीला जवळ जवळ सहा महिने होऊन गेले तरी सुद्धा गडकऱ्यांकडून तें काम झालें नाहीं. एके दिवशीं त्या स्नेह्यानें गडकऱ्यांचा पिच्छा पुरविला. शेवटीं निरुपाय होऊन त्या कोर्टांतल्या स्नेह्यांना भेटावयास रात्रीं आठ वाजतां जावयाचें गडकऱ्यांनीं ठरविलें. त्या वेळीं पुण्यांत प्लेग चालू असल्यामुळें ते स्नेही पुण्यापासून दोन मैलांवर असलेल्या एरंडवणा कॅंपमध्यें राहात होते. ठरल्याप्रमाणें गडकरी, भाकूमामा धडफळे व दुसरे स्नेही रात्रीच्या वेळीं लकडी पुलावरून एरंडवणा कॅंपकडे जाण्यास निघाले. प्लेगमुळें रस्त्यांतील नेहमींची रहदारी कमी झाली होती. ह्या वेळीं जिकडे तिकडे अगदीं शुकशुकाट होता. लकडी पुलाच्या आसमंतांत असलेल्या स्मशानांतून मात्र थोडीफार मनुष्यांची चाहूल कानीं येत होती. येथून थोड्या अंतरावर एरंडवण्याच्या रस्त्याकडे वळतांना शेतांतून दोन तीन धिप्पाड चोर आपल्याकडेच धावत येतांना गडकऱ्यांनीं पाहिले. त्या वेळीं गडकऱ्यांची भीतीनें जी त्रेधा उडाली ती शब्दांनीं सांगणें शक्य नाहीं ! प्रथम गडकरी भाकूमामा धडफळे ह्यांच्या पाठीशीं

अनुक्रम 33636 वि: ७९२
क्रमांक 9047 नों: दि: 9-70-62

चिकटून उभे राहिले. भाकूमामांनीं त्यांना घाबरूं नका म्हणून पुष्कळ सांगितलें. एकादोघा चोरांचा समाचार मी एकटा घेईन, असेंही धीर देऊन सांगण्याचा प्रयत्न रा. धडफळ्यांनीं केला, पण व्यर्थ. चोर अगदीं जवळ येत आहेत असें पाहून गडकरी रस्त्यावरील दगडी पुलाच्या चिखलानें आणि घाणीनें भरलेल्या एका दरडींत दडून बसले. इतक्यांत ते तिघे चोर रा. धडफळ्यांसमोर येऊन उभे राहिले. त्या चोरांपैकीं एकानें धडफळ्यांना विचारलें, कीं रात्रीच्या ह्या वेळीं तुम्ही कुठें जात आहांत ? रा. धडफळ्यांनीं सांगितलें, कीं आम्ही इथेंच राहाणारे आहोंत; पण तुम्ही आमच्याकडे कां धावत आलांत ? ते चोर म्हणाले, 'तसं कांहीं नाहीं; तुम्ही कोण आहांत तें पाहावं म्हणून इकडे धावत आलों. बरं आहे. राम राम.' ते चोर तेथून निघून गेल्यावर गडकरी दरडीच्या बाहेर येऊन रस्त्यावर पडलेल्या गवतानें आपले सर्व कपडे, हातपाय, बूट पुसून काढूं लागले. दोघा स्नेह्यांना सोडून आपण दडून बसलों, ह्या गोष्टीमुळें ओशाळून जाऊन गडकरी कांहीं वेळ कोणाशींच कांहीं बोलले नाहींत. गडकऱ्यांचें सर्वांग घाणीनें आणि चिखलानें माखलेलें पाहून भाकूमामा म्हणाले, "अरेरे ! मास्तर, हें काय केलंत तुम्हीं !" चिखलानें माखलेले दोन्हीं हात दाखवून गडकरी म्हणाले, "भाकूमामा ! हें पाहा, भित्र्या मनुष्याला देव असं शासन करतो."

## ४६ एका पद्यावलीवरील गडकऱ्यांचा अभिप्राय

कांहीं वर्षें मासिक मनोरंजनांतून प्रसिद्ध होण्यासाठीं येणारे लेख, कविता, अभिप्रायार्थ पुस्तकें तपासून अभिप्राय देण्याचें काम गडकरी करीत असत. ह्या कामांतही गडकऱ्यांचा अनियमितपणा कै. रा. का. र. मित्रांना दिसून येत असे. परंतु गडकऱ्यांच्या दृढ परिचयामुळें त्यांना ह्याबद्दल विषाद वाटत नसे. एकदा मात्र ह्या अनियमितपणाचा गडकऱ्यांकडून अतिरेक झाला, त्या वेळीं कै. रा. का. र. मित्रांना गडकऱ्यांकडे पुण्याला धावपळ करीत जावें लागलें.

कै. मित्रांना आपल्याकडे येतांना पाहून गडकऱ्यांनीं लेख वाचून अभिप्राय देण्याचें काम जारीनें सुरू केलें. कै. मित्र म्हणाले, "गडकरी, तुमच्यामुळें मनोरंजनचा अंक उशिरां काढण्याची पाळी आली. तुमच्याकडून लेख तपासावयास फारच विलंब झाला. बरं, पण आज संध्याकाळीं मला सर्व लिखाण तपासून पाहिजे."

**गडकरी** : संध्याकाळीं कशाला ? आज दुपारींच हें काम तयार होईल. हें काय ? ही गोरक्षण फंडाची पद्यावली ! ( त्या पद्यावलीच्या मुखपृष्ठावरील चार आणे किंमत पाहातांच रागानें गडकऱ्यांनीं अभिप्राय दिला, कीं "हें पुस्तक कवडीमोल असल्यामुळें त्याची किंमत फार वाटते." )

कै. का. र. मित्र म्हणाले, "गडकरी, हें काय ? असे अभिप्राय देऊन कसं चालेल ? "

**गडकरी**—तो प्रश्न तुमचा आहे. पूर्ण विचारान्तींच मीं तो अभिप्राय दिला आहे. त्यांत अणुरेणुइतका बदल करायचं मनोधैर्य माझ्या आंगीं नाहीं.

## ४७ आतां माझाच मुडदा सापडणार

गडकरी स्वभावतः अगदीं भित्रे होते हें अगदीं खरें आहे; परंतु एका बाबतींत ते तितके भित्रे नव्हते असें साशंकपणें म्हणावें लागतें. ती बाबत म्हटली म्हणजे कोणाही ज्ञातिबांधवाच्या अंत्यविधीप्रीत्यर्थ स्मशानांत जाणें ही होय. असले प्रसंग होतां होईतों टाळावयाचे नाहींत हा गडकऱ्यांचा कृतनिश्चय होता. कित्येक अनाथांच्या दहनविधीप्रीत्यर्थ गडकऱ्यांनीं आपल्या पदरचे पैसे खर्च केले आहेत. एके दिवशीं दुपारीं तीन वाजण्याच्या सुमाराला गडकऱ्यांच्या कानीं बातमी आली, कीं एक अनाथ ज्ञातिबांधव पुण्याच्या ससून इस्पितळांत मयत झाला आहे. स्वतःच्या खर्चासाठीं एक पैही न ठेवतां होते तेवढे पैसे त्या माणसाच्या अंत्यविधीसाठीं आपल्या खिशांत घेऊन गडकरी कॉलेजमधून येणाऱ्या भाकूमामा धडफळ्यांची वाट पाहात

उभे राहिले. त्यांना गडकऱ्यांनीं आपल्याबरोबर येण्याविषयीं सांगितलें. लौकरच दोघेही इस्पितळांत गेले. इस्पितळांतील शिपाई प्रेतगृह उघडून म्हणाला, "रावसाहेब, ह्यांत तुमचा मुडदा कोणता तो पाहा." गडकरी प्रेतगृहांत जावयास धजेनात. गडकऱ्यांनीं भाकूमामांना आंत जावयास सांगितलें. भाकूमामा म्हणाले, "मास्तर, तुमच्या मयत मनुष्याला मीं पूर्वीं कधींच पाहिलेला नाहीं, मग मला त्याचं प्रेत कसं ओळखतां येणार? तुम्हीं भिऊं नका. मला दुरून दाखवा तुमचा मयत मनुष्य." गडकरी उत्तरले, "भाकूमामा, मी कांहीं प्रेतांना भीत नाहीं. ए शिपाई, हं, तो मुडदा जरा बाजूला कर. मला आमचा मनुष्य कुठें आहे तो पाहूं दे.'

**शिपाई** : हं रावसाहेब, हा आहे का तुमचा मुडदा?

**गडकरी** : नाहीं. कर त्याला बाजूला.

**शिपाई** : हा पाहा. हा आहे का?

**गडकरी** : छट्, तोही नाहीं.

**शिपाई** (त्रासून) : तुम्ही स्वतःच आतां मुडदे बाजूला सारून तुमचा मुडदा हुडकून काढा. हा नाहीं, तो नाहीं, मग तुमच्या माणसाचा मुडदा सापडणार तरी कसा?

**गडकरी** : भल्या माणसा, धीर धर. त्या माणसाच्या मुड्याऐवजीं आतां माझाच मुडदा सापडणार आहे असं दिसतं.

**भाकूमामा** : मास्तर, हा अगदीं शेवटचा मुडदा आहे. हाच का तुमचा मनुष्य?

**गडकरी** : भाकूमामा, शाबास! शेवटीं मुडदा हातांत सापडला. चला, आतां पुढील तयारीला आपणास लागलं पाहिजे.

## ४८ वीर वामनरावांना घाबरणारे गडकरी

कोणताही लेखक स्वभावानें कसा असेल ह्याची कल्पना गडकरी त्याच्या लेखनावरून करीत असत. श्री. वामनराव जोशी ह्यांचें राक्षसी

महत्त्वाकांक्षा हें नाटक गडकऱ्यांनीं वाचलें आणि आपल्या मनाशीं ठरविलें, कीं श्री. जोश्यांना मुळींच अंतःकरण नसलें पाहिजे. राक्षसवृत्तीच्या माणसाशिवाय इतकें भयंकर नाटक कोणालाही लिहितां येणार नाहीं. नाटक वांचतांना सर्वांगावर रोमांच थरारलेच पाहिजेत. एकदा गडकऱ्यांची आणि जोश्यांची रस्त्यांत अचानक भेट होण्याचा योग आला होता; परंतु गडकऱ्यांनीं मोठ्या शिताफीनें तो घडूं दिला नाहीं. त्यानंतर पुढें दोनतीन वर्षांनीं श्री. वामनराव जोशी पुण्यास आले होते, त्या वेळीं त्यांना समजलें, कीं गडकरी आजारी आहेत. एके दिवशीं एका स्नेह्याला बरोबर घेऊन श्री. जोशी गडकऱ्यांच्या घरीं त्यांची तब्येत कशी काय आहे तें पाहाण्याकरितां गेले.

ह्या वेळीं गडकरी आंगांत ताप असल्यामुळें पांघरूण आंगावर घेऊन निजले होते. वामनरावांनीं गडकऱ्यांच्या आंगाला हात लावून किती ताप आहे तो पाहिला. इतक्यांत गडकऱ्यांनीं डोळे उघडले. श्री. वामनराव जोश्यांना समोर पाहतांच गडकऱ्यांना मोठा अचंबा वाटला. गडकरी बिछान्यावर उठून बसूं लागतांच जोश्यांनीं त्यांना निजावयास सांगितलें. जोश्यांचे डोळे पाण्यानें भरून आले. गडकऱ्यांच्या पाठीवरून हात फिरवीत असतां जोशी म्हणाले, "गडकरी, तुम्ही धीर सोडूं नका. परमेश्वर आम्हां सर्वांसाठीं तुम्हांला ह्या दुखण्यांतून बरं करील. औषधोपचारांत हयगय करूं नका."

हे प्रेमळ बोल ऐकतांच गडकऱ्यांचा कंठ गहिंवरानें दाटून आला. गडकरी म्हणाले, "जोशी, तुमचं अंतःकरण कोमल आहे! तुमच्या त्या भयंकर नाटकामुळें तुमच्याबद्दल मीं आपला गैरसमज करून घेतला होता."

हें ऐकून जोशी हसले व तेथून आपऱ्या बिऱ्हाडीं गेले.

## ४९ "जगाच्या रंगानें रंगल्याखेरीज जगांत वावर"

एकदा कांहीं तरुण विद्यार्थी गडकऱ्यांकडे गेले व ते आनंदांत आहेत हें पाहून त्यांनीं विविध विषयांवर बोलावयास सुरुवात केली.

एका विद्यार्थ्यानें गडकऱ्यांना असा प्रश्न केला, कीं सन्मार्गानें जाणाऱ्या मनुष्याला सुद्धा ह्या जगांत निखालस सुख कां लाभत नाहीं ? गडकरी उत्तरले,

"हें जग म्हणजे रडण्याची एक मोठी जागा आहे. म्हणून ह्या ठिकाणीं केवळ सुखाची अपेक्षा करणं हें मूर्खपणाचं आहे. स्वभूमीसाठीं, स्वधर्मासाठीं आयुष्य वेचण्यांतच निखालस सुख जरी नाहीं, तरी मनुष्याला सुखाचं स्वप्न मात्र पडतं."

**विद्यार्थी** :—तुमच्या म्हणण्याचा अर्थ असा, कीं जगाच्या सुंदरतेला मनुष्यानें भुलून जाऊं नये. पण अशा भावनेनें वागणं फारच अवघड आहे.

**गडकरी** :—जन्माला येऊन तुला आपला देह सार्थकीं लावायचा असला, तर जगाच्या रंगानें रंगल्याखेरीज जगांत वावर.

## ५० एका नाटककाराच्या पायांशीं गडकऱ्यांनीं लोळण घेतली

वऱ्हाडांतील एका वयस्क गृहस्थानें संगीत 'कन्याकुमारी' ह्या नांवाचें एक नाटक लिहून तें एका स्त्री-संगीत नाटक मंडळीला प्रयोग करण्यासाठीं दिलें. "माझें पहिलें नाटक 'प्रेमसंन्यास' मीं प्रसिद्ध महाराष्ट्र नाटक मंडळीस दिल्यानंतर हें माझें दुसरें नाटक 'कन्याकुमारी' मीं तुमच्यासाठीं मुद्दाम लिहिलें आहे" असें त्या नाटककारानें त्यांना सांगितलें. गडकऱ्यांसारखा प्रसिद्ध नाटककार आपल्या नाटकमंडळीस लाभल्यावर आपल्या ऊर्जितावस्थेस किती वेळ लागणार असें त्यांना वाटावयास लागलें. खानदेशांतील जळगांव मुक्कामीं 'कन्याकुमारी' नाटकाच्या तालमी मोठ्या उत्साहानें सुरू झाल्या व अल्पावधींत त्या नाटकाच्या प्रयोगाच्या जाहिराती पुण्याच्या व इतर ठिकाणच्या दैनिक पत्रांतून फडकूं लागल्या. त्या वेळीं गडकरी गोव्याला होते. जळगांवास गडकऱ्यांचे एक स्नेही होते. नाटक बसविण्यासाठीं राम गणेश गडकरी हे स्त्री-संगीत मंडळीबरोबर आले

आहेत ही वार्ता त्यांच्या कानीं येतांच ते नाटक मंडळीच्या बिऱ्हाडीं गेले. चौकशीअंतीं असें आढळून आलें, कीं राम गणेश गडकऱ्यांचें खोटें नांव सांगून 'कन्याकुमारी'च्या जनकानें ह्या नाटकमंडळीला फसविलें आहे. विलंब न करतां गडकऱ्यांच्या ह्या स्नेह्यानें त्यांना गोव्याला ह्या हकिगतीचें पत्र पाठविलें.

हें पत्र पोचतांच गडकरी प्रथम पुण्याला आले व त्यांनीं पुण्याच्या दैनिक वर्तमानपत्रांतील 'कन्याकुमारी' नाटकाच्या जाहिराती वाचून पहिल्या. ह्यानंतर गडकरी व मी ह्या नाटककारासंबंधीं विचार-पूर्वक बोलत बसलों; परंतु आमच्या गडकरी घराण्यापैकीं असें धाडसी दुष्कृत्य करणारा कोणीही ध्यानीं येईना. ह्या कृत्यामुळें गडकऱ्यांचें मन फारच अस्थिर झालें होतें. रागाच्या भरांत गडकरी उद्गारले, "कोण हा नराधम गडकरी घराण्यांत जन्माला आला ? वेडंवाकडं कांहीं तरी लिहून तें माझ्या माथीं मारण्याचं पातक करण्यापेक्षां माझी त्यानें याचना केली असती तर त्याला एक सोडून दहा नाटकं त्याच्या नांवानें मीं लिहून दिलीं असतीं. तें कांहीं नाहीं. ह्या दुष्ट नाटककाराचा शोध लावलाच पाहिजे." विचार करतां करतां, मला वऱ्हाडांतील एका गृहस्थाच्या अशाच तऱ्हेच्या वर्तनाचा पूर्वेतिहास आठवला. मी म्हणालों, "मास्तर, ह्या नाटककाराला तुम्ही अमरावतीला पाह्यलं आहे. ज्यानें स्कूल फायनलच्या परीक्षेला आपल्या-ऐवजीं दुसऱ्याला बसवलं होतं, तोच हा गृहस्थ असावा." गडकरी हर्षातिशयानें ओरडून म्हणाले, "वाहवा ! शाबास ! तुझा तर्क अगदीं बरोबर आहे. बस्स, ठरलं. आज रात्रीच्या गाडीनें जळगांवला निघून जायचं. तिथें गेल्यावर घेतों खबर त्या बेरडाची."

जळगांवास गाडींतून उतरतांच गडकरी प्रथम नाटकमंडळीच्या बिऱ्हाडीं गेले व तेथें राम गणेश गडकरी कोठें आहेत म्हणून चौकशी केली. ह्या वेळीं खोटे गडकरी वाचनांत गढून गेले होते. खोट्या गडकऱ्यांना वर्दी पोचली, कीं कोणी तरी मुंबईचे गृहस्थ

त्यांना भेटावयास आले आहेत. शिष्टाचाराप्रमाणें नमस्कारविधि करण्यापूर्वींच गडकऱ्यांनीं खोट्या गडकऱ्यांच्या पायांशीं लोळण घेतली. खोटे गडकरी म्हणाले, " आपण हें काय करतां आहां ? माझे पाय धरण्याचं काय कारण आहे ? बोला, आपण कोण ? कुठून आलां ? कशासाठीं आलां ? "

**गडकरी** : मी कोण, कुठून आलों, हें सर्व मी आपणांस मागाहून सांगेन. पण आधीं मला आपण अभयवचन दिलं पाहिजे.

**खोटे गडकरी** : अहो, पण कशाबद्दल अभयवचन ? मी स्वत: नाटककार असून मला तुमच्याइतकं सुंदर नाटक खास वठवितां येणार नाहीं.

**गडकरी** : हें अगदीं अक्षरश: खरं आहे. माझ्यासारखं नाटक वठवायला जातिवंतपणा आंगीं असावा लागतो. तो तुमच्यांत नाहीं म्हणून तर तुमच्या उद्धारासाठीं मीं अशी तुमच्या पातकी पायांपाशीं लोळण घेतली आहे. अभयवचन मिळाल्यावांचून मी तुमचे पाय सोडणार नाहीं हें पक्कं ध्यानांत ठेवा.

**खोटे गडकरी** : माझे पाय सोडा. मी अभयवचन द्यायला तयार आहें. आतां मला अधिक छेडूं नका.

**गडकरी** : माझंच काय, पण कोणत्याही ग्रंथकर्त्याचं नांव ह्यापुढें मी चोरणार नाहीं अशी शपथ घ्या.

## ५१ गडकऱ्यांचें स्वगत गायन

गडकऱ्यांना मुळींच गातां येत नसे हें खरें आहे, तथापि ते कवि असल्यामुळें त्यांना स्वत:चें मन प्रफुल्ल राखण्यासाठीं थोडेंतरी गावें लागेच. कवितेचा नाद लहानपणापासून असल्यामुळें शाळेंतील पुस्तकांतल्या कविता त्यांच्या तोंडपाठ असत एवढेंच नाहीं, तर मुलीबाळींचींही गाणीं त्यांना तोंडपाठ येत असत. हिंदुस्थानी बहुतेक सर्व चिजा त्यांना अवगत असत. तसेंच सर्व नाटकांतील बहुतेक पद्यभागही पाठ असे. सर्वांत मौजेची गोष्ट ही, कीं एखादी हिंदुस्थानी

चीज असो वा मोरोपंतांची आर्या असो वा वामन पंडिताचा श्लोक असो किंवा तुकारामाचा अभंग असो, गडकरी ती एकाच तालासुरांत म्हणत असत. हा सुंदर प्रसंग माझ्याखेरीज फारच थोड्यांनीं पाहिला असेल. उजव्या हातांत लाकडी रूळ धरून आणि डाव्या तळहातावर ताल धरून गडकरी गाणीं म्हणत असत. माझें लक्ष त्यांच्या गायनाकडे मुळींच नाहीं असें दाखवून मला कित्येकदा तरी त्यांच्या अभिनव रमणीय कवितांची भेसुर भुतावळ पाहावयास सापडे. कै. तात्यासाहेब कोल्हटकरांचें 'उगिच कां कांता' हें श्रुतिमनोहर पद गडकऱ्यांच्या अत्यंत आवडीचें होतें. म्हणतांना ह्याही पदाची गडकरी भयंकर दशा करीत असत. १९१० सालीं गडकऱ्यांना केशवसुतांच्या कवितेचें मनस्वी वेड लागलें होतें. अहोरात्र गडकरी कांहीं गुणगुणत असत. ह्यावरून गडकऱ्यांना गायनाची मनापासून आवड होती हें सहज दिसून येईल.

## ५२ माझ्या प्रेमसंन्यासानें तूं कवि झालास

१९१०–११ सालीं गडकऱ्यांकडे येणारे विद्यार्थी बहुतेक कवि किंवा लेखक असत. प्रत्येकानें कांहीं तरी कविता करून आणावयाची व ती गडकऱ्यांना दाखवावयाची. गडकरी शक्य असेल त्यांत सुधारणा करून त्या विद्यार्थ्याला त्याप्रमाणें उत्तेजन देत असत. एकदा मला गडकऱ्यांनीं विचारलें, "काय रे, तूं कांहीं कविता वगैरे लिहितोस कीं नाहीं? तूं अमरावतीला असतांना तुला लिहिण्याचा नाद होता, पण आतां तो दिसत नाहीं." मी त्या वेळीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं मी प्रेमसंन्यासांतील लीला आणि बॅरिस्टर वसंतराव ह्यांच्या विचारसरणीला अनुसरून पुढील दोन कविता रचिल्या—

**"लीला, माझ्या सुशीलाताईवर मी रागवेन!"**

कोपें तुजसी दुखविल। नच।
हितवचन त्वदिय क्षणहि न दवडिल॥ ध्रु०॥

नष्टधवा मी ॥ विरत वियामीं ॥
बाहुपाशिं तव अभिरति अविरल ॥ १ ॥

**वसंतराव**

धर्मखुळा गमतो गोकुळ ॥
हिंदूमाजी हिंदु अजागळ ॥ ध्रु० ॥
युवती–गौरव या नच ठावा ॥
तद्विषयीं परिमत्सरभावा ॥
विधवेचा मग केवि केवा ॥
नरपशु मानसिं जागृत व्हावा ॥
धर्म म्हणोनी अधर्म वरिवा ॥
हिंदुत्वाला डाग नसावा ॥ धर्म ॥

ह्या कविता वाचून मोठ्या आनंदानें गडकरी उद्गारले, "शाबास, माझ्या प्रेमसंन्यासानें तूं कवि झालास."

## ५३ एक भयंकर रात्र

एके दिवशीं रात्रीं मी अभ्यास करीत बसलों होतों व थोड्याशा अंतरावर गडकरी कांहीं लिहीत बसले होते. एकाएकीं गडकऱ्यांनीं आपलें लिहिणें थांबविलें व ते शतपावली करूं लागले. मी अभ्यास आटोपून निजावयास गेलों. दिव्याची ज्योत अधिक मोठी करून गडकरी पुन्हा कांहीं लिहूं लागले. मध्येंच ते मोठमोठ्यानें ओरडून बोलूं लागले. हा असा क्रम सुमारें तास दीड तास चालू होता. नेहमींच्या गडकऱ्यांच्या ह्या तऱ्हेवाईक वागण्यामुळें मी ह्या गोष्टीकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. इतक्यांत गडकरी मला हाक मारून म्हणाले, "प्रभाकर, मला चाकू दे पाहूं." मला वाटलें पेन्सिल करण्यासाठीं गडकरी चाकू मागताहेत. म्हणून मी चटकन उठून त्यांना चाकू दिला. चाकू हातीं घेऊन गडकरी म्हणाले, "जगण्यांत काय जीव आहे? कोण ही ह्या जिवाची धडपड! काय ह्या महत्त्वाकांक्षा? बस्‌–

To die and know not where to go." मी घाबरून म्हणालों, "मास्तर, हें तुम्ही काय चालवलं आहे! इतक्यांत चांगलं लिहीत बसलां होता आणि आतां...."

**गडकरी** : To die and know not where to go, हा विचार कायमचा ठरला.

**मी** (लेखक) : मास्तर, जरा शांत व्हा. सगळ्या जगाची समजूत घालण्याचं सामर्थ्य तुमच्यांत आहे आणि तुम्हांला तुमची....

**गडकरी** : हो. मला माझी समजूत ह्या वेळीं घालतां येत नाहीं. कोण हा जगाचा विसंगतपणा! तूं अद्याप अजाण आहेस. तुला ह्या विचित्र जगाची कुठून कल्पना येणार?

बोलतां बोलतां गडकऱ्यांच्या हातांतून चाकू खालीं पडला तो मीं चटकन उचलून माझ्या कोटाच्या खिशांत ठेवला. ह्यानंतर सुमारें एक तासभर गडकरी डोकें गादीवर ठेवून स्वस्थ पडले होते. पुन्हा उठून गडकरी लिहावयास बसले ते अगदीं सूर्योदयापर्यंत. मधून मधून 'हां, हृदया, असं चरकूं नकोस! भीतीनें असं दचकून कापूं नकोस!' अशीं वाक्यें गडकऱ्यांच्या तोंडाबाहेर पडतच होतीं. सूर्याचीं बालकिरणें खिडकींतून डोकावूं लागतांच गडकऱ्यांनीं डोक्यावरून पांघरूण घेऊन निजावयास सुरुवात केली. त्या वेळीं आजची समजूत मला नव्हती, म्हणून ती रात्र मला भयंकर भासली. गडकऱ्यांची ही सारी तयारी पुण्यप्रभाव नाटकाचीच होती.

## ५४ आनंदी आनंद गडे। इकडे तिकडे चहूंकडे

सर चिंतामणी द्वारकानाथ देशमुख हे मुंबई विश्वविद्यालयाच्या १९१२ च्या प्रवेश परीक्षेंत पहिले आले त्या वेळीं गडकरी स्वतःचें देहभान विसरून आनंदाच्या भरांत थैय् थैय् नाचूं लागले. जो जो कोणी त्यांना भेटे त्याला त्याला ते ही आनंदाची वार्ता अगदीं नव्यानेंच सांगत सुटत आणि ह्या गोष्टीव्यतिरिक्त बोलावयास त्याला

सवड देईनात. स्वतःशींच पुटपुटत, " मी आज ब्रह्मानंदांत बुडालों आहें. आनंदी आनंद गडे । इकडे तिकडे चहूंकडे ॥ माझ्या बालकवीच्या आनंदी आनंदाची खरी गोडी मला ह्या प्रसंगीं कळते आहे." गडकऱ्यांचे भोवतीं विद्यार्थीवृंद नेहमींच जमावयाचा. त्यांपैकीं एकाला उद्देशून गडकरी म्हणाले,

" तरीच जन्मा यावें, परीक्षेंत पहिलें यावें
चिंतामणिसम व्हावें, नातरि कशास जगावें ?"

ह्याच उत्कट आनंदाचे पोटीं " अभिनंदनपर वर्धापन " हें गडकऱ्यांच्या शुद्धतम हृदयाची साक्ष पटविणारें काव्य जन्मास आलें.

## ५५ उष्णतेसाठीं बर्फ

एके दिवशीं रविवारीं फर्ग्युसन कॉलेजमधील कांहीं विद्यार्थी गडकऱ्यांच्या घरीं आले. बराच काल गप्पाष्टकांत व्यतीत झाला. गडकऱ्यांच्या संभाषणांतील मनोरम कोट्याविनोदांनीं विद्यार्थी मित्र बेहोष खूष झाले. ते परत जावयास निघाले हें पाहातांच गडकरी म्हणाले, " हां ! सबूर ! माझ्या सन्मित्रांनो ! इतक्या घाईनें घरीं जाण्यांत धोका आहे. आपण तब्बल तीन तास सारखे बोलतों आहोंत. शरीरांत उष्णतेचें प्रमाण अधिक वाढलें आहे तें कमी करायलाच हवें. प्रत्येकानें दोन पौंड बर्फ खाल्ल्याशिवाय जगण्याची आशा नाहीं. "

गडकऱ्यांनीं एका इसमाच्या आंगावर पैसे फेकून त्याला पुष्कळसा बर्फ आणावयास सांगितलें. बर्फ येतांच गडकरी म्हणाले, " हें पाहा, तुमच्यापैकीं कोणाला उत्तम ड्रॉइंग, कलाकुसरीचें काम येतें आहे काय ? कोणालाही येत नाहीं ? बरें तर आपण ' ताजमहाल ' बांधायचा नाद सोडून देऊं आणि ह्या बर्फाचा प्रथम आपण ओबड-धोबड ' हिमालयच ' रचूं म्हणजे झालं. हं करा सुरुवात."

बर्फ खातांना आपल्या मित्रांची त्रेधा झाली आहे असें पाहून गडकऱ्यांना कल्पनातीत समाधान झाल्यासारखें दिसलें.

त्या मित्रांपैकीं दोघां मित्रांस थांबवून गडकऱ्यांनीं सांगितलें, " तुम्हाला घरीं जाण्याची एवढी कांहीं निकड नाहीं. उष्मा फारच होतो आहे. आपण मुळामुठा नदीवर पोहायला जाऊं चला."

## मुळामुठा नदीच्या कांठीं

ते दोघे मित्र आणि गडकरी मुळामुठा नदीच्या कांठीं आले. पोहण्यालायक भरपूर पाणी असलेलें एकही स्थळ त्यांना आढळून येईना. " ऐन उन्हाळ्यांत ही नदी कधींही सजल असत नाहीं हें माहीत असतां आपण इथें पोहायला आलों हा आपला मूर्खपणाच झाला. मास्तर, चला, फिरा मागें." एकजण म्हणाला.

" डोळे नीट उघडून त्या पलीकडच्या छोट्याशा जलाशयाकडे पाहा. चला, तिकडे पोहायला मिळणार नाहीं हें खरं आहे पण शीतोदकाच्या स्नानानें आपणास निःसंशय हुशारी वाटेल." गडकरी उद्‌गारले.

ते तिघेही तेथें गेले. गढूळ पाण्यानें भरलेलें तें एक डबकें होतें. त्यांत नानाविध जीवजंतु स्वच्छंदानें विहार करीत होते. झाडा-पानांची हिरवळही त्यांत एकवटलेली होती. अशा डबक्यांत उतरून स्नान करण्याची हौस कोणाला तरी वाटेल का ? पण त्या डबक्यांतल्या पाण्यानें स्नान करण्याची गडकऱ्यांची हौस मात्र फार और होती. गडकऱ्यांनीं शोधून काढलेल्या त्या गलिच्छ जलाशयाकडे पाहातांच त्या दोघां मित्रांपैकीं एकाला खरोखरीच थंडीची हुडहुडी भरल्यासारखें वाटूं लागलें. त्यानें लागलीच आपली मनीषा गडकऱ्यांजवळ व्यक्त केली, " हौसेनें स्नान करायला आलों पण दुर्दैवानें हीच वेळ साधली. मला थंडी भरून ताप येतो आहे."

ह्यावर गडकरी एक दीर्घ सुस्कारा टाकून म्हणाले, " अभागी तरुणा ! आजच्या ह्या शीतोदक स्नानाचा आनंद तुझ्या फुटक्या

नशिबीं नाहीं. कादंबरींत बाणभट्टानें वर्णिलेल्या अच्छोद सरोवराची मनोहर स्मृति हा चिमुकला जलाशय पाहून व्हायला पाहिजे." असें म्हणून गडकऱ्यांनीं स्नान करावयास सुरुवात केली. बरोबरच्या दुसऱ्या मित्रालाही नेटाचा आग्रह करून त्या डबक्यांत स्नान करावयास गडकऱ्यांनीं भाग पाडलें. अर्ध्या तासानें दोघेही स्नान करून बाहेर आले.

" भाकूमामा, स्नान केल्याबरोबर किती बरं वाटूं लागलं आहे ? काय असेल तें असो मला तर थंड पाण्याच्या स्नानानें ह्यापूर्वी इतका उत्साह कधींच वाटला नाहीं." गडकरी म्हणाले.

## अंगावर फोड

क्षणार्धांत भाकूमामांच्या सर्वांगाला विलक्षण कंड सुटून, अधेली एवढाल्या आकृति त्यावर बहरल्या. केवळ गडकऱ्यांच्या शब्दासाठीं आपण त्या डबक्यांत स्नान केलें आणि त्याचाच हा परिणाम आहे हें भाकूमामांना पूर्ण माहीत होतें. थोड्या वेळांत भाकूमामां-प्रमाणेंच गडकऱ्यांचें आंगही लालसर ठिपक्यांनीं फुललें. पण त्यासंबंधीं गडकऱ्यांनीं एक अवाक्षरही काढलें नाहीं.

उलट गडकरी भाकूमामांना म्हणाले, " हें पाहा भाकूमामा, आज आपल्याला नदीवर स्नान करायला जायची फार चांगली बुद्धि झाली. अच्छोद सरोवर पाहून जितका आनंद चंद्रापीडाला झाला त्याच्या सहस्रपट आनंद आपणास आपल्या मुळामुठा नदीकांठचा जलाशय पाहून झाला आहे."

" तुम्ही म्हणतां तें खरं आहे पण त्या डबक्यांतलं पाणी विषारी होतं. हें पाहा माझं सर्वांग कसं झालं आहे तें." भाकूमामा उत्तरले.

" छे, छे ! पाणी मुळींच विषारी नव्हतं. किती गार नि मधुर पाणी होतं तें ! त्याच्या स्पर्शानें पातक्यांचीं पातकं सुद्धा ढवळून पावन होतील. तुम्ही पुन्हा जाऊन त्या पाण्यानें स्नान करून या." गडकरी उत्तरले.

"बरं आहे" असें म्हणून हसत हसत भाकूमामांनीं गडकऱ्यांचा निरोप घेतला.

पुढें एक आठवडाभर गडकरी आणि भाकूमामा आंथरुणांवर खिळून असतां त्यांना मुळामुठा नदीकांठीं असलेल्या त्या अच्छोद सरोवराचा सारखा साक्षात्कार होत होता. त्या स्थितींत गडकऱ्यांना मौज वाटत होती आणि भाकूमामांना पश्चात्ताप होत होता. अशा चमत्कारिक वागणुकीमुळें गडकऱ्यांच्या स्वभावाची कांटेकोर तर राहो नुसती अंधुक कल्पना सुद्धा कोणालाही करतां येणार नाहीं.

## ५६ एक पत्र

पुण्यास त्या वेळीं मी शनवारवाड्याजवळ एका लहानशा बंगलींत राहात असें. उन्हाळ्याच्या रजेंत मी गांवीं जावयाचा होतों. पण गडकऱ्यांनीं मला आठ दिवस थांबवून घेतलें होतें. त्यांचा व माझा कांहीं खाजगी व्यवहार होता आणि त्यासाठींच मला थांबून राहावें लागलें. आठ दिवसांपैकीं चार दिवस निघून गेले तरीही गडकऱ्यांकडून मला कांहीं वर्तमान कळेना. दहा पांच वेळां मीं गडकऱ्यांच्या घरीं खेपा घातल्या पण त्यांची गांठ पडेना. शेवटीं संतापाच्या भरांत मीं गडकऱ्यांना एक पत्र पोस्टानें पाठविलें. दोन दिवसांत पत्राचें उत्तर न आल्यास गांवीं निघून जावयाचें मीं ठरविलें. कर्मधर्मसंयोगानें त्याच दिवशीं संध्याकाळीं गडकऱ्यांची व माझी शनवारवाड्यासमोर गांठ पडली. गडकऱ्यांचा हसतमुख चेहरा पाहून तत्क्षणीं माझा चेहरा पडला. मीं पत्र पाठविलें नसतें तर बरें झालें असतें असें मला वाटलें. माझी ही अनुकंपनीय स्थिति गडकऱ्यांच्या लक्षांत खास आली असली पाहिजे.

मला पाहातांच गडकरी म्हणाले, " तुझं पत्र मला पोचलं. माझं उत्तरही तुला मिळालं असलं पाह्यजे."

" नाहीं." मी म्हणालों.

" मग असाच सरळ तूं आपल्या बिऱ्हाडीं जा, पत्राचं उत्तर वाच नि मग मला भेट." गडकरी म्हणाले.

" आतां प्रत्यक्ष भेट झाली आहे. इथेंच काय तें सांगा म्हणजे झालं." मी उद्गारलों.

" लक्षांत ठेव. भर रस्त्यांत खासगी गोष्टींबाबत कुणींही कधींही बोलूं नये." गडकरी उत्तरले.

मी पुढें कांहीं न बोलतां थेट बिऱ्हाडीं गेलों. गडकऱ्यांच्या ह्या आतांच्या वागणुकीमुळें पुन्हा मला थोडासा राग आला. ' असंगाशीं संग आणि प्राणांशीं गांठ ' असेंही वाटलें.

राग आला खरा पण गडकऱ्यांच्या बोलण्यावरून असें वाटलें, कीं पत्रांत बराच आशाप्रद वृत्तान्त असावा. बिऱ्हाडीं जातांच मला पत्र मिळालें.

तें पत्र वाचतांच माझ्या डोक्यांत अनेक कल्पनांचा कल्लोळ उठला. तीव्र शब्दांत लिहून पाठविलेल्या माझ्या पत्राला इतक्या मोजक्या आणि शांतरसांत घोळलेल्या शब्दांत उत्तर लिहिणाऱ्याच्या स्वभावाची मला त्या वेळीं कांहींच कल्पना करतां येईना.

## ५७ मी सवाई हॅम्लेट आहें

गडकऱ्यांच्या स्वभाव–परीक्षणाच्या बाबतींत सरसहा प्रत्येक माणसाची दिशाभूल झालेली आहे. कोणी म्हणतात गडकऱ्यांचें गोल्डस्मिथशीं बरेंच साम्य होतें. कोणी म्हणतात ते बुद्धिजीवी, लहरी होते. कोणी कांहीं, कोणी कांहीं आपआपल्या बुद्धीनुसार गडकऱ्यांच्या स्वभावाबाबत बोलत. गडकरी जिवंत असतांनाही अशा प्रकारची लोकवार्ता त्यांच्या कानीं येत असे.

एके प्रसंगीं गडकऱ्यांना एका निष्कपट पण वाजवीपेक्षां फाजील आत्मविश्वास असणाऱ्या माणसाची फार कींव आली.

" तुमच्या स्वभावाची नाडी आमच्या हातीं बरोबर लागली.

आमच्याजवळ कसलाही लपंडाव तुम्हांला खेळतां येणार नाहीं." तो गृहस्थ म्हणाला.

"माझ्या स्वभावाची नाडी तुमच्या हातीं आली नाहीं पण मी छातीठोक सांगतों, कीं निव्वळ भूल हातीं लागली. अहो, तुम्हांला मी कोण आहें असं वाटतं ? मला कोणीही ओळखणं शक्य नाहीं. आय् ॲम हॅम्लेट ऑफ हॅम्लेटस्. मी सवाई हॅम्लेट आहें, समजलांत ?"

## ५८ छत्रपति आणि गडकरी

'साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे' ह्या उक्तीची सत्यता ज्यांनीं कै. राम गणेश गडकऱ्यांचें जीवन अगदीं जवळून पाहिलें आहे, त्यांना गडकऱ्यांच्या नित्याच्या हालचालींत पूर्णपणें पटलेली आहे. सरस्वतीच्या सेवेसाठीं गडकऱ्यांनीं ऐहिक सुखांचा त्याग केला. स्वार्थाची नुसती तरळ कल्पनाही मनांत येऊं दिली नाहीं. गडकऱ्यांच्या आंगीं असलेले हे गुण त्यांच्या नित्याच्या साध्या वागणुकींत सुद्धा दिसून येत असत.

कोल्हापुरास किर्लोस्कर नाटक मंडळीचा मुक्काम असतांना त्यांच्या बिऱ्हाडाजवळ एक वैदिक ब्राह्मण राहात असे. एके दिवशीं त्यानें गडकऱ्यांना भेटून विनंती केली आणि म्हणाला, "मास्तर, सरकार-वाड्यांत लौकरच होणाऱ्या विवाहप्रसंगीं म्हणण्यासाठीं मला छानदार कविता करून द्या. तुम्ही चांगल्या कविता करतां म्हणून तुमच्याच मंडळींतल्या माझ्या एका मित्रानें मला सांगितलं. महाराजांना कविता आवडली तर ह्या गरीब ब्राह्मणाला चांगली दक्षणा मिळेल. मास्तर, कराच एवढा अनुग्रह माझ्यावर." ह्या वेळीं गडकरी मनापासून हसले आणि उत्तरले, "महाब्राह्मणा, तुझी इच्छा सफल होईल. मला एक दोन दिवसांनीं पुन्हा भेट."

ह्यानंतर दोन दिवसांनीं कबूल केल्याप्रमाणें गडकऱ्यांनीं त्या ब्राह्मणाला मंगलाष्टकांच्या पद्धतीनें म्हणतां येतील असे चार श्लोक

अनुक्रम 33.6.30 वि: ...
क्रमांक 70.61 नों. दि.



करून दिले. ब्राह्मणानें ते श्लोक फारच व्यवस्थित रीतीनें छत्रपतींच्या समक्ष म्हणून दाखविले. त्या श्लोकांतील अर्थसौष्ठव, रम्य कल्पना, नावीन्य इत्यादि गुणांमुळें छत्रपतींचें रसिक मन वेधलें गेलें. ब्राह्मणानें हे श्लोक कोठून मिळविले ह्याबद्दल छत्रपतींनीं चौकशी केली. आपल्याच राजधानींत नाट्यप्रयोग करीत असलेल्या किर्लोस्कर नाटक मंडळींतील मुलांना शिकविणाऱ्या मास्तरानें हे श्लोक केले आहेत असें छत्रपतींना समजलें. ह्यानंतर छत्रपतींनीं गडकऱ्यांस भेटावयास बोलाविलें व त्याप्रमाणें गडकऱ्यांची आणि छत्रपतींची प्रत्यक्ष भेट झाली. ‘तुमच्या कविता मला मनापासून आवडल्या. लिहिण्याचा नाद चालू ठेवा. तुमचं नांव महशूर होईल.’ अशा प्रकारें छत्रपतींनीं गडकऱ्यांचा गौरव करून त्या कवितांबद्दल त्यांना बऱ्याच मोलाचें पारितोषिकही दिलें.

बऱ्याच कालावधीनंतर एके दिवशीं गडकरी पुण्यास असतां त्यांना कोल्हापूराहून कळविण्यांत आलें, कीं अमुक दिवशीं छत्रपति पुण्याहून दुपारीं तीन वाजतां मुंबईस जावयाचे आहेत, तेव्हां छत्रपतींच्या आज्ञेप्रमाणें गडकऱ्यांनीं त्यांना त्या वेळीं पुणें स्टेशनवर जरूर येऊन भेटावें.

छत्रपतींना आपल्याबद्दल वाटत असलेल्या आदराचें गडकऱ्यांना मोठें आश्चर्य वाटलें. “कुठें छत्रपति आणि कुठें यःकश्चित् पामर मी!” गडकरी मातोश्रीला हाक मारून म्हणाले, “मा, मी फार मोठा माणूस व्हायला लागलों आहे. उद्यां कोल्हापूरच्या छत्रपतींना भेटायला जाणार आहें. भेटण्यासाठीं मला केवढी जंगी तयारी करायला पाहिजे! राजेरजवाड्यांना भेटायचं म्हणजे फार नीटनेटकेपणानें निं व्यवस्थित रीतीनें भेटायला पाहिजे.” हें एकून गडकऱ्यांच्या मातोश्रींच्या डोळ्यांतून आनंदाश्रु ओघळले. “मा, उद्यां जेवण फार लवकर तयार व्हायला पाहिजे. नाहींतर छत्रपतींच्या भेटीचा सुयोग लाभणार नाहीं.” “लालजी,

तुला दुपारीं तीनच्या गाडीला जायचं आहे. मग एवढी धांदल कां ?" "मला माझ्या स्वत:ची तयारी करतां करतां वेळ पुरणार नाहीं म्हणून जेवण अगदीं लवकर तयार असायला पाह्यजे."

छत्रपतींना भेटावयाच्या दिवशीं अगदीं सकाळींच गडकरी घराबाहेर पडले व दहाच्या सुमारास घरीं परत आले. त्यांनीं आपली नेहमींची आसन मांडी घातली व खिशांतून पेन्सिल काढून कागदावर लिहावयास सुरुवात केली. बाराचा सुमार झाला तरी गडकऱ्यांचें लिहिणें चालू होतेंच. मातोश्रींनीं एक वेळ जेवण तयार असल्याची सूचना दिली होती. अद्याप अवकाश आहे असें खुणेनेंच गडकऱ्यांनीं त्या वेळीं मातोश्रीस कळविलें. वेळ भराभर जाऊं लागला. घरची मंडळी अस्वस्थ झाली, पण त्यांच्या लेखनतंद्रीचा भंग करण्यास कोणीही धजावेना. झालें. दुपारचे तीन वाजून गेले ! संध्याकाळ होऊन दिवेलावणीची वेळ झाली तरी गडकरी सारखे लिहिताहेत, मनाशीं कांहीं वेळ पुटपुटताहेत ! अशा रीतीनें रात्रीच्या नऊ वाजेपर्यंत गडकऱ्यांचें लिहिणें चालू होतें. गाढ झोपेंतून एकदम जागे झाल्याप्रमाणें गडकरी उद्गारले, "अरे, हें काय ? दुपारची तीनची गाडी निघून गेली ? छत्रपतींची भेट व्हायची राह्यली ! छत्रपतींचा माझ्यावर रोष झाल्यास मला तो मुकाट सहन केलाच पाह्यजे. प्रत्येक गोष्टीला मोल आहे. छत्रपतींच्या रोषाच्या मोलानें माझ्या आतांच्या लिहिलेल्याला मोल आलं आहे." हीं वाक्यें उद्गारत असतां प्रख्यात राजसंन्यास नाटकांतल्या कांहीं प्रवेशाचे ते कागद त्यांनीं खालीं ठेवले व आपल्या कपाळावरून हात फिरवला.

## ५९ 'लिहिलेला लेख हरवला म्हणून स्मरणशक्तीचा ठाव लागला'

"आणखी आठ दिवसांनीं कंपनीचा मुक्काम पणजीहून हलावयाचा आहे. त्यापूर्वीं तुमचं नाटक माझ्या हातीं पडलं पाह्यजे. गडकरी, माझ्या सहनशीलतेचा अधिक अंत पाहाण्यांत हंशील नाहीं."

किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीचे मॅनेजर श्री. शंकरराव मुजुमदार म्हणाले. "ठीक आहे" गडकरी उत्तरादाखल बोलले. कांहीं वेळानें गडकरी स्वतःशीं पुटपुटले, "पुण्यप्रभावाचा प्रभाव आठ दिवसांत घडून आला नाहीं तर तो 'पुण्यप्रभाव' कसला ?" गडकऱ्यांनीं पुण्यप्रभावाचें लिखाण करण्यासाठीं सात आठ चोपड्या अंकवार आणून ठेविल्या होत्या. मुखपृष्ठांवर अंकांचे आंकडे कलते लिहिलेले होते. कांहीं कांहीं अधलेमधले प्रवेश मात्र निराळ्या कागदावर लिहून ठेविले होते. पुण्यप्रभावाचें संपूर्ण कथानक गडकऱ्यांच्या डोक्यांत तयार होतेंच. फक्त कागदावर तें लिहून काढावयाचें होतें. किर्लोस्कर मंडळींत त्या वेळीं रघुनाथ राजे ह्या नांवाचा एक हुशार मुलगा होता. त्याच्या हुशारीमुळें गडकऱ्यांना त्याच्याविषयीं विशेष आदर वाटत असे. त्या वेळीं गडकऱ्यांनीं आपलें बरेंचसें लिखाण त्याच्याकडून लिहून घेतलें होतें. ह्या प्रसंगीं त्याला हाक मारून गडकरी म्हणाले, "चल, रघू, माझ्या मदतीला ये. माझ्यावर मोठी आपत्ति आली आहे. आठ दिवसांत 'पुण्यप्रभाव' पुरा करून दाखवायचा आहे. मी तोंडीं तुला सगळे संवाद सांगतों, तूं ते भरभर कागदावर लिहून काढ पाहूं !"

पूर्वीं लिहिलेले जे जे कांहीं प्रवेश होते ते ते चोपड्यांना जोडले. पण त्यांपैकीं पांचव्या अंकांतील फारच मोठा असा अग्निकुंडाचा तिसरा प्रवेश (पुस्तकाच्या जवळ जवळ १४।१५ पानांचा) कांहीं केल्या कोठेंच सापडेना. हस्तलिखित ४०।५० पानांचा प्रवेश होता तो. आतां एवढा मोठा प्रवेश पुन्हा कसा सांगतां येईल ह्या विचारानें गडकरी गोंधळून चिंतातुर झाले. कांहीं झालें तरी संपूर्ण नाटक आठ दिवसांत लिहून व्हायलाच हवें म्हणून गडकरी लगेच म्हणाले, "रघू, होय तशी जाय. मी सांगतों तसा नवा अग्निकुंडाचा प्रवेश लिहून काढ." अल्पावधींत तो प्रवेश लिहून पुरा झाला. त्यानंतर कंपनींतील सामानाची हालवाहालव चालली असतां पूर्वीं लिहिलेला अग्निकुंडाचा

प्रवेश सापडला. गडकऱ्यांना अत्यानंद झाला. रघूचे हातीं नवा लिहिलेला प्रवेश दिला आणि जुना प्रवेश आपले हातीं घेऊन तो वाचावयास त्यांनीं सुरुवात केली. महदाश्चर्य हें, कीं पुन्हा सांगितलेल्या प्रवेशांत आणि जुन्या प्रवेशांत अणुरेणु इतकी....एका शब्दाचीही तफावत आढळून आली नाहीं. एवढेंच नव्हे तर मूळ प्रतीची नवा प्रवेश ही बरहुकूम नक्कल आहे असेंच कोणालाही वाटलें असतें. त्या वेळीं बेहोष आनंदाच्या भरांत गडकरी उद्गारले, " लिहिलेला लेख हरवला म्हणून मला माझ्या स्मरणशक्तीचा ठाव लागला ! "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ विः ........
क्रमांक ........ नों. दि. ........

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

## विद्यार्थ्यांकरितां वाचनीय चरित्रें

| | |
|---|---|
| राष्ट्रगुरु श्रीरामदास, | ·॥· |
| श्रीरामचरित्र, महाजन | ·॥· |
| श्रीकृष्णचरित्र, महाजन | ·॥· |
| महारथी कर्ण, फाटक | ·॥· |
| धर्मराज, फाटक | ·।≈ |
| द्रौपदी, फाटक | ·।॥· |
| पांडवचरित्र, महाजन | ·॥· |
| बालवीर मारुति, थोरात | -।- |
| सुदामा, आजगांवकर | ८≡ |
| प्रल्हाद, आजगांवकर | ८≡ |
| ध्रुवचरित्र, आजगांवकर | ८≡ |
| राजा हरिश्चंद्र, आजगांवकर | ·।≈ |
| दक्षकन्या सती, भावे | ·।- |
| सत्यवान सावित्री, थोरात | ८≡ |
| नलदमयंती, थोरात | ८≡ |
| चंद्रहास चरित्र, महाजन | ८≡ |
| पंचकन्या, महाजन | ८≡ |
| दुष्यंत-शकुंतला, महाजन | ८≡ |
| भारतीय वीरकथा, वैद्य | २ |
| बाळ चिलया, टिल्लू | ८≡ |
| भक्त दामाजी, टिल्लू | ·।≈ |
| रामशास्त्री, वाशीकर | १। |
| ज्ञानेश्वर, वाशीकर | ·।- |
| नामदेव, आजगांवकर | ·।≈ |
| लोकमान्य टिळक, आपटे | ·।॥· |
| चार वीर मुत्सद्दी, भिडे | १ |
| तीन थोर देशभक्त, फडके | १। |
| मेवाडचे वीर, उपासनी | ·॥· |
| दर्यावर्दी कोलंबस, बापट | ·॥· |
| रामतीर्थचरित्र, करमरकर | -॥≈ |
| राजे शहाजी, सरदेसाई | -॥≈ |
| शककर्ता शिवाजी, ,, | १॥ |
| उग्रप्रकृति संभाजी ,, | -॥- |
| स्थिरबुद्धि राजाराम; ,, | -।॥- |
| पुण्यश्लोक शाहू : | |
| १ बाळाजी विश्वनाथ | १ |
| २ पेशवा बाजीराव | २॥ |
| ३ पेशवा बाळाजीराव | २ |
| श्रीसमर्थचरित्र, आजगांवकर | -॥- |
| एकनाथमहाराज, ,, | -।॥- |
| तुकारामबोवा, भिडे | -।≈ |

केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, मुंबई ४

# विद्यार्थ्यांकरितां वाचनीय पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| वेदांतील गोष्टी, १–२, प्र. | १ | हरवलेली आंगठी, जोशी | -॥- |
| गोड गोष्टी, १–१०, प्र. | -॥≈ | चतुरप्रधान व गुणीराजा, | -॥≈ |
| थोरांच्या गोष्टी, १–३, प्र. | -॥- | मालतीमाधव, कारखानीस | -॥- |
| माईच्या गोष्टी, सौ. दांडेकर | १ | सोन्याची गाडी, पंडित | -॥- |
| पबूताईच्या गोष्टी, १, | -।≈ | मेघदूत कथा, नी. शं. नवरे | -॥- |
| गोष्या, १–३, -।।।≈, -।।।≈, | १। | गोपाळकाळा, कॅ. लिमये | -।।।- |
| चन्दू, १, खानवेलकर | १ | बोधसुधा, श्री. व सौ. टिळक | -।।।- |
| बंडखोर बंड्या, नाईक, गुरव | १ | किशोरकथा, आनंदकर | -।।।- |
| किशोर, वि. भि. पेठकर | १ | हीं लहानगी मुलें काय करणार, ग. म. वैद्य | -।≠ |
| आमचे तात्या, भा. म. वैद्य | -।≠ | द्राक्षांचा मळा, वैद्य | -।≈ |
| चंपाराणी, वामन चोरघडे | १ | सोबती, पालवणकर | -।।।- |
| झेलम, शरच्चंद्र टोंगो | -।।।- | आमचीं गाऱ्हाणीं, वैद्य | -।।।- |
| गुलछबू, द. के. बर्वे | -॥≈ | तिसरी आघाडी, | १ |
| समरकथा, १–२, भागवत प्र. | १। | तिंबूनानांचा रेडियो, | -॥≈ |
| मोत्यांचा मळा, नारखेडे | -॥≈ | पांच महाभुतें, पांचजण | -।≈ |
| नऊ नाथ, १, परांजपे | -॥≈ | कवडसे, गोडबोले | -॥- |
| हास्यकळ्या, पटवर्धन | -।।।- | वनशोभा, काका कालेलकर | -।≠ |
| किती हसाल, पटवर्धन | १ | जीवनदृष्टि, विनोबा भावे | १॥ |
| पत्र्याची चाळ, सूर्यवंशी | १ | पुढें व्हा, यदुनाथ थत्ते | १। |
| लीलावती, ज. वा. रानडे | १। | आश्रम व आश्रमधर्म, | -॥≈ |
| कुमार, शरच्चंद्र टोंगो, | -।≈ | | |

केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, मुंबई ४

REFBK-0006513

कै. राम गणेश गडकरी

ह्यांच्या

# आठवणी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

लेखक

प्रभाकर सीताराम गडकरी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५९३
वा. क्र. ८३६
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0006513
REFBK-0006513

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

★ २२ ★

मूल्य एक रुपया